# अभिव्यक्ति

देगलूर कॉलेज, देगलूर

१९९३-९६



अडत व्यापारी शिक्षण संस्था, देगलूर, संचलित
देगलूर महाविद्यालय, देगलूर जि. नांदेड.

## ❊ कॉलेज संचालक मंडळ ❊

| | |
|---|---|
| १. श्री पोशट्टी लालन्ना उनग्रतवार | अध्यक्ष |
| २. श्री देवेंद्र मोतेवार | उपाध्यक्ष |
| ३. श्री राम राजाराम महाजन | सचिव |
| ४. श्री जयराम भूमय्या चिद्रावार | सह-सचिव |
| ५. श्री प्रकाश निवृतीराव पाटील | कोषाध्यक्ष |
| ६. श्री शशीकांत नारायणराव चिद्रावार | सदस्य |
| ७. श्री रामेश्वर रामकुंवर बजाज | सदस्य |
| ८. श्री नारायणराव रामन्ना मैलागिरे | सदस्य |
| ९. श्री व्यंकटराव नारायणराव पोलावार | सदस्य |
| १०. श्री गोविंदप्रसाद मांगीलालजी झंवर | सदस्य |
| ११. श्री सूर्यकांत गोविंद नारलावार | सदस्य |
| १२. श्री अध्यक्ष, मार्केट कमेटी, देगलूर | सदस्य |
| १३. श्री डॉ. कर्मवीर उनग्रतवार | स्विकृत सदस्य |
| १४. श्री राजू राम महाजन | स्विकृत सदस्य |
| १५. श्री प्राचार्य, देगलूर महाविद्यालय, देगलूर | पदसिध्द सदस्य |

❊❊❊

अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे

## देगलूर महाविद्यालय

## देगलूर

# अभिव्यक्ति

१९९३-९४,९५-९६

प्रकाशक :

**प्राचार्य**

देगलूर महाविद्यालय

देगलूर - ४३१ ७१७ (जि. नांदेड)

*

मुद्रक :

मुद्रा आफसेट

प्रिंटर्स, अँड प्रोसेसर्स

**नांदेड-४३१ ६०४.**

## राष्ट्रीय एकात्मतेची प्रतिज्ञा

भारताचा निष्ठावंत नागरिक या नात्याने,
मी सर्व प्रकारचे मतभेद शांततेच्या मार्गाने मिटविले
जावेत या सुसंस्कृत समाजाच्या सर्वमान्य तत्वावर
माझी दृढश्रध्दा व्यक्त करतो : आणि
लोकांमधील भावनिक एकात्मतेची निकड
लक्षात घेऊन धार्मिक, भाषिक,
प्रादेशिक अथवा अन्य सार्वजनिक
विषयाबाबतच्या कोणत्याही
विवादा मध्ये हिंसात्मक
मार्गाचा कधीही
अवलंब करणार
नाहीअशी
प्रतिज्ञा करतो.

# संचालक मंडळाचे पदाधिकारी



अध्यक्ष
**पोशेट्टीजी उनग्रतवार**



सचिव
**श्री राम राजाराम महाजन**



उपाध्यक्ष
**श्री देवेंन्द्र मोतेवार**



सहसचिव
**श्री जयराम भुमय्या चिद्रावार.**



कोषाध्यक्ष
**श्री प्रकाश निवृत्ती पाटील बेंमरेकर**

# आमचे तळमळीचे नेतृत्त्व



**प्राचार्य सत्यनाराण जाजू**
एम. ए. हिन्दी (उस्मानिया १९६३)

* १९६३ पासू महाविद्यालयात हिंदी विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत.
* पदव्युत्तर शिक्षक म्हणून विद्यापीठाची मान्यता.
* साहित्य संगीत, चित्र इ. कलात रूची.
* महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासाबाबत प्रथम पासून प्रयत्नशील.
* सर्वांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची संवेदनशील वृत्ती.
* मनमिळावू व सर्वांना घेऊन वाटचाल करण्याकडे कल.
* जून १९८५ ते ३१ मे १९९६ पर्यंत प्राचार्य म्हणून महाविद्यालयाची जबाबदारी सांभाळली.

## महाविद्यालयाच्या प्रशासनातील सहकारी



उपप्राचार्य श्री विनायकराव कठाळे
(गणित विभाग)



उपप्राचार्य श्री जी. एस. कल्याणपाड
(इतिहास विभाग प्रमुख)

## प्रशासकीय धुरा सांभाळणारे प्रबंधक



**श्री शेख एम. एच.**

एम. ए. (हिन्दी)

- ✻ महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी.
- ✻ सध्या याच महाविद्यालयाचे प्रबंधक म्हणून कार्यरत.
- ✻ कामाचा उरक व सर्वप्रकारचे अवधान हा त्यांचा कार्यपध्दतीचा खास विशेष.
- ✻ शिक्षण कार्यात रुची.
- ✻ मौलाना अबुल कलाम आझाज शिक्षण संस्थेचे स्थापनाकाळापासून सचिव.
- ✻ सामोपचाराने प्रश्न सोडविण्याची शैली म्हणून प्रिय.

# संपादकीय

आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना अभिव्यक्तिची संधी द्यावी आणि एक व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे या हेतूने आम्ही प्रतिवर्षी महाविद्यालयाच्या वतिने ''अभिव्यक्ति,'' हा वार्षिक अंक प्रकाशित करीत असतो. ह्या वर्षाचा हा वार्षिक अंक विद्यार्थ्यांचे सुप्त कला गुण अभिव्यक्त करणारा तसेंच तालुक्याचा विकास विशेषांक या स्वरूपात प्रकाशित करीत आहोत. विद्यापीठ आणि महाविद्यालये ही सामाजिक, शैक्षणिक विकासाच्या संदर्भातील महत्वाची केंद्र समजली जातात. सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय घटकांचा येथे प्रयत्न केलेला आहे. यातील विचारांमधून सर्व समस्यांचे योग्य प्रकारे विवेचन आणि विश्लेषन करण्यात कांही त्रुटी जाणवण्याची शक्यता आम्ही नाकारीत नाहीत. विद्यार्थ्यांच्या या विचारामध्ये त्यांची प्रारंभिक अवस्था म्हणून पहावे. उत्तरोत्तर त्यांच्या विचारात सुस्पष्टता आणि नेटकेपणा आणण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत असे अभिवचन देऊन हे संपादकीय आटोपते घेतो आणि आमच्या सर्व विद्यार्थी वाचकांना सुयश चिंतितो.

**संपादक मंडळ**



## प्राचार्यांचे मनोगत

विद्यार्थी मित्रानों -

अभिव्यक्तीचा हा वार्षिक अंक आपल्या हाती देताना आनंद होत आहे. या अंकातील साहित्या मधून तुमच्या भाव-भावना, आशा-आकांक्षा, शब्द बद्ध झाल्या आहेत.

लेखनाचा फारसा अनुभव नसतानाही कांही विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात केलेले प्रयत्न व दिलेला प्रतिसाद समाधान देणारा आहे. कुठलीही गोष्ट सुखा-सुखी प्राप्त होत नाही. त्या साठी सतत प्रयत्न व अभ्यास करावा लागतो. साहित्याच्या क्षेत्रातही वाचन, मनन, चिंतन व या सर्वाचे सार स्वरूप शब्द बद्ध केलेले टिपण महत्वाचे असते. या मधूनच आपल्या स्वतंत्र शैलीचा विकास होतो व अशा लेखनातूनच आपले व्यक्तिमत्व ही प्रतिबिंबित होते. आपण हे सर्व सातत्याने करत रहाल असा विश्वास आहे.

तीन सव्वातीन दशकानंतर मी महाविद्यालयाच्या सेवेतून निवृत्त होत आहे. महाविद्यालयाच्या आरंभापासूनच सेवारत असल्यामुळे या संस्थेचा विकास मी अगदी जवळून बघितला आहे. या प्रक्रियेत मी माझा, खारीचा का असेना वाटा उचलला आहे म्हणून संस्थेच्या सेवेतून निवृत्त होताना कर्तव्य पूर्तिचे समाधानही आहे. महाविद्यालयाच्या प्रशासनाचे नियोजन करताना केन्द्र स्थानी विद्यार्थ्यांनाच ठेवले आहे. विविध योजनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सुसंस्कारित करून चांगले नागरिक घडविण्याचा आम्ही सर्वांनी प्रयत्न केला आहे. मागील दशकात महाविद्यालयाचा शैक्षणिक व भौतिक विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे. बावीस एकराचा विस्तीर्ण निसर्गरम्य परिसर सर्व सोयीनी युक्त असलेली भव्य वास्तू, सुसज्ज प्रयोग शाळा, समृद्ध ग्रंथालय व अद्ययावत क्रीडा मैदान या संस्थेच्या प्रगती व समृद्धीची साक्ष देतात. आपल्या क्षमते प्रमाणे आपणास या साधन-सुविधांचा उपयोग करून आपले व्यक्तिमत्व घडविता व संस्कारित करता येईल. माझ्या सेवाकाळातील अभिव्यक्तीचा हा शेवटचा अंक. या नंतर या पदावर मी नसेन. मला तुमचा सहवासही लाभणार नाही पण मला तुमचं उदंड प्रेम आणि सहकार्य मिळालं हे मी विसरू शकत नाही. या काळातच अनुभवलेले आनंदाचे व परिपूर्तिचे क्षण माझ्या हृदयात सुरक्षित आहेत. तुमच्या व संस्थेच्या प्रेमाचा उतराई होण्यासाठी मी ही काही धडपड केली आहे. या प्रयत्नास कांही प्रमाणात यश आलं याचाही आनंद आहे.

महाविद्यालय म्हणजे जगन्नाथाचा रथ, तो कुणी एकट्यानी ओढणं शक्य नसतंच, या प्रयत्नात महाविद्यालयाचे संस्थाचालक, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी वर्ग असे सर्व घटक समाविष्ट आहेत. या उपक्रमात मिळालेलं श्रेय व यश आपणा सर्वांचं. राहिलेल्या उणिवा व त्रुटी या पूर्णत: माझ्या. या नम्र जाणिवेनं व कांहीशा भारावलेल्या अंत:करणानेच आपला सर्वांचा निरोप घेत आहे.

३१ मे, १९९६.

**-सत्यनारायण जाजू.**

## महाविद्यालयाची ठळक वैशिष्टे

स्वातंत्र्य उत्तर काळात सुजाण आणि सुसंस्कृत तरूणांची जडण घडण हा आमच्या महाविद्यालयाचा मुख्य हेतू आहे. समाजाला आज सुविध्य व सुसंस्कृत युवकांची गरज आहे: त्या दृष्टीने आमच्या महाविद्यालयात प्रत्यक्ष शिक्षणाबरोबरच अप्रत्यक्ष शिक्षण उपक्रमातून विविध योजना राबविल्या जातात. गेल्या ३०-३२ वर्षापासून अत्यंत डोळसपणे आम्ही विद्यार्थ्यांवर संस्कार करीत आहोत.

प्रत्यक्ष शिक्षणासाठी कला, विज्ञान आणि वाणिज्य या विविध शाखां मधून शिक्षणाची सोय आम्ही उपलब्ध करून दिलेली आहे. तसेंच इच्छूक विद्यार्थ्यांना कला शाखेतील मराठी, हिन्दी आणि इतिहास या विषयांमध्ये पदव्युत्तर शिक्षणाची सुविधा आहे.

औपचारिक शिक्षणा इतकेच अनौपचारिक शिक्षण पध्दतीतून तरूणांच्या मनाची जडण घडण होण्यास मदत होत असते म्हणून, आमच्या महाविद्यालयात शासन मान्य अशा विविध योजनांच्या माध्यमातून अभ्यासेतर उपक्रम चालविले जातात. सुजाण, सुसंस्कृत समाजाच्या निर्मितीसाठी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजना या सारख्या विविध योजना राबविल्या जातात. तसेच राष्ट्रीय वृत्तीचा संस्कार करण्याच्या हेतूने एन.सी.सी. ही योजना पण चालविली जाते. विद्यार्थ्यांना भावी जीवनात स्वयंरोजगार मिळविण्याचा आत्म विश्वास निर्माण व्हावा म्हणून व्यावसायिक अभ्यासक्रम योजना कार्यान्वीत केलेली आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना खंबीरपणे आपल्या पायावर उभे रहाता यावे आणि व्यक्तिमत्व घडविता यावे म्हणून स्पर्धात्मक परीक्षेचे मार्गदर्शन केले जाते.

वैद्यकिय, अभियांत्रिकी शाखांमध्ये प्रवेश मिळावा या हेतूने ११ वी १२ वी विज्ञान या वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना उन्हाळी वर्गाच्या माध्यमातून मार्गदर्शन कले जाते. मला आपणास सांगायला अत्यंत आनंद वाटतो की, दरवर्षी आमच्या महाविद्यालयातून किमान आठ दहा विद्यार्थी वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि कृषी विज्ञान या शाखांमध्ये प्रवेश मिळवतात. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही नैपूण्य मिळवण्यात अग्रेसर आहेत. विभागीय पातळीवर, विद्यापीठीय पातळीवर तसेच राज्य पातळीवर विविध प्रकारच्या क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धामध्ये यश मिळविलेले आहे.

संगीत क्षेत्रात ऋची असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आमच्या महाविद्यालयात वेगळा असा संगीत विभाग आहे. प्रा. बाबुराव उत्पलवार आणि प्रा. ए. एन. सौंदणकर या विभागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

आमच्या महाविद्यालयात मागासवर्गीय होतकरू विद्यार्थ्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाकडून मान्यता प्राप्त असे Remedial Classes चे केंद्र चालविले जाते. प्रा. एम. डी. कुलकर्णी. गणित विभाग प्रमूख हे प्रभारी प्राध्यापक म्हणून काम पहातात. या विभागामार्फत महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थ्यांना विद्यापीठ अनुदान मंडळाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून दिला जातो. सेमिनार, परीषदा इ. ला उपस्थित रहाण्यासाठी प्राध्यापकांना पाठविण्यात येते. तसेच प्राध्यापकांना एम. फील. पी. एचडी. करणेसाठी या योजने अंतर्गत सोय असून ९५-९६ या वर्षात प्रा. सौ. लाडके (पी.एचडी.) व प्रा. चिद्रावार (एम. फील.) यांनी याचा लाभ घेतला आहे.

***

अधिव्याख्याता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद

## देगलूर महाविद्यालय, देगलूर.

| व्ही. पी. कठाळे | जी. एस. कल्याणपाड | महंमद तकीयोद्दीन |
| --- | --- | --- |
| प्रभारी प्राचार्य | उप-प्राचार्य | पर्यवेक्षक |

### मराठी विभाग

**श्री एल. एस. तांबोळी** (विभाग प्रमुख)

श्री एस. जी. पुल्ले — श्री प्रकाश देशमुख

श्री बी. पी. क्षीरसागर — श्री बी. एन. जाधव

*

### हिन्दी विभाग

**डॉ. सौ. वेदवती लाडके** (विभाग प्रमुख)

श्री. बी. एस. इंगळे — सौ. जस्मा स्वामी

*

### इंग्रजी विभाग

**श्री पी. डी देशमुख** (विभाग प्रमुख)

श्री. पी. एल. लांडगे — श्री. एस. जी. करडखेडकर

श्री एस. एल. देशमुख — श्री जी. बी. मोहरीर

श्री एल. एस. सुदाम.

*

### उर्दू विभाग

**श्री खाजा अहमदोद्दीन** (विभाग प्रमुख)

श्री. शेख जुबेर अहमद — श्री. महंमद तकीयोद्दीन

*

### अर्थशास्त्र विभाग

**श्री आर. आर. बाहेती** (विभाग प्रमुख)

श्री. व्ही. एस. मनोहरे — श्री. वाय के धनजे

*

## इतिहास विभाग

**श्री जी. एस. कल्याणपाड** (विभाग प्रमुख)

(रिक्त) श्री. एच. जी. मानकरे

श्रीमती आर. एस. कुरूडे

*

## राज्यशास्त्र विभाग

**श्री आर. के. कुलकर्णी** (विभाग प्रमुख)

श्री. एल. एस. कुलकर्णी श्री. एन. एस. खिल्लारे

*

## लोक प्रशासन विभाग

**श्री आर. जी. थडके** (विभाग प्रमुख)

श्री. ए. एम. वाकोडकर

*

## तत्वज्ञान विभाग

**श्री के. एस. आचमारे** (विभाग प्रमुख)

श्री. एस. एच. पाटील श्री. ता. भ. पवार

श्रीमती सुरेखा मत्सावार श्रीमती ए. व्ही. मोघेकर

*

## शारीरिक शिक्षण विभाग

**श्री सिकंदर देसाई** (विभाग प्रमुख)

(रिक्त)

*

## वाणिज्य विभाग

**श्री पी. पी. डुब्बेवार** (विभाग प्रमुख)

श्री. व्ही. जी. चिंतावार श्री. पी. जी. कद्रेकर

श्री बी. पी. येरगीकर श्री एन. के. वाघमारे

श्री. आर. जी. कुरावार श्री. एन. एस. कंकाळ

श्री एन. एच. गोविंदवार

*

## गणित विभाग

**श्री एम. डी. कुलकर्णी** (विभाग प्रमुख)

श्री. व्ही. पी. कठाळे | श्री. एस. एम. देव

श्री यु. के. पंदिलवार

✻

## रसायनशास्त्र विभाग

**श्री इ. जी. विसपुते** (विभाग प्रमुख)

श्री. डॉ. एल. जी. करडखेडकर | श्री. पी. आर. बल्लारी

श्री वाय. व्ही. सूर्यवंशी | श्री. एम. डी. सदगर

श्री. व्ही. व्ही. उगीले | श्री यू. आर. कांबळे

✻

## पदार्थ विज्ञान विभाग

**श्री. एन. आर. कुलकर्णी** (विभाग प्रमुख)

श्री. व्ही. एस. येरमुने | श्री. टी. वाय. कोठेकर

श्री. एस. एस. इंदोर | श्री. ए. एन. रेड्डी

✻

## वनस्पतीशास्त्र विभाग

**श्री. आर. के शेट्ये** (विभाग प्रमुख)

श्री. डॉ. एम. बाबू (प्रपाठक)

श्री. सी. डी. चिद्रावार | श्री. एन. बी. देशमुख

✻

## प्राणिशास्त्र विभाग

**श्री. एस. पी. देशमुख** (विभाग प्रमुख)

श्री. व्ही. जी. जोशी. | श्री. पी. आर. क्षेत्री

श्री व्ही. जी कुमठेकर

✻

## संगीत विभाग

श्री. बी. व्ही. उप्पलवार | श्री. ए. एन. सौंदणकर

✻

## द्वि-लक्षी व्यवसायिक अभ्यासक्रम

**१. लघुउद्योग व स्वयंरोजगार**

श्री. एम. एच. सोनवणे — श्री. के. एन. पाटील.

**२. विपणन व विक्रय कला**

श्री. आर. के. येरगीकर — श्री. एस. एस. दुर्गकर

*

## किमान कौशल्यावर आधारित व्यवसायिक अभ्यासक्रम

**१. इलेक्ट्रॉनिक्स टेक्नालॉजी**

श्री. ओ. एन. मानधना — श्री. बी. एम. नाईक

**२. पर्चेसिंग ॲण्ड स्टोअरकीपिंग**

श्री. डी. व्ही. मोतेवार — श्री. ए. एस. कळसकर

**३. क्रिश ॲण्ड प्रीस्कूल मॅनेजमेंट (पाळणाघर)**

श्रीमती ए. एस. पटकुले — (रिक्त)

## क्रीडा व शारीरिक शिक्षण

**श्री जी. के. मांजरमकर** (संचालक)

श्री. एस. एस. येमेकर

*

## कार्यालयीन कर्मचारी

**श्री एम. एच. शेख** एम. ए. (प्रबंधक)

श्री. पी. व्ही. साखरे एम.ए. (अधिक्षक)

श्री. वडगावे एस. व्ही. बी.कॉम. (मुख्यलिपीक)

श्री. एस.आर. गज्जलवार बी.ए. (वरिष्ठ लिपीक)

श्री. व्ही. जी. चौडेकर बी.ए. (वरिष्ठलिपीक)

श्री. व्ही. एस. बोगुलवार बी.कॉम. (वरिष्ठ लिपीक)

श्री. एम. एन. बंगाळे (वरिष्ठलिपीक)

श्री. बी. बी. आत्मेलवार बी.कॉम. (कॅशिअर)

श्री. एस. बी. नुकलवार (टंकलेखक)

श्री. आर. बी. चाकुरकर बी.कॉम. (कनिष्ठ लिपीक)

श्री. के. एच. पांचाळ बी.ए. (टंकलेखक)

*

## ग्रंथालयीन कर्मचारी

**श्री एन. व्ही. टाकळीकर** एम. ए.बी. लिब. (ग्रंथपाल)

श्री. एन. आर पेंडलवार (सहाय्यक ग्रंथपाल)
श्री. बी. बी. पुलकंठवार बी.ए. (वरिष्ठ लिपीक)
श्री. पी. डी. चव्हाण बी.ए. (ग्रंथालय सहाय्यक)
श्री. डी. एम. जाधव (ग्रंथालय परिचर)
श्री. शे. महेबुब करीम सहाब (ग्रंथालय परिचर)
श्री. एस. पी. उनग्रतवार बी.ए. (ग्रंथालय परिचर)
श्री. एस. ए. तोटावार (ग्रंथालय परिचर)
श्री. बी. टी. इंगळे (ग्रंथालय परिचर)
श्री. एस. एस. उनग्रतवार (ग्रंथालय परिचर)
श्री. एच. टी. मुखेडकर (ग्रंथालय परिचर)

*

## प्रयोगशाळा कर्मचारी

प्रयोगशाळा सहाय्यक

श्री. जी. एच. पांचारे (बी.ए.)
श्री. जी. डी. चप्पलवार
श्री. व्ही. एम. ईश्वरे (बी.ए.)

## प्रयोगशाळा परिचर

श्री. एस. जी. राऊलवार
श्री. एम. आर. मुत्येपवार
श्री. व्ही. एस. सोनकांबळे
श्री. टी. जी. वाडेकर
श्री. महंमद मगदुम
श्री. यु. के. कांबळे
श्री. एस. आर. कोतुरवार
श्री. एस. एन. शिंदे
श्री. आर. के. घाडे
श्री. बी. ए. धम्पलवार
श्री. एन. व्ही. साखरे
श्री बी. व्ही. खेनेवार (बी. कॉम.)
श्री. एन. बी. बिडवई

*

## इतर सेवक

श्रीमती एस. एन. वानोळे
श्री. एस. जी. कराडे
श्री. एन. पी. कोंडावार
श्री. पी. एम. सोनकांबळे
श्री. एस. एस. कळसकर
श्री. एस. एम. तिम्मलवार
श्री. बी. पी. कर्णे
श्री. आर. एल. जंगीलवार (बी.कॉम.)
श्री. म. यासीन शेख महेबुबसाब
श्री. जी. एन. मामीडवार

***

## महाविद्यालयाच्या संसद उद्घाटन व स्नेहसंमेलन प्रसंगाची दृष्ये (१९९५–९६)



विद्यार्थी संसदेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना प्राचार्य सत्यनारायण जाजू



संसदेच्या उद्घाटन समारंभाचे एक प्रमुख पाहुणे श्री. केन्द्रे, गटविकास अधिकारी, देगलूर यांचे स्वागत करताना संसद-सचिव श्री. अशोक गंदपकर



संसदेच्या उद्घाटन समारंभाचे दुसरे प्रमुख पाहुणे श्री. भोसले, पोलिस निरीक्षक, देगलूर यांचे स्वागत करताना संसद-सचिव श्री अशोक गंदपकर



९५-९६ स्नेहसंमेलनात कविवर्य मंगेश पाडगांवकर याचं काव्यवाचन् चालू असताना
मंत्रमुग्ध झालेला श्रोता-समुदाय



महाविद्यालयाच्या ९५-९६ या वर्षाच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटक व प्रमुख पाहुणे कविवर्य मंगेश पाडगांवकर यांच्या समवेत प्राचार्य सत्यनारायण जाजू, प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी मागे उभे प्रा. पुरूषोत्तम देशमुख-प्रभारी प्राध्यापक विद्यार्थी संसद, व. प्रा. लक्ष्मीकांत कुलकर्णी



९५-९६ च्या स्नेहसंमेलनाच्या समारोपाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. ना. य. डोळे यांच्या समवेत संस्थेचे अध्यक्ष मा. पोशट्टीदादा उनग्रतकर, प्राचार्य जाजू, संसद-प्रभारी प्राध्यापक पुरूषोत्तम देशमुख, आणि संसद-सचिव श्री. अशोक गंदपवार



श्री. अनिल कांबळे हे भारतोल-स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात सर्वप्रथम आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना उपप्राचार्य कठाळे




महाविद्यालयाच्या व्हॉलिबॉल टीमला किनवटला जाताना निरोप देताना सोबत
उपप्राचार्य कठाळे व शा. शि. विभाग प्रमुख प्रा. मांजरमकर




महाविद्यालयाच्या कबड्डी-टीमला निरोप देताना खेळाडूंसमवेत
उपप्राचार्य कठाळे आणि प्रा. मांजरमकर.

## १९९३–९४ महाविद्यालयातील विविध कार्यक्रमाची कांही दृष्ये



विद्यार्थी संसदेचे प्रभारी प्रा. आर. के. कुलकर्णी यांचे पुष्पहार घालून, विद्यार्थी संसदेचे सचिव श्री विजय पुजलवार स्वागत करीत असतांना



विद्यार्थी संसदेचे सचिव श्री. विजय पुजलवार यांचे पुष्पहार घालून वर्गप्रतिनिधी स्वागत करताना



सांस्कृतिक कार्यक्रमाच्या प्रसंगी संसद सचिव व विद्यार्थी प्रतिनिधी



स्नेह सम्मेलन उद्घाटन प्रसंगी स्वागतपर भाषण करताना महाविद्यालयाचे
प्राचार्य एस. आर. जाजू.




स्नेह सम्मेलनाचे उद्घाटक यांचे समवेत विद्यार्थी संसदेचे पदाधिकारी आणि वर्गप्रतिनिधी.

# ✻ विद्यार्थी संसद ✻

## १९९३-९४.



विजय गंगाराम पूजलवार

अध्यक्ष

## ✻ वर्ग प्रतिनिधी ✻



रमेश विठ्ठलराव कंतेवार



बालाजी बोन्लावार



उत्तम रामभाऊ बनसोडे



अशोक वद्येवार



रमेश कतिवार



कंतेवार बालाजी विठ्ठलराव

# ✲ विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रतिनिधी ✲

१९९४–९५.



मोगलाजी शिरशेटवार

अध्यक्ष

## ✲ वर्ग प्रतिनिधी ✲



आदिल हलीम खाँ



अनिलकुमार श्रीनिवास शर्मा



सुभाष तुकाराम काटकर



तोटावार



दिपक कोमावार



म. शफीयोदीन अ. खादर

## * विद्यार्थी संसद १९९५-९६ वर्गप्रतिनिधी *


ममता काबरा


प्रिती काबरा


दिपाली पालमकर

## * क्रिडा विभागात नैपुण्य मिळविणारे विद्यार्थी *


उस्मान गवंडगावकर
नांदेड विद्यापीठात द्वितीय
(६८ कि. ते ७५ कि. भारतोलन)


अनिल कांबळे
नांदेड विद्यापीठात प्रथम
(५५ कि. ते ६० कि. भारतोलन)


यादव कांबळे
महाराष्ट्र राज्यात चौथा
थालीफेक


बालाजी जाधव
एन.सी.सी. विभागातर्फे
वर्ग प्रतिनिधी


सिद्वारेड्डी गोंडो
एन. एस. एस.

## ✲ विद्यार्थी संसद १९९५-९६ ✲


अशोक मष्णाजीराव गंदपवार
सचिव


राधा काकानी
वर्ग प्रतिनिधी


हानमंतकर मारोती सटवाजी
वर्ग प्रतिनिधी

## ✲ वर्ग प्रतिनिधी ✲


रश्मी अचमारे


शिवाजी हेंकरे


स्वाती गड्डमवार


सुदर्शन सरसर


मारोती कंधारे


रूपाली लिंबूरकर

मार्गदर्शक

**प्रा. प्रकाश देशमुख**

*



संपादक

दोंतुलवार मनोजकुमार विठ्ठलराव

*मराठी-विभाग*

## अनुक्रमणिका

● ताजमहाल की तेजोमहाल : १, ● स्वराज्य आले भ्रष्टाचार माजले : ३, ● सुधा तुजविना : ३, ● संस्था ह्या धंदा झालेल्या आहेत : ४, ● व्यथा : ५, ● मराठवाडा विभागात मत्स व्यवसाय विकास : ६, ● गुरू मोल वस्तू नाही या विश्वात : ८, ● पुन्हा सकाळ झाली : ९, ● कोकिळा : १०, ● फसवं प्रेम : १०, ● बेकार : १०, ● भावना : ११, ● सुगंध मातीचे : ११, ● माणुसकीचा बळी : ११, ● प्रिय प्रमोद : १२, ● प्रेम पत्र : १३, ● सरपंचकी : १४, ● बेकाराचे मनोगत : १६, ● आळवणी : १६, ● खळखळणारे आश्रु : १६, ● भेट : १७, ● सहवास : १७, ● न्याय अन्याय : १७, ● शेज : १८, ● न्यायाचा शोध : १८, ● दलाल : १८, ● इशारा : १८, ● विखुरलेल्या वाटा : १९, ● उद्ध्वस्त घरे : २५, ● वाड्यातल्या भाकरी : २६, ● जीवन : २९, ● खंत : २९, ● आजची दिवाळी : ३०, ● लक्षात असू द्यावे : ३०, ● तो दिवस : ३०, ● अनओळखी ओळख झाली : ३१, हा क्षण : ३१, ● नदी किनारी: ३१, ● आठवण प्रेमाची : ३१, ● विसरलेल्या आठवणी : ३२, ● व्यर्थ जीवन : ३२, ● जाग स्त्री : ३२, ● भूकंपातील दिवस : ३२, ● मृगजळ : ३३, ● स्त्रीत्व : ३३, ● हुंडाबळी : ३३, ● हिवाळी पावसाचे : ३३, ● शारदे : ३४, ● हीच चावते शंका : ३४, ● म्हणे विसरून जा : ३४, ● स्मृती : ३५, ● क्रूर तू होऊ नको : ३५, ● अनाथ : ३५, ● नकळत : ३५, ● स्वप्न जीवन : ३६, ● सांज : ३६, ● योग : ३६, ● हुरहुर : ३६, ● उणीव : ३६, ● जीवन : ३७, ● प्रतिक्षा : ३७, ● जडमन : ३७, ● लाचारी : ३७, ● दैव जाणिले कुणी : ३७, ● व्यथा : ३८, ● स्वप्नातल्या आसवांनो : ३८, ● भूक ३८, ● माणूसकीची हाक : ३८, ● दुष्काळ : ३९, ● ऊन : ३९, ● बदल : ३९, ● फुलपाखरू : ३९, ● जीवनरेखा :४०, ● कापलेले पंख : ४२, ● फक्त तुझ्यासाठी : ४२, ● शून्यातले जगणे : ४३, ● वेडे मन : ४४, ● कटपुतळी मृत्यू तिचा : ४५, ● क्षण : ४७, ● सहा डिसेंबर एक घटना : ४८, ● गुलमोहर : ४८, ● कविता : ४८, ● स्पंदन : ४८, ● काकांनी सरण पेटविले : ४९, ● स्वदेशी वापरा : ५१, ● नव वर्ष : ५३, ● अपुरे मीलन : ५३, ● करावे प्रेम असे : ५३, ● अशांत नागालँड : ५४, ● तुझ्या डोईवरच्या घटाने : ५५, ● जरबमा : ५५, ● उषा : ५६, ● नोकरी : ५६, ● संत ज्ञानेश्वरांचे जीवन आणि काव्य : ५६, ● पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांनी बांधलेल्या मंदिरावर एक दृष्टीक्षेप : ५७, ● कठीण होत आहे : ५८, ● प्रेमाचा झरा : ५८, ● तुझी भेट : ५९, ● अंधारातील दीपस्तंभ : ५९, ● मार्गदर्शक तारे : ५९, ● आठवण : ५९, ● तेच सांग तू मला : ५९, ● प्रतिक्षा : ६०, ● अंत : ६०, ● जळते काश्मीर : कृती हवी : ६०, ● सांगप्रिये : ६२, ● नयन : ६२, ● मायेच्या कुशीत : ६३, ● न-कळत : ६३, ● तोडगा : ६३, ● आंबराई आणि मैना : ६३, ● सुविचार (स्वामी दयानंद) : ६४, ● जात : ६४, ● डोंगराळ मोद : ६४, ● प्रेम पुष्प : ६४, ● गुलाबी तळ्यात : ६५, ● पाणी नसलेला देश : ६५, ● जगातील महापुरूष व त्यांचे कार्य : ६५, ● भारतीय इतिहास : ६६, ● गुपीत : ६७, ● ओढ : ६७, ● प्रिया : ६७, ● येऊ नकोस पुन्हा : ६८, ● दुरस्थ : ६८, ● होऊ नये :६८, ● निदान आता तरी : ६८, ● प्रतिक्षा : ६८, ● दूर जाणाऱ्या लाटांना : ६९, ● निरोप : ६९, ● वेचलेले मोती : ६९, ● राष्ट्रीय सेवा योजनेने मला काय दिले : ७०, ● चिंतनातून : ७२, ● प्राचीन ऐतिहासिक होट्टल : एक दृष्टीक्षेप : ७३, ● भारतीय रेल्वे विभाग : ७६, ● सुविचार : ७८, ● ज्ञानमंदिर : ७९, ● प्रेमरोग : ७९, ● मेरा भारत महान : ८०, ● जन्म : ८०, ● संबंध : ८०, ● शंका प्रदर्शन : ८०, ● कवी प्रश्न : ८०, ● (तो) अनुभव : ८१, ● स्वार्थी दुनिया : ८१, ● प्रेमाचा त्रिकोण : ८१, ● धक्का : ८१, ● उणीव : ८१, ● २१ वे शतक आणि आजचा युवक:८२, ● भ्रष्टाचार : एक विक्रुती : ८३.

# ताजमहाल की तेजोमहाल

**धनंजय भोळे**
बी. ए. द्वितीय वर्ष

इ.स. च्या आठव्या शतकात भारतात इस्लामी आक्रमणाची सुरूवात झाली. दुर्दैवाने या आक्रमकांना भारतीय संस्कृतीशी कधीच एकरूप होता आले नाही. केवळ पाशवी सैनिकी सामर्थ्याच्या बळावर त्यांनी भारतात उच्छाद मांडला. इथली धर्मसंस्थाने, मोठमोठी वास्तुशिल्पे यांची तोडफोड करून साऱ्या भारतात विध्वंसाचे थैमान घातले. काही शतकानंतर सुलतानशाही राजवट निर्माण झाली. सत्ता अनेक घराण्यांत फिरत असली तरी ती इस्लाम धर्मियांच्याच हातात होती. आपल्या दहशतीने त्यांनी मुळच्या भारतीय लोकांना निष्प्रभ करून टाकले होते. तर काही भारतीय लोकांना क्षणिक मोहाच्या आशेने इस्लामी सत्ताधाऱ्यांचे ''भाट'' बनले होते. अनेक मोठमोठी कामे या भाटांनी आपल्या हुजुरांच्या नावावर खपवायला सुरूवात केली. एखाद्या मोठ्या मंदिरात ताबा घेऊन त्या ठिकाणी मस्जिद केल्यानंतर ती मस्जिद आम्ही बांधून काढली. असा इतिहास [?] हे सत्ताधारी आपल्या तोंडपुज्यांच्या माध्यमातून उभा करीत आणि मग त्या भव्य कलाकृती इतिहासात मोगली राज्यकर्त्यांच्या नावे नोंदल्या गेल्या त्या आजतागायत तशाच आहेत.

जे लोक भव्य वास्तुशिल्पाची राखरांगोळी करीत होते आणि कलात्मक सौंदर्याला पायदळी तुडवत होते. त्यांच्या हातून असे भव्य वास्तुशिल्प साकारण कधीतरी शक्य आहे का...? आणि तेही भारतासारख्या त्यांनी कधीच आपला न मानलेल्या देशात.....? आग्र्याचा प्रसिद्ध ताजमहाल हा अशाच वास्तुपैकी एक आहे. शहाजहानने बांधला... शहाजहानने बांधला असा जो डांगोरा पिटविला जातो, तसे नसून तो त्याने बळजबरीने बळकावला आहे. राजपुत राजा ''परमार्थी देव'' याने बांधलेले ते एक ''शिवालय'' आहे. याबद्दल प्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. पुरूषोत्तम नागेश ओक हे शेकडो पुरावे सादर करतात. परंतु आमच्या तथाकथित धर्मनिरपेक्ष शासनाला त्यांच्या संशोधनाची कदर नाही हे आमचे दुर्दैव!

पुस्तकांमधील काही पुरावे अतिशय बोलके आहेत. ''हिंदूच्या दशावतारापैकी प्रमुख अवतारांनी शंकराची उपासना केली आहे. त्यांनी स्थापन केलेली शिवलिंगे भारतात आजही प्रसिद्ध आहेत. मात्र या अवतारातला सर्वात व्यवहारी अवतार भगवान श्रीकृष्णाने स्थापन केलेल्या शिवलिंगाचे अस्तित्व आज दिसत नाही. अतिप्राचीन भारतीय ग्रंथात श्रीकृष्णाने यमुनेच्या काठी शिवलिंग स्थापन केल्याचा उल्लेख आहे. हे शिवलिंग ताजमहालमधील शिवलिंग तर नसावे ना?

इस्लामी धर्मक्षेत्र व नद्या आणि हिंदू धर्मक्षेत्र व नद्या यांचा संबंध अभ्यासला असता बहुतेक सर्व हिंदू धर्मक्षेत्रे नद्यांच्या काठी आहेत. मुस्लिम धर्मक्षेत्राचे तसे नाही आणि ताजमहाल तर पवित्र समजल्या जाणाऱ्या यमुनेच्या काठी आहे यावरून काय तो बोध होतो.

''ताजमहाल'' या शब्दातला ''महाल'' हा शब्द मुस्लीतम संस्कृतीशी सामर्थ्य साधणारा नाही. ''ताजमकबरा'' किंवा ''ताजदर्गा'' असे काही असते तर गोष्टी निराळी होती. त्यापेक्षा ''तेजोमहाल'' चा ताजमहाल हा अपभ्रंश सुटसुटीत वाटला असावा. ''महाल'' हा शब्द राजपुत संस्कृतीशी जवळीक दाखवणारा आहे हे विसरून चालणार नाही.

शहाजहान हा व्यवहारात अतिशय चोख होता. त्याच्या जीवनातील अनेक लहानसहान घटनांची नोंद त्याने आपल्या रोजनिशीत ठेवली होती. परंतु ''ताजमहाल'' सारख्या चिरस्मरणीय इमारतीबद्दल त्याने काहीही

लिहून ठेवलेले आढळत नाही.

ताजमहालच्या बांधकामाला किती वर्षे लागतील? कारागीर किती लागलेत? याचा किती खर्च लागला? त्यासाठी लागणारा दगड कुठून आणला? या सर्व प्रश्नांच्या उत्तरासाठी शहाजहानच्या किंवा त्याच्या वजीराच्या रोजनिशीत फक्त कोरी पानेच आढळतात. लहानसहान नोंदी ठेवणाऱ्या या बादशहाने ताजमहालची नोंद न घ्यावी याचा अर्थ शहाजहानने ताजमहाल बांधला नाही असा होतो. याउलट शहाजहानच्या वजीराच्या नोंदीमध्ये एका राजपुत राजाकडून ''यमुनेच्या काठावरील भव्य शिवालय'' ताब्यात घेतल्याची नोंद आढळते. परंतु या शिवालयाचे पुढे काय झाले हे कळले नाही. शिवालय म्हणजे ताजमहालच तर नसावा?

ताजमहालाच्या बांधकामाबद्दल एक दंतकथा प्रसिद्ध आहे. ती अशी, ताजमहालचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर शहाजहानने सर्व कारागिरांना ओळीत उभे करून त्यांना भरपूर संपत्ती देऊन त्याचे हात छाटून टाकलेत. यामागे शहाजहानचा उद्देश असा की, अशी दुसरी वास्तू जगात निर्माण होऊच नये हा होता. याच दंतकथेत पुढे आणखी एका मुद्याचा उल्लेख आहे तो म्हणजे आपल्या सहकाऱ्यांना मिळत असलेले हे बक्षिस पाहून एक कारागीर उद्विग्न झाला आणि त्याने ताजमहालाच्या इमारतीत अशी काही मेख ठोकून ठेवली की ताजमहाल नेमका मुमताजच्या कबरीवरच गळतो. अनेक प्रयत्न करूनही हा दोष टाळता आला नाही. या दंतकथेचे बारकाईने परीक्षण केल्यास ही कथा केवळ कल्पोलकल्पित असल्याचे लक्षात येते. सत्य झाकण्याचा केलेला हा उत्कृष्ट प्रयत्न होय. जर शहाजहानने ताजमहाल बांधला असता तर त्यासाठी शेकडो कुशल कारागीर मिळवता आले असे गृहीत धरले तर हा लहानसा दोष दूर करण्यासाठी त्याला संपूर्ण भारतातून एकसुद्धा कारागीर सापडू नये हे आश्चर्य नव्हे तर काय?

पु. ना. ओकांच्या म्हणण्यानुसार ताजमहालमधील कबरीवर थेंब थेंब पाणी गळणे म्हणजे दोष नसून योजनापूर्वक केलेली रचना आहे. कारण ताजमहाल हे एक शिवालय होते आणि शंकराच्या पिंडीवर थेंब थेंब पाणी गळणे हा शिवपुजेचा एक अविभाज्य भाग आहे. शिवालयातील पिंड हलवून त्या जागी कबर बांधल्याने थेंब थेंब पाणी गळणे थांबले नाही आणि म्हणूनच एक सुंदर दंतकथा तयार करून सत्य झाकण्याचा प्रयत्न लोकलज्जेस्तव तत्कालीन राज्यकर्त्यांना करावा लागला.

ताजमहाल म्हणजेच पूर्वाश्रमीचा ''तेजोमहाल'' होय. पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात तो अप्रतिम चकाकतो. सूक्ष्म निरीक्षण करणाऱ्याच्या लक्षात येईल की, ताजमहालावरील चांद ताजमहालइतका अप्रतिम चकाकत नाही. शिवालयावर असलेल्या त्रिशुळाची मधली दांडी मोडून त्याचा ''चांद'' बनवतांना पसरलेले पोचे यासाठी कारणीभूत नसावे ना? ही बाब सामान्य जनतेच्या लक्षात चटकन येत नसली तरी संशोधकांच्या नजरेतून सुटत नाही हेही तितकेच खरे.

ताजमहालाच्या काही शिल्पकलेमध्ये कमळाच्या फुलाचा अंतर्भाव आढळतो. काही ठिकाणी मंगल कलशही कोरलेले आढळतात. कलश आणि कमळ यांचा मुस्लीम संस्कृतीशी काय संबंध? हा प्रश्न पु. ना. ओक विचारतात. अशा विवादास्पद कलाकृती ज्या भागावर कोरल्या आहेत तिथे जाण्याची परवानगी प्रवाशांना नाही हेही विशेष. त्याच प्रमाणे ताजमहालाच्या अंतरंगाबद्दल गुढाचे वातावरण आहे. सदोदीत त्या ठिकाणी मोठमोठी कुलूपे दरवाजाला लावलेली असतात. ताजमहालाच्या तळघराचे आणि ताजमहाल समोरील तलावाचे परीक्षण केल्यास यासंबंधी अनेक गोष्टी स्पष्ट होतील असा इतिहासकारांचा दावा आहे. परंतु भारत सरकार अशा संशोधकांना परीक्षणासाठी परवानगी देत नाही हे केवढे दुर्दैव!

ह्या संबंधात अंतिम सत्य काय आहे याची माहिती हवी असल्यास संपूर्ण ताजमहालच्या सूक्ष्म परीक्षणांची [संशोधकांकडून] आवश्यकता आहे आणि कोणतेही

संशोधन हे धर्म पंथ देश कालातीत केले गेलेच पाहिजे कारण संशोधन करणे म्हणजेच सत्य काय होते हे शोधून काढण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न होय. लोकांनीही संशोधकाने सिद्ध केलेल्या प्रमेयाचा स्वीकार केलाच पाहिजे. केवळ धर्मांधतेमुळे ते सत्य अस्वीकृत करणे म्हणजे त्या संशोधकाने जीवापाड केलेल्या परिश्रमावर अविश्वास दाखविणेच होय.

•••

## स्वराज्य आले भ्रष्टाचार माजले

माणसा माणसा उठ आता
होती इथे परकीयांची सत्ता
झाले इथे थोर सानं
होती त्यांची किर्ती महान
त्यांनी केले भारताचे रक्षण
म्हणून झाले स्वातंत्र्यास संरक्षण
आज मानुसाची बनली स्वार्थी प्रवृत्ती
त्यांनी माजवली माणसात विषाची प्रवृत्ती
म्हणून माणसास ओळखण्यास नाकारतो
पैसा माणसापासून मानसास दूर करतो
मानवी हक्काचे झाले भक्शन
मालक करतो भावाचे भक्शन
प्रेमाची भावना राहिली नाही
माणसाचे रक्षण होणार नाही
माजला इथे भ्रष्टाचार
गरीब जनता बनली लाचार
स्वार्थी मानूस बनला श्रीमंत
गरीबास लाभले जूलमात अंत
त्याने न्याय, सत्ता विकली बाजारी
त्यामुळे समाज बनला बेकारी
श्रीमंताने श्रीमंती मिळवली
गरीबाने जवळ फक्त गुलामगिरी बाळगली
माणसा माणसा उठ आता
होती इथे परकीयाची सत्ता

**गजानन भागवतराव राजूरकर**
बारावी (इ. टी.)

## सुधा तुजविना

सुधा तुजविना.....
तुझे नि माझे नाते प्रेमाचे
तुझ्यात माझे जीवन होते
आपले एक जुटलेले प्रेम
जोडीला नजर लागली कुणा दुष्टाची
सुधा तुजविना.....

ये सुधा तुज विना झालो मी अधुरा
तुझ्याच भेटीची मला लागली उत्सुकता
अजून डोळे भरूनी पाहू इच्छितो तुजला
सुधा तुजविना.....

सुधा स्वप्नात येते तू रोज माझ्या
प्रेमाचा स्पर्श करून जाते मनाला
सुधा येता तुझी आठवण
डोळे भरती माझे आश्रुनी
सुधा तुजविना.....

एकमेकांच्या आठवणी जपीत
जगत आहे त्या स्वार्थी दुनियेत
सुधा तुच मला समजू शकतेस
सुधा तुच माझा सहारा आहेस
ये सुधा आता तरी ये
सुधा तुजविना...

**धनंजय भोळे**
कला, द्वितीय

# संस्था ह्या धंदा झालेल्या आहेत

**कोनापुरे तुकाराम मुंजप्पा**
एम. ए. (मराठी) प्रथम वर्ष

आजच्या शिक्षण संस्थांमध्ये एक प्रकारचा व्यापार झालेला आहे. संस्था ही एक मोठे चरण्यासाठी हिरवे कुरण झालेले आहे. संस्थेमार्फत भ्रष्टाचार केला जात आहे. होस्टेलला मूलं असतात पंधरा आणि बजेट उचलतात पाचशे मुलांचं, एखादी जागा भरावयाची असल्यास कारकुनाची असेल तर ६०,०००/- रू. आणि प्राध्यापकाची असल्यास १००,०००/- रू. असे सूत्र बनलेले आहे. मग तो प्राध्यापक बैल का असेना चालेल. पण पैसा हवा. पैसा पुढे असले की बैलही चालतील. गुणवत्ता, बुद्धी हुशार असून पैसा नसणारा गरीब सुशिक्षित हा गल्लीने भटकत आहे. एखादा सेवक घ्यावयाचा असेल तर त्याच्याकडून ३०,००० ते ३५,०००/- रू. डोनेशन घेतल्या जात आहे. तर हे तुमच्या बापाची प्रॉपर्टी आहे. गव्हरन्मेंटचा पैशावर संस्था चालतात मग तुम्ही कशाला पैसे घेता?

संस्थेचे डायरेक्टर संस्थेला आले तर त्यांच्या गाडीचा खर्च, त्यांनी केलेला फराळाचा खर्च, दारू पिता, कोंबडे खाता, पाच पाच मजली बिल्डींग बांधता हे पैसा संस्थेला येणाऱ्या बजेटमधून हे आपले असे पोट भरतात. येणाऱ्या बजेटमधून हे आपले असे पोट भरवतात अशा भ्रष्टाचाराने बरबटून चालल्या आहेत ह्या संस्था शिक्षण संस्थेचा वापर आपला एक प्रकारचा व्यवसाय म्हणून उपयोगाला आणल्या आहेत तर अशा कॉलेज संस्थेचे बजेट संस्था चालकाच्या घरात जात आहे आणि खोटे नाटे दाखवून सरकारला बेवकूफ बनवून हे बजेट हाडप करत आहेत तरी ह्या कॉलेजच्या बजेटचा उपयोग कॉलेजसाठी केला पाहिजे.

कॉलेजचे कर्मचारी सेवक वर्ग हे कॉलेजला कामावर नसून ते डायरेक्टरच्या घरी, प्राचार्यांच्या घरी पाणी भरत आणि त्याच्या बायकांचे लुगडे, साड्या धुण्यासाठी त्यांचा उपयोग केला जात आहे. आणि काही प्राध्यापकांना मळ्यात काम करणाऱ्या मजुरांवर नियंत्रण ठेवण्याचे काम करावे लागत आहे. ते संस्थेवर जाऊन विद्यार्थ्यांना शिकवू दिले जात नसून त्याच्या घरचे काम करावे लागत आहेत. प्राचार्यांची नेमणूक जी-जी म्हणणाऱ्या माणसाची, संस्थेच्या अध्यक्षांच्या हातातील कठपुतली बाहुली सारखा तो काम करत असतो. प्राचार्य एक प्रकारच्या रबरी स्टॅम्प म्हणजे प्राचार्य होय. अशाच माणसाची नेमणूक प्राचार्य म्हणून केली जाते मग तो निरबुद्ध का असेना. एखादे वेळेस चुकून इमानदार प्राचार्य पदावर येतो आणि संस्था प्रमुखाला भ्रष्टाचार करण्यात आड येतो आणि आपणाला पैसा खाऊ देत नाही म्हणून संस्था प्रमुखाने त्याच्यावरतीच भ्रष्टाचाराचे शिक्का मारून निलंबित केला जातो. ''पतीव्रतेच्या गळ्यात धोंडा, वेश्येला मणीहार'' असे कॉलेज डायरेक्टरचे भ्रष्ट डायरेक्टर झाले आहेत.

तपासणी अधिकारी येतात आणि ते मुर्गा, बियर झोडून पैसे घेऊन जातात. खाजगी मेडीकल्स कॉलेजला डोनेशन भरमसाठ घेतले जात आहे. डॉक्टर्स होण्यासाठी आठ ते नऊ लाख रूपये खर्च येतो तर त्याचे नऊ लाखाची वसुली करण्यासाठी अनेक गरीबांच्या मुंड्या मोडून आपली मान डबर करण्याचा प्रयत्न करतो. बुद्धी नसून राखीव डॉक्टर्स, इंजिनिअर्स होत आहेत. तर त्यांना कशाचेही ज्ञान नसते. त्याच्या रूग्णालयामध्ये पेशेंटस उभे जातील आणि येतांना आडवे निघतील असे परिणाम ह्या संस्थेच्या डोनेशन्समुळे होत आहे.

ह्या संस्था कुणाला मिळत आहेत तर एखाद्या मंत्र्याच्या जावयांना, आपल्या नात्या-गोत्यातल्या माणसांना हे संस्था देतात. दुसरे ह्या देशात कोणी कोणाचे नाहीत की वेगवेगळ्या मार्गाने हे राजकारणी सत्ताधिशांनी पैसा आपल्याकडेच वळवतात. ते योजना दुसऱ्या कोणाला

न मिळता आपल्याच कोणाला तरी मिळाल्या पाहिजे असे प्रयत्न करतात आणि ते गिळून मिसळून भ्रष्टाचार करतात. तरी ह्यांच्यावरती प्रतिबंध घालण्यासाठी जनतेने जागे झाले पाहिजे. सत्ताधाऱ्यांचेच का कॉलेजेस आहेत. ते तुम्हाला निवडणुकीच्या काळामध्ये ते शैक्षणिक संस्था पैसा पुरवत असतात असा हा संस्थेचा व्यापार थांबवला पाहिजे. जरी करता निवडणुकामध्ये पडल्यास काय करावे, काय भीक मागावी काय म्हणून ते निवडणुकीमध्ये झालेल्या खर्चाची भरपाई करण्यासाठी ह्या संस्थेचा उपयोग करून घेतला जातो आणि उभा टाकतांना निवडणूक लढवण्यासाठी, पैसा जमविण्यासाठी पूर्ण संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा एका एका महिन्याचा पगार नेऊन द्यावा लागतो. त्या संस्थेच्या प्रमुखासनी उभा टाकायचे असेल तर संस्थेचा पैसा पडल्यास आपला खर्च भरून काढण्यासाठी आज काही संस्थेना मान्यता मिळतात ते ह्या राजकारणी पांढरपेशी पुढाऱ्यांनाच ह्या राज्यकर्ते ह्यांचा एखादा साथीदार पडला म्हणून तुम्हीही सत्तेवरून धावून मदत करता आणि त्याचा नुकसानीची परतफेड करतात. अशा तऱ्हेने संस्था भ्रष्टाचारी लोकांनाच मिळतात आणि ह्याचे भ्रष्टाचारी भाऊबंद यांना मदत करतात. आणि ह्या संस्था आपल्या बापाच्या मालकीच्या समजतात कशाला म्हणता आमची संस्था, ह्यांची संस्था? आपला भारत देश स्वतंत्र होऊन ५० वर्षे झाले तरी आमच्या भारत देशाची स्थिती सुधारू दिलेली नाही. पहिले विदेशी आता देशी !

•••

## व्यथा

स्वप्नाच्या त्या कल्पनेला,

रात्रीच जाग आली

पाऊसाच्या त्या सरीने

चुंबन घेतले वसंतऋतूंनी

वसंतऋतुच्या मनमोहीत प्रेमाने

फुलली कळी वेगाने

फुलताच हसविले वाऱ्यांनी

मिटवून डोळे वेलीनी

बहरून आली रूपानी

फुल सांगे आपली कथा

जाणेना कुणीच तीची व्यथा

मी दिसते सदा सर्वदा

दाखवे कुणीही आपलीच सत्ता

वाऱ्यांच्या त्या वादळांनी

तोडीले मला आपलुकीनी

स्वतःच्या क्षणभंगूर सुखासाठी

घाव घातला तिच्या पाठी

मातीच्या त्या धुळीनी

संपविले मला पायदानी

काय केले फुलांनी

केली ही दयना तिची तुम्ही लोकांनी

आनंदीत करते तुम्हासी

दुःख आणले तिच्या पदरासी

**गजानन भागवतराव राजूरकर**
बारावी (इ. टी.)

# मराठवाडा विभागात मत्स्य व्यवसाय विकास

संकलन **येरावार बालाजी**
बी. एस्सी. द्वितीय वर्ष

प्रिय विद्यार्थी मित्रांनो, मला या विषयावर चार बाबी संकलन करून ''अभिप्राय'' च्या स्वरूपाने तुमच्यापुढे मांडतांना फार आनंद होत आहे.

मराठवाडा विभागात औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, नांदेड, उस्मानाबाद व लातूर यात सात जिल्ह्यांचा समावेश आहे. या जिल्ह्यातील काही भागातून गोदावरी, पूर्णा, पैनगंगा, दुधना, सिंदफना, मनार, सिना, आसना व मांजरा या प्रमुख नद्या वाहतात.

**जल विस्तार :-**

कोणत्याही भागात मत्स्य व्यवसायाची भरभराट होण्यासाठी जल विस्ताराची अतिशय गरज आहे. त्या दृष्टीने शासनाच्या वतीने मराठवाडा विभागातील प्रमुख नद्या व त्यांच्या उपनद्यावर लघु, मध्यम व मोठे सिंचन तलाव बांधण्यात आले आहेत. विभागात पाटबंधारे, जिल्हा परिषद, नगर परिषद, ग्राम पंचायत इत्यादी असे एकूण ३१८४ तलाव/ जलाशय असून मत्स्य व्यवसायाकरिता ९८०१५ हेक्टर एवढी जलक्षेत्र उपलब्ध आहे. विभागातील सर्व जलाशयात इष्टतम प्रमाणात मत्स्यबीज संचयनाकरिता १६२४.६२ लाख मत्स्य बिजाची आवश्यकता आहे. या सर्व बाबी चालविण्याकरिता स्वतंत्र असे मत्स्य व्यवसाय विभाग स्थापन करण्यात आले आहे.

मत्स्य व्यवसाय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आहेत. त्यापैकी मुख्य योजनेचा अभ्यास आपण पुढील प्रमाणे करू.

**मत्स्यबीज उत्पादन केंद्राची स्थापना :-**

मत्स्यबीज उत्पादन केंद्राची स्थापना करण्यामागे विविध कारणे आहेत. एका सर्वेक्षणातून असे आढळून आले आहे की, मत्स्यबीज केंद्राची जितकी जास्त संख्या राहील, तितकेच माशांचे उत्पादन वाढेल, जेणे करून आपल्याला अधिक प्रमाणात पैसा कमावता येईल.

मराठवाडा प्रदेशात सात जिल्ह्यात मत्स्यबीज निर्मितीसाठी १३ मत्स्यबीज केंद्रे बांधण्यात आले आहेत. त्यांचे एकूण क्षेत्रफळ १४५.८७ हेक्टर असून पैकी ४६.५५ हेक्टर जलविस्तार आहे. सदरच्या १३ केंद्रांपैकी ९ केंद्रांवर प्रगत तंत्राचा उपयोग करून मत्स्यबीज उत्पादन करण्याकरिता ''हॅचेरी'' संकुलाची स्थापना करण्यात आली आहे. वरील नऊ केंद्रांवर उत्पादीत मत्स्यबीजे सर्व १३ केंद्रांवर मत्स्यबीज/ मत्स्य बोटुकली अवस्थेपर्यंत संगोपन/ संवर्धन करण्यात येते. मागील तीन वर्षांत विभागात उत्पादीत प्रमुख कार्य (छटला, रोहू, मृगळ) मत्स्यबीजे व मत्स्यबीजाचा तपशील वर्षनिहाय खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | मत्स्यबीज निर्मिती [लाखात] | मत्स्यबीज उत्पादन [लाखात] |
|---|---|---|
| १९९२-९३ | १६३४.१० | ९९८.८९१ |
| १९९३-९४ | २२३५.२० | ९२४.८५५ |
| १९९४-९५ | ३१४३.५० | ९८३.५४१ |

विभागातील सर्व मत्स्यबीज उत्पादन केंद्राची मत्स्यबीज उत्पादन क्षमता जवळजवळ २५०० लाख मत्स्यबीजाची असून ती गाठण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

**मत्स्य संवर्धन विकास संस्था :-**

कोणत्याही व्यवसायात सहकाराला फार महत्त्व असून या व्यवसायात देखील इतर व्यवसायांप्रमाणे सहकारी संस्था चढाओढीने भाग घेतांना दिसून येते. या विभागातील अशा संस्थांना मत्स्य संवर्धन विकास संस्था असे म्हणतात. या संस्था केंद्र सरकार पुरस्कृत असून या योजनेअंतर्गत विभागातील प्रत्येक जिल्ह्यात १०० हेक्टर जलक्षेत्राचे १० ते २० हेक्टरच्या आतील तलाव सधन मत्स्य संवर्धनासाठी निवडले जातात. मच्छीमारांना प्रशिक्षण देऊन मत्स्य कास्तकार तयार करणे. मत्स्य संवर्धनासाठी स्वत:च्या शेतात तलाव तयार करण्यासाठी रू. २०,०००/- प्रति हेक्टर व खते, खाद्य व बोटुकली संचयनासाठी रू. ४०००/- प्रति हेक्टर एवढे अनुदान देण्यात येते. मत्स्य संवर्धनामध्ये उत्पादनापासून विक्रीपर्यंत सर्व अंगाची संबंधित बाबींच्या कामात एक सुविधा आणून मत्स्य उत्पादनात वाढ करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

**मच्छीमार लोकांना/ युवकांना प्रशिक्षण :-**

या व्यवसायातील विविध मुख्य बाबींपैकी मच्छीमार युवकांना प्रशिक्षण देणे तितकेच महत्त्वाचे आहे. या योजनेअंतर्गत मच्छीमार सहकारी संस्थाच्या मच्छीमार युवकांना मासेमारी, मत्स्यबीज उत्पादन व संगोपन व मत्स्य विक्रीच्या प्रगत तंत्राची माहिती व प्रशिक्षण देण्यात येते. मागील तीन वर्षांत प्रशिक्षण देण्यात आलेल्या युवकांची संख्या वर्षनिहाय खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|
| १) | १९९२-९३ | १३५ |
| २) | १९९३-९४ | १५५ |
| ३) | १९९४-९४ | १४८ |

**मासेमारी साधनांच्या खरेदीवर अर्थसहाय्य :-**

मच्छीमार युवकांना प्रशिक्षण दिल्यानंतर त्यांना मासेमारीसाठी लागणाऱ्या साधनांवर अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेअंतर्गत सहकारी संस्थेच्या मच्छीमार सभासदांना मासेमारी साधनांच्या (नायलॉन सुत/ जाळी व होड्या) खरेदीवर शासनामार्फत नायलॉन सुताच्या किंमतीच्या ५०% प्रति मच्छीमारास ५ किलो प्रमाणे अर्थसहाय्य अनुदान रूपाने देण्यात येते. या योजनेअंतर्गत मच्छीमारांना पुरवठा करण्यात आलेल्या नायलॉन सुत/ जाळी व होड्यांचा मागील तीन वर्षांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | नायलॉन सुत/ जाळी | होड्या [किमान] |
|---|---|---|---|
| १) | १९९२-९३ | १९८६.२५८ | ४ |
| २) | १९९३-९४ | १३८०.३१० | ——— |
| ३) | १९९३-९४ | १०३३.१२५ | २ |

**अवस्थब्ध पाण्यात मत्स्य संवर्धन :-**

विभागातील तलाव जलाशयात विविध योजनेअंतर्गत खात्यामार्फत तसेच तलाव ठेकेदाराकडून मत्स्यबीजाचे संचयन करण्यात येते. विभागात मागील तीन वर्षांत करण्यात आलेले मत्स्यबीजाचे संचयन व त्यापासून मिळालेले मासळीचे उत्पादन वर्षनिहाय खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | मत्स्यबीज संचयन [लाखात] | मत्स्य उत्पादन [मे. टन] |
|---|---|---|
| १९९२-९३ | ३१०.६७५ | १४५५० |
| १९९३-९४ | ३९१.८७३ | १२५६२ |
| १९९४-९५ | २९६.००० | १४९४२ |

**कोळंबी संवर्धन :-**

विभागातील मत्स्य कास्तकार व मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांना गोड्या पाण्यातील कोळंबी संवर्धनासाठी उत्तेजन देण्यात येत आहे व हा उपक्रम उत्तम रीतीने यशस्वी होत आहे.

**प्रस्थापित मत्स्य व्यवसाय विकास योजना :-**

मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाकडे मत्स्य व्यवसायाच्या विकासासाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर केलेला आहे.

एकंदरीत युवकांनी या व्यवसायात पडून प्रगती करावी. शासनाच्या अनेक योजनांमुळे या व्यवसायात प्रगती होणे स्वाभाविक आहे.

●●●

# गुरू मोल वस्तू नाही या विश्वात

**गजानन भागवतराव राजूरकर**
बारावी (इ. टी.)

आम्ही ज्ञान घेतो. त्या ज्ञानाच्या जोरावर भर आकाशात भरारी मारतो. ज्ञानाच्या जोरावर जग जिंकतो. आपल्या मनातील स्वप्नांची पूर्तता करतो. पण आपल्याला घडविणाऱ्या शिल्पकारास आपण विसरतो. प्रतिष्ठेच्या, मानाच्या त्या शिखरावरून आम्ही माणुसकी विसरतो.

या सर्व गोष्टीत गुरूचा फार मोलाचा वाटा असतो. आईवडील जन्मास घालतात पण घडवितो आपणास गुरू. आपल्याजवळ असेल तेवढे ज्ञान तो आपल्याला देतो. जगात ताठरपणे अन्यायाविरूद्ध, हक्कासाठी लढण्यास तो शिकवितो. त्याला गरीब, श्रीमंत असा भेदभाव कधीच दिसत नाही. सारे त्यांना आपल्या मुलासारखेच असतात. ते आपल्याला घडविण्यास कुठलीच कमतरता ठेवत नाहीत. ते आम्हास मारतात — का मारतात? त्यात त्यांचा काहीच स्वार्थ नसतो. आपण शिक्षण घेतो. गुरूदक्षिणेच्या स्वरूपात त्यांना काय देतो? काहीच नाही. उलट त्यांना नावे ठेवतो. त्यांनाही काही लागत नाही. फक्त हवे असते तपाचे, कष्टाचे सार्थक. ते पण आपल्याच जीवनासाठी. त्याच्या बदल्यात आपण कित्येक वेळा गुरूचे मन दुखावतो. गुरूने मारल्यास त्यांच्यावर आपणही हात उंचविण्यास तयार असतो. आपण त्यांना काही जरी बोललो तरी ते आपल्या मुलाप्रमाणेच आपली चूक पोटात घालतात. सदासर्वदा प्रेमाने बोलतात. त्यांना फक्त एवढीच अपेक्षा असते की आपलं भलं व्हावं. या सृष्टीत तलावावर असे हे नि:स्वार्थी गुरू. जो आपणास आई-वडिलांच्या स्वरूपी असतो. गुरू मोल वस्तू नाही या विश्वात. आपण मात्र त्याच्याकडून घेतलेल्या ज्ञानाच्या सागराहून बघता-बघता दूर कुठेतरी निघून जातो. सर्व काही कमावतो. आपले एखादे घरटे उभारतो. गुरू फक्त ज्ञानाचे देवाण-घेवाण यातच मग्न असतो. आयुष्याचे सारे क्षण आपल्यासाठीच वेचतो. स्वत:च्या घरट्याकडे पाहण्यास देखील त्यांना वेळ नसतो. त्यांच्याजवळ त्यांची संपत्ती ज्ञानात गुंतलेली असते. आपण मात्र त्याच ज्ञानाच्या जोरावर खोट्या संपत्तीच्या मागे लागतो. कित्येकाचे घरटे मोडतो. खोट्या संपत्तीसाठी देशात दहशत निर्माण करतो. देशात भ्रष्टाचार पसरवितो. स्वार्थी मनामुळे ज्ञान, अधिकार बाजारात विकतो. फूट पाडतो कित्येकांच्या संसारात.

गुरू जवळ असते ज्ञानाची तिजोरी पण चाव्या असतात आपल्या हाती. ते उघडविण्यास कष्ट, श्रम, मेहनतची जरूरी, त्याच्या मनात ज्ञानाचा ठेवा असतो. आपल्या मनात स्वार्थीपणाचा ठेवा असतो. म्हणूनच आपणास विश्वातील कोणतीही व्यक्ती विकत घेऊ शकते. त्या गुरूची देवस्वरूपी महिमा असते अथांग सागरी. गुरूजवळील ज्ञानाचा साठा हीच खरी संपत्ती असते. ती कधीच संपणारी नसते. आपली संपत्ती ही क्षणभंगूर सुख देणारी असते. म्हणून गुरूस कधीच कोणत्याही दडपणाखाली मान झुकविण्याची पाळी येत नाही.

●●●

# पुन्हा सकाळ झाली!

**कांबळे मिलींद के.**
बी. ए. द्वितीय वर्ष

ह्या सकाळला थोडी फार शरम वाटत नसेल का? आजकाल मी शरमेला आहे, म्हणून तिलाही शरम वाटावी, असं सक्तीचं नाही म्हणा. पण माझ्या शरमेला हीच सकाळ कारणीभूत आहे, असा माझा दावा आहे.

ह्या सकाळचं कार्य काय? ती अनेक नवे दिवस आणते. कित्येकांसाठी उत्तुंग सुयशाचा दिन ती आणते, अनेकांसाठी आनंदी क्षणांनी मुसमुसलेला दिन ती आणते, पुष्कळांना अनेक किंमती वस्तूंच्या खरेदीचा दिन ती आणते. पण ह्या सकाळची माझ्यावरच अशी वक्रदृष्टी का बरी असावी? अहो, एक किंवा दोन नाही - तब्बल सहा महिने झाले, मला चपलांची एक नवी जोड खरेदी करायची आहे. केवळ ह्या सकाळच्या वक्रदृष्टीमुळे ही माझी इच्छा काही पूर्ण होत नाही, असं दिसतंय. तुम्ही म्हणाल सध्या हा काय अनवानी पायानेच फिरतोय? नाही. हे तर मला मुळी खपतच नाही. कॉलेजचा विद्यार्थी अन् अनवाणी. छे!

सध्या माझ्या पायात चपला [?] आहेत. वय पावणे दोन वर्षे त्यांचं. सांगण्यासारखी गोष्ट ही की १९९२ च्या दिवाळीच्या आधी ह्या चपला मी गावी केवळ पंचवीस रूपयात बांधल्या. हो, केवळ पंचवीस रूपयात! चर्मकाराच्या म्हणण्यानुसार एअरसोलच्या. एक वर्ष माझ्या पायात 'त्या' शोभल्या. सध्या त्यांचा चेहरामोहरा पार बदलून गेलाय. अनावधानानं थोडसं पाणी पडलं अन् अनावधानानं उन्हात ठेवलं की बस्स! त्यांच्या सौंदर्याला [?] नुसत पहातच बसावं. तुम्ही म्हणाल - चपलांसारख्या गोष्टीवर हा उगीच का बरे आपला अमुल्य वेळ वाया घालत असावा. हांऽऽऽ आता मूळ विषयावर आलो पहा. विषयाला कशी सुरूवात करू गडे, वाटत होतं. शेवटी वाट मिळाली. हे पहा, माझ्या चपलांचं 'फक्त' सौंदर्य ओसरलं आहे! तथापि त्या अतिशय मजबुत व तंदुरूस्त स्थितीत आहेत. अन् हां, हेच कारण आहे की ज्याच्यामुळे मी नवीन चपला घेऊ शकत नाही. मला आता पश्चाताप होतोय. आरंभी उगीच मी सकाळवर कोसळलो होतो!

असं म्हणतात की, माणसाला दोन मने असतात. माझं शुद्ध रसिक मन म्हणत - 'ह्या चपलांवरच तू किती दिवस भागवणार? कमीत कमी त्या चपलांच्या मनाचा तर विचार कर. वापरण्याजोग्या असतांना त्या स्वत: तुझ्या चरणकमलांच्या [?] सेवेसाठी तयार होत्या. आता त्यांचं वय होत आलंय. तूच पहाना - त्यांची कमर किती वाकली आहे?' हे मला पटायला लागतं. अन् लगेच दुसरं व्यवहारी मन म्हणत - 'ए, त्यांची कमर वाकलीय? अरे, अजून सहा महिने तू या चपला वापरू शकतोस.'

या दोन मनांमध्ये मी मात्र बावरलोय.

मला माझ्या पहिल्या मनाविषयी खूप सहानुभूती आहे. तथापि, नकळत मी माझ्या व्यवहारी मनाचे म्हणणेच अंमलात आणीत आहे. मी सध्या शरमेला आहे, म्हणत होतो ना. त्याचं असं आहे -

आपल्या कॉलेजातील मुली बहुतेक खालमान्या आहेत. ही गोष्ट तर मला इतकी भेदरून टाकते, म्हणून सांगू. एखादी मुलगी अशी खाली मान घालून चालत असली की वाटतं - बापरे, ही मुलगी माझ्या चपलांकडेच पहात आहे! अहो, मुलींच्या एखाद्या घोळक्यात जोराची खसखस पिकली की वाटतं तिथंही माझ्या चपलांचाच विषय चालू आहे. सध्या केव्हाही माझ्या डोक्यात चपलांचंच वारं सळसळत असतं.

कालचीच गोष्ट. रूमवर एक बुटपॉलीश करणारा मुलगा आला होता. माझ्या एका मित्राच्या पायात 'काळ्या' पॉलीशच्या चपला पाहून तो त्याला 'साब-साब पॉलीश' म्हणून विनवू लागला. पण मित्र काही त्याच्याकडे लक्ष देईना. मला त्या मुलाची कीव आली. वाटलं, माझ्या चपलांनाही काळ्या पॉलीशचीच आवश्यकता आहे. पॉलीशनंतर थोडा चपलांचाही चेहरा-मोहरा बदलून जाईल. चपला त्या मुलाकडे सरकवत मी दिमाखाने त्या मुलाला म्हणालो, 'दोस्त, मेरी चप्पल को पॉलीश कर,' तो मुलगा खुष झाला खरा, पण तात्काळ त्याच्या चेहऱ्यावरची खुषी नष्ट झाली. तो विनम्रपणे उत्तरला, 'साब, मेरे पास काली पॉलीश नही है!' आता मात्र हद्दच झाली हं. मला हसू आवरेना. माझ्या मित्रांच्याही वस्तुस्थिती लक्षात आली. अन् आम्ही सगळे खो-खो हसू लागलो.

'हम' चित्रपटात कादरखान एका प्रसंगात अमिताभला म्हणतो, 'अगर आदमी की हैसियत पहचाननी हो तो उसके सुरत की तरफ नहीं, जुतों की तरफ देखना चाहिए' अमिताभचे बूट फाटलेले असतात. माझ्या हृदयाला मोठी इजा झाली. आज गुढीपाडव्याच्या शुभदिनी मी असा दृढनिश्चय करतोय की, आजच्या आज नवीन चपला विकत घेईन व फक्त सहा महिन्यात त्या बदलवीन!

•••

## कोकीळा

कोकीळ
काळी काळी
आंब्याच्या
डहाळीवरी
गाते
गोड गाणी
वसंताची
चाहूल
हिला कशी लागली
निर्मात्याने
सौंदर्यापासून
पारखी जशी केली

**माधव खडके देगांवकर**

## फसवं प्रेम

तुझ्यासाठी सर्वस्व विसरलो,
तुच मला विसरली
जिवापेक्षा प्रेम समजलं
पण प्रेमाविना जीवन जाणवलं
स्वप्न पाहिली जीवनाची
जागा झालो नाही प्रेम तुटण्याआधी
जीवनाचा एक आधार स्तंभ दिसला
त्यात माझा जीव अटकला
नाही सोडणार तुला ग
शपथ माझ्या प्रेमाची
आतापर्यंत पाहिलसं प्रेम
दोष माझा नाही ग
मृत्यूशी ही खेळ रचविली
त्यात जाणं तुला भाग ग
नाही करणार कुणी फसवं प्रेम
याची मला खात्री ग!

**व्यंकटरमना बालकिशन अमृतवार**
बी. ए. द्वितीय वर्ष

## बेकार

फिरतो आहे कुत्र्यासारखे
शिक्षण घेतले विद्वानासारखे
वाटते आता शिक्षण बंद करावे
मिळेल त्या नोकरीत मन गुंतवावे
म्हणून टाकले शिक्षण बाजूला
अन लागलो नोकरीच्या शोधात फिरायला
फिरता फिरता पाय थकतात,
जमिनीला घासून चपला झिजतात.
जाहिराती निघतात, दिलासा देतात
येतात कॉल इंटरव्ह्यूचे,
कानात मात्र शब्द घुमतात डोनेशनचे
डोनेशनचा आकडा ऐकून येते जोरात चक्कर
थांबतो घटकाभर एकाच जागेवर
मनाला भीती वाटते, आता असेच होणार
उरलेले आयुष्य असेच जाणार...!

**हाळदे एस.**
बी. ए. प्रथम वर्ष

## भावना

तू समोर आलीस
अन झिरझिरीत भावना
मनातून ताटावत गेल्या
एकदम सारं आठवलं
त्या सुगंधी भेटी
ते मोरपंखी दिवस
माझ्या आयुष्यात क्षितिजापर्यंत
पांढरं बर्फ पसरून
तू निघून गेलीस
जाताना त्या बर्फावर
निदान स्पर्शाची आग तरी
लावायची नाहीस
मला वाटतं....
मोरपिसं सुंदर असतात
पण त्यावर कुंकू लावून
ती जिवंत करण्याचा
का कुणी प्रयत्न करतो...?

**कांबळे रवि**
बी. ए. तृतीय वर्ष

## सुगंध मातीचे

पहाटेच्या रम्य सकाळी
उमलली कालची कळी
सूर्य किरणासमान
आले त्याना उधान
चढविली पोषाखे विविध रंगाची,
मार्ग सुद्धा होते विविध प्रत्येकांची
कोनाला मिळाले भाग्य ईश्वराच्या चरणाचे
कुणी बनुनी गजरे खुलविले सौंदर्य यौवनीचे
कुणी पसरले सड्यागत रस्त्यावर,
मांडीले पुष्पगालिचे काळ्या भूमातीवर
खुलवित असतांना सौंदर्य मातीचे
भरते येत होते आनंदाचे
दुर्दैवी काळाचे पाऊल पडले
मातीतच सर्व चिरडत गेले
आनंदाने सुगंध मात्र मातीतूनही
फुलवीत राहीले.

**हाळदे एस.**
बी. ए. प्रथम

## माणुसकीचा बळी

माणुसकी ही माणसाची जुळवी नाती खरी
पैशासाठी माणुसकीचा घेतला रे बळी
जगामध्ये असे कसे रे कोणी घडविले
माणुसकीला आळा घालूनी पैसा रे कमविले
दाणादाणाला माणुसकीला पैशाने अंडविले
परी, सत्याने माणुसकीची पारख केली खरी
माणुसकी ही माणसाची.....
पैशासाठी.....
हाल झाले माणुसकीचे माणुसकी संपली आता
चहुबाजूने माणुसकीला नियतीने घेरले आता
चक्रव्युह हे असे कसे रे कोणी बनविले
माणुसकीच्या अभिमन्यूला मागून तार कसा भेटीले
या ताराची अभिमन्यूला जाणीव नव्हती पुरी
माणुसकी.....
या देशाला त्या गोऱ्यांनी पहा कसे घेरले
जाती सत्तीचा धनुष्य सजवूनी तीर बघा मारले
तरी सत्याने त्या ताराला रक्तानी जाळले
म्हणून तिरंगा झळकतो अजून या जागी
माणुसकी ही.....

**अशोक निम्मलवार**
बी. ए. प्रथम वर्ष

# प्रिय प्रमोद

**कांबळे मिलींद केरबा**
बी. ए. तृतीय वर्ष

प्रिय प्रमोद,

वाडेकरच्या तोंडून 'तुझ्यासाठी पत्र आणलंय' असं ऐकणं, त्यातच उदाहरणार्थ प्रमोदचं पत्र आहे म्हणजे आनंद वगैरे वाटणं स्वाभाविकच. तुझं नैराश्यवादी पत्र वाचून उदाहरणार्थ निराश वगैरे व्हायला हवं, पण उदा. निराश असतांनाही आनंद वाटण्याची मलाही सवय होत असल्याची भीती वाटली. पत्र वाचून अशा निष्कर्षापर्यंत आलो की, A letter filled with street news and jokes is much more interesting than one written with hearts blood.

आपल्या सुखाच्या वगैरे कल्पना सगळ्यांपेक्षा बऱ्याचशा निराळ्या. या उदाहरणार्थ भौतिकवादी जगात आपल्या सुखाच्या कल्पना हसं ठरतील. म्हणून आतल्या आत कुढत राहणं... प्रमोद, आपल्यालाही उदाहरणार्थ ओरडता वगैरे आलं असतं तर जगणं बरचसं सुसह्य वगैरे झालं असतं. आपल्याला कुणी हसेल किंवा वाईट वाटून घेईल याचा कसलाही विचार न करता तो उदाहरणार्थ भडाभडा बोलत असतो. पुन्हा माफी मागायचं नाटक, हे त्यालाच जमतं. आता त्याच्यासारखं वागायला लागणं, म्हणजे उदाहरणार्थ कुंभाराच्या गाढवाने मालकाला लाडक्या कुत्र्यासारखं वागवायला सांगण्यासारखे वगैरे नाही का?

नाना पाटेकर मागे एकदा म्हणाला होता 'बस्स झालं हे सगळं.' तेव्हा तो आपल्याला आपल्याच बिरादरीचा वाटला होता. प्रमोद, आता त्याच त्या उदाहरणार्थ मेकॅनिकल लाईफ स्टाईलने जगणं असह्य होत असतांनाही तसंच वगैरे जगत राहण्याची सवय झालीय. त्यामुळे उदाहरणार्थ नानासारखं वाटत राहण्यासाठी सवड वगैरे मिळत नाही. थोडक्यात सांगायचं तर रिकामं असतांनाच असं वाटत असतं, त्यामुळे कशात तरी माणसाने गुंतवून घ्यायला पाहिजे, हेच खरे. त्यातल्या त्यात ते आवडीचं क्षेत्र असल्यास, तुमचं सोनं होईल.

प्रमोद, जिनेंच्या शुभदाचं लग्न झालं. पत्रिका असल्याने लग्नाला गेलो होतो. लग्नसमारंभातून मी लवकर सटकतो, हे तुला सांगणे न लगे. पण निजामला कंपनी म्हणून थांबलो अन् सोहळ्याचे निरीक्षण केलं..... लग्न आयुष्यात बहुदा एकदाच येत असणारा प्रसंग. दाम्पत्यासाठी उदाहरणार्थ अविस्मरणीय वगैरे ठरावा, हा त्यामागचा मधूर उद्देश. पण आजच्या लग्नात सुरू असते श्रीमंतीच्या नाटकी देखाव्याचा किळसवाणा प्रकार. इथेच नाही बहुदा सर्व लग्नातून तेच दिसतं. अमक्या तिथीची तमूक वेळ मागे टाकण्यासाठी उदाहरणार्थ वधुपक्षाची होत असलेली दमछाक. कारण लग्नाचे 'मूळ' वधुपक्षच असतो, हा समाज प्रचलीत दृढ विश्वास वरपक्षाचा असतो. आज घडीला एक रूपया खर्च करतांना चार वेळा विचार करावा लागतो. मग उदाहरणार्थ टिचभर वस्तू विकत घेतांनाच त्या उत्सवमूर्तीबद्दल असणारी थोडी फार आपुलकी वगैरे गमवावी लागते. मग कसले शुभाशिर्वाद नी कसल्या शुभेच्छा. फक्त कोरडे हसू. खिशाला बसलेली चाट उदाहरणार्थ लग्नाच्या जेवणातून वसूल करण्यासाठी मग निमंत्रितांचा सुप्त प्रयत्न.

नवरदेवाचा सूट पाहून शुभदाच्या भावाला सहज म्हणालो, 'सूट आकर्षक आहे हो.' 'पंधराशे रूपये फक्त याची शिलाई आहे,' त्याची प्रतिक्रिया. मी चाटच पडलो. कारण त्या अगडबंब शिलाईमध्ये माझे उदाहरणार्थ तीन तरी ड्रेस आरामात झाले असते. असो.

परवाच माझ्या वाचण्यात आलेल्या नोंद करण्याजोग्या ओळी अशा -

सच कहे दू हे बरेहमन!
अगर तू बुरा ना माने,
तेरे सनम कदों के बूत हो गये पुराने।
अपनों से बैर रखना तुने बुतों से सिखा,
जंगोजदल सिखाया वाईज को भी खुदाने।

अर्थात खरं सांगू ब्राह्मणा, तू वाईट वाटून घेत नसशील तर, अरे, देवळातल्या मूर्ती आता जुन्या झाल्यात. आपसात वैर करायला या मुर्तीने तुला अन् मशिदीतील खुदाने मौलवीला शिकवलेले आहे.

प्रमोद, वरील काव्यपंक्ती आहेत प्रख्यात कवी म. इक्बालच्या. किती तथ्य आहे यात! उदाहरणार्थ आजकालच्या ज्या दंगली पेटतात त्या अतिधार्मिकतेतून वगैरेच. त्यापेक्षा कुठल्याही धर्माचे अनुकरण न करणारे कितीतरी व्यक्ती 'माणसं' आहेत. असो.

तुझ्या पत्रातून बऱ्याचदा अशी अपेक्षा असते की उदाहरणार्थ रोमॅन्टिक वगैरे बातमी द्यावी. पण प्रमोद, मी सहवासवादी माणूस आहे. भविष्यात उदाहरणार्थ गरज पडू शकेल या स्वार्थ बुद्धीने या ना त्या व्यक्तींची ओळख करून घ्यावी, हे आपल्याला पटत नाही. सलगी तर दूर. एवढं मात्र नक्की की सहवासात आलेल्या व्यक्तीवर उदाहरणार्थ ती आवडली तर त्या व्यक्तीसोबत माझी बहुदा कायमची, हो कायमची सलगी असते. ह्यामुळेच बहुदा मी उदाहरणार्थ रोमॅन्टिक बातमी वगैरे तुला लिहू शकणार नाही.

तुझ्या पत्रातून उदाहरणार्थ निराशेचा सूर होता की तुझा मागचा एक पेपर वगैरे राहिलाय. अरे, त्यात काय चिंता करण्यासारखं.

जिंदगी की यही रीत है,
हार के बाद ही जीत है,
थोडे आँसू है थोडी खुशी,
आज गम है तो कल है खुशी।

या येत्या परीक्षेत तो विषय काढायचाच. नाही तरी आपली लतादीदी म्हणतेय -

हम को भी गम ने मारा, तुमको भी गम ने मारा,
हम सबको गम ने मारा, उस गम को मार डालो।

या येत्या परीक्षेत त्या विषयाचा उदाहरणार्थ फज्जा उडवायचा. त्या एका विषयाने मागचा स्कोअर वाढायला पाहिजे. मग भले काम में देरी क्यूँ?

कल करे सो आज कर, आज करे सो कल,
पल में परलय होयगा बहुरी करोगे कब।

मला माहीत आहे, तुझा आणि पत्र लिहिण्याचा योग हा अत्यंत क्वचित येतो. आणि उदाहरणार्थ तू मला वारंवार पत्र लिहित नाहीस म्हणजे माझी तुला आठवण वगैरे येत नसावी, अशी समजूत करून घेणाऱ्यांपैकी मी नाही.

आता, उदाहरणार्थ पत्राची सुरुवात आणि शेवट अलंकारीक वगैरे करावी, असा माझा कटाक्ष वगैरे कधीच नसतो. परंतु तरीसुद्धा पत्र तर उदाहरणार्थ थांबवायलाच हवं. तेव्हा -

तुझ्या पत्राच्या प्रतिक्षेत,

तुझाच,

बाप्या

•••

## प्रेमपत्र

प्रयत्न माझा पहिला हा
नकार मजला देवू नको
प्रेमपत्र पाठविले मी
तू झिडकारून टाकू नको
नजरेला ही नजर दिली मी
उगीच नजर चुकवू नको
तुझ्याचसाठी झालो वेडा
वाटेवर अर्ध्या सोडू नको
पवित्र आहे प्रेम माझे
अर्थ वेगळा लावू नको
उठता बसता ध्यास तुझा मज
तो हिरकावून घेवू नकोस
पत्र देऊन वाट पहातो
उत्तर मजला देशील का
प्रतिउत्तर मग त्वरीत देवून
सखे माझी होशील का...? **माधव खडके देगांवकर**

# सरपंचकी

**कांबळे मिलींद केरबा**
बी. ए. तृतीय वर्ष

दुपारच्या वेळी माधवराव पाटील आपल्या दिवाणखाण्यात पहुडले होते. त्यांच्या पायांकडील बाजूला त्यांचे सहकारी श्री. शामराव दामले आणि त्यांच्यासमोर श्री. गंगोबा कौठे बसले होते. त्यांच्या गप्पा चालू होत्या. गंगोबा एक विचित्र विनोदी मनुष्य. अधुन-मधून त्यांच्या विनोदावर सगळे खदखदा हसत होते.

इतक्यात तरणाबांड धनबा दिवाणखाण्यांच्या दारावर अवतरला. त्याच्या ठिगाळलेल्या धोतीवर रक्ताचे गडद डाग होते. त्याची मळकट गांधी टोपीही रक्ताळली होती. त्याच्या शर्टाच्या डाव्या हाताचा भागही रक्ताने माखला होता. अनेक जागी तो फाडला गेला होता. चेहऱ्यावर बोचकरण्यात आलेले स्पष्ट दिसत होते. एकूण त्याच्यावर अन्याय झाला होता, हे तेथील सगळ्यांनी ओळखलं.

''ये ना रं मधी. तसा का हुभा हाईस?''- माधवराव पाटील तो बाहेर उभा असल्याचे पाहून म्हणाले. धनबा आत येऊन त्यांच्यासमोर बसला. ''काईतर आक्रीत घडल्यासारखं वाटतंय.'' शामराव दामल्यांनी पुढे म्हटलं.

लगेच गंगोबा म्हणाला, ''काय झालं रे हे धनबा?''

''सकाळच्यापारी मी माज्या अंगनात बसलो असतांना, एकाएकी अंगावर काठ्या पडल्या!'' धनबाने होत जोडून सांगितलं.

''कुणी?'' - शामराव.

''आपल्याच पारटीतल्या लोकांनी. त्यात म्हाराचे तान्या आणि गन्या बी व्हते.''

''का?'' - माधवराव.

''तर तेचं असं झालं! तुमीच आमाला नको म्हणतांना बी सरपंच केल्या. त्यात तुमचा काई दोस न्हाई. तुम्ही आपले दयालू माणूस. गरिबाचे सुख आणि भलंच पाणारे''-

पाच दिवसाआधीच गावातील ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या होत्या. त्यात माधवराव पाटलांचा पक्ष जिंकून आला होता. माधवराव पाटील गावच्या एका संस्थेचे 'चेअरमन' होते. त्यांना तीच सीट हवी होती. विनय हा त्यांचा एकुलता एक मुलगा. बारावीच्या चार परीक्षा देऊनही तो पास होत नव्हता. दहावीत दोनदा नापास होऊन तिसऱ्यांदा पास झाला होता.

विनय स्वभावाने उद्धट, क्रोधी होता. तो गावात फक्त दादागिरी करायचा. गरीबांना त्रास द्यायचा. त्याची एक टोळी होती. ती गावात नंबर एकची फालतू समजली जायची. तो सरपंचाच्या सीटवर बसण्याच्या मुळीच लायकीचा नव्हता. त्याच्यावर गावातील, तालुक्यातील अनेक स्त्री-पुरूषांच्या तसेच पोलिसांच्या केसेस होत्या.

पण माधवराव मात्र विचारी, महत्त्वाकांक्षी होते. ते गरीब लोकांना खूष ठेवण्याइतके शहाणे होते.

विनय तर सरपंचाच्या लायकीचा निव्वळ नव्हता. पार्टी तर त्यांची निवडली होती. अशा कारणामुळे परवाच्या दिवशी ग्रामपंचायतीमध्ये सरपंच निवडण्यासाठी बैठक झाली. माधवरावांना अख्ख्या गावाचा धाक होता. ते जे सांगतील ते सर्वांनी ऐकायचं असंच होतं. माधवराव पाटलांनी सरपंचाच्या पदासाठी 'महार' वाड्यातून निवडून आलेल्या धनबा कांबळेचं नाव जाहीर केलं होतं. सगळ्यांना ते नाव स्वीकारणं भाग तर होतंच, पण धनबाचं नाव ऐकून सर्वांना अचंबा वाटला. धनबाने उठून माधवरावांना विनंती केली होती की, माझ्याने सरपंच होणं शक्यच नाही. पण माधवराव म्हणाले होते, 'आरं धना, उग आईक.

सरकारनं सर्वांना समान हक्क व अधिकार द्यावं, आसं फर्मान काढलंय. गरीबांच्या कल्यानासाठी झटायला सांगितलंय आन् तू मंजन नको म्हणतुयास. आरं, काई झालं गेलं तर मी पाहून घीन. घाबरायचं काईच कारण न्हाई. तुला सरपंचकी येत न्हाई ना, मी तुला मदत करीन. हो, गरीबांना आम्ही संधी न्हाई दिली तर हामाला देव सर्गात जागा दील काय?' -------- आणि धनबा कांबळे सरपंच झाला.

कालच्या दिवसी गावातील सर्व लोकांत एकच विचार चालू होता. ''महाराचा धनबा सरपंच झालाय.'' सर्वजण माधवरावांची स्तुतीच करत होते. 'किती दयाळू, उदार माणूस! गरीबाचं किती सुखभलं पाहतो!' गावातील बहुतेक लोकांना दुर्विचार शिवला नाही. पण माधवरावांच्या पार्टीतीलच काही उच्चवर्णीय विचार करत होते की आम्ही असूनही 'महार' सरपंच होतो... !

''आरं बाबा, हामचं कशाला कवतीक करतुयास, तुला कशासाठी मारलंय त्यांनी?'' माधवराव मध्येच म्हणाले.

''त्याचं असं झालं! मी माज्यां बैलांच्या पाटीवरून हात फिरवीत होतो. तितक्यात तान्याच्या घरातून गावातील टगे, अन् चार खवाट दांडगी पोरं काठ्या घेऊन माज्या अंगनाकडे निगाली. अन् एकाने धावतच येऊन माजी शरट धरून दम देऊन विचारले,

''कारं धन्या माजलास! सरपंच व्हायची तुझी ही हिंमत?' तवा मी त्याच्या अंगावर चवताळून गेलो व त्याला हिसका दिला तवा तो गडी धाडकन पडला व बोललो.

'आरं आमी बी माणूसच हाय. त्यात काय बिघडलं?'

एवढं बोलतो तोच कुणीतरी लांबूनच ओरडलं, 'लेकांनो! हाणा की, साला माजल्यागत बोलतोय!'

मी तसाच बोललो, 'मी काय कुणाच्या बापाचं खाल्लो न्हाई!'

''एवढ्यात अंगावर काठ्या पडल्या. मी मोकळ्या हाताचा गडी. मला ढोराला झोडपल्यागत झोडपला. मी रक्तानं हुभा न्हालो. चांगला मजबुत होतो, तवाच टिकलू! काय करू? सांगून आलं असतं तर, म्याबी बहाद्दरनं एक दोन लोळवली असती! मला तेनी मोकळ्या हाती गाठलं!''

गंगोबा म्हणाला, ''वर्दी द्यावी पाटील पोलिस-टेसनला.''

''वर्दीबिर्दी काई नको. आताच्या आता बैठक भरवून मारेकऱ्यांकडून दंड वसूल करू. दम देवू. आरं, पणिक दवाखाण्यात गेल्तास का न्हाई?'' माधवराव पाटील म्हणाले.

''जायचं हाय पाटील, आधी तुमच्याकडं बोलावं म्हणून आलो,'' असे म्हणत तो उठला आणि दवाखाण्याच्या मार्गाला लागला. गंगोबा पटकन् उठला आणि त्याच्या सोबत निघाला.

बोलत-बोलत ते दोघे दवाखाण्याच्या आवारात आले. सकाळी झालेल्या ह्या चकमकीमुळे गावात तंग वातावरण होतं. आवारातही शुकशुकाट होता. इतक्यात चार-पाच दांडगी पोरं लाठ्या घेऊन तिथं पोहचली. त्यांनी गंगोबाला चटकन् बाजूला केलं आणि धनबाला बेदम मार दिला. धनबाचे डोके फुटून गेले. त्याचा उजवा हात मोडला. पायांवर मोठाली दगडं पडल्यामुळे त्यांचा चुरा झाला होता. रक्ताच्या थारोळ्यात कोसळलेल्या धनबाला तिथेच सोडून ती खवाट पोरं पसार झाली. त्यातच विनयही.....

●●●

# बेकाराचे मनोगत

अमूर्त स्वप्नांचे
अपेशी आयुष्य
वाहता-वाहताच
मी अंतर्मुख होतो...
वाटतं,
कसलं जीवन?
ना भविष्य ना वर्तमान;
प्रचंड वाळवंट
रखरखीत
वा
भयाण शुकशुकाट
स्मशानवत.
कुडी मात्र जगत राहतेय
अस्मितेच्या अस्तित्वाची
अजून वाटतं
पळून जावं.....
अन्
अगणित अश्रूंच्या संगतीत
स्वप्नंच पहावीत
'पालवीचं'.

**कांबळे मिलींद**
बी. ए. तृतीय वर्ष

# आळवणी

थकले ग डोळे माझे,
वाट तुझी पाहाताना,
वाट तुझी पाहाताना ग,
रात्र दिन जगताना.
सुखला ग कंट माझा,
तुलाच आळवीतांना ग,
नाव तुझे घेताना,
रात्र दिन जगताना.
आटले ग आश्रु माझे,
वाहाता वाहाता ग,
आटवण तुझी करताना ग,
रात्र दिन जगताना.
शिनला ग जीव माझा,
तुजविणा राहाता ग,
तुजलाच न भेटता ग,
.:. न भेटता ग.

**काळे किशन सटवाजी**
एम. ए. मराठी
प्रथम वर्ष

# खळखळणारे आश्रु

मी तशी नाही असंच
तु मला सांगत होतीस
चोरटी दिशा तु पाहात होतीस
आठवण दिली तेव्हा नाकारत असतांना
डोळ्यातून आश्रु गाळीत होतीस.
दुखत नव्हते तुझे ते पोट
हात तु लावत होतीस
तुला पाहून खुललेल्या त्या कळीला
बेचैन तु केली होतीस.
एकटीच भेट दिलीस तेव्हा
तीचे ते गोष्टी सांगत होतीस
हृदयामध्ये साठवूनी ठेवले ते दु:ख सांगून
डोळ्यातून आश्रु गाळीत होतीस
आईची आठवण करून देत होतीस
डोळ्यातून आश्रु गाळीत होतीस
... ... ... गाळीत होतीस

**काळे किशन सटवाजी**
एम. ए. मराठी
प्रथम वर्ष

## भेट

आधीच एकदा तु भेट दिलीस
चांदण्याचे खेळ कसे
सदा लपनडाव खेळणारे
अंधाऱ्या रात्रीत ओटीत दिले
तुझ्या मी हे हृदय खळखळणारे.
पाऊसाने मन भिजले
डोळे ही पानावले
तुझ्या प्रतिक्षेत ओघळणारे आश्रु
कुणालाही नाही दिसले
आधीच एकदा तु भेट दिलीस.
दिली नाहीस काहीस असे
मी का कुणास सांगू
कानात कुजबुजलेले काही
ओरडून का सांगू
आधीच एकदा तु भेट दिलीस.
प्रियकरासी हितगुज साधण्यासाठी
कुठल्यातर दुरच्या प्रवासात एकांतात
जिथे असतोस फक्त ती आणि तो
सोबतीला असतो तो फक्त प्रेमाला अनुरूपता
साजिणारा निसर्ग
आधीच तु एकदा भेट दिलीस
व्याकुळ झालेले हे आपले दोन जीव जेव्हा
एकमेकांना आपल्या बाहुपाशात घट सामावून
घेत होतसे तेव्हा, निसर्ग जणू मुक्त कराने
आपल्या प्रेमावर पुष्पवर्षाव करू लागत होता
आधीच एकदा तु भेट दिले होतेस.
या बाहुपाशातून आपण मुक्त होऊ नये
म्हणून निसर्गातील त्य -गुर्याला
साक्षी ठेवत बार-बार आठवण
देत होतेस, देत होतेस...
आधीच एकदा भेट दिली होतेस
—— दिली होतेस.

**काळे किशन सटवाजी**
एम. ए. मराठी
(प्रथम वर्ष)

## सहवास

तुझ्या सुंदर चेहऱ्याला
सुनो पावडर कशाला?
काळ्या मोकळ्या केसात
सुंदर पुष्प कशाला?
तुझ्या सौंदर्य सुगंधाला
कानात कस्तुरी कशाला?
तुझ्या वेरूळ अजिंठा आकाराला
हे लाजणे कशाला?
तुझ्या सहवासात नसतांना
हे जगणे कशाला?

**कांबळे मल्हारी रामा**
एम. ए. प्रथम (इतिहास)

## न्याय अन्याय

कसा रे मानवा तू
हृदय तुझे समुद्रासारखे
जेव्हा पाण्याचीच विटंबना होते
तरी शांत का तू?
कसा रे निसर्गा तू
सौंदर्य शोभून दिसते पानाफुलांना
दृश्य पाहाण्यासाठी दिपविल्या नयना
येता वसंत ऋतु होते पानगळ
फिरकत सुद्धा नाही तुझ्याकडे पक्षाने
कसा रे गतीमान युगा
तुझ्या त्या गतीचा वेग
न्यायाऐवजी
अन्यायाचाच विजय

**कांबळे मल्हारी रामा**
एम. ए. प्रथम (इतिहास)

## शेज

रसिल्या रात्रीत
शयन मंदिरात
दिवे विझतात
मंद धुसर प्रकाशात
आठवणीची बाग
मनात बहरते
गुलाब पुष्पाचे हास्य
कानावर येते.
हृदयात अष्टौप्रहर
तुझीच मूर्ती वास्तव्य करते
ढगाळलेल्या नभातून
थेंब निथळते.

**कांबळे मल्हारी रामा**
एम. ए. प्रथम (इतिहास)

## न्यायाचा शोध

न्याय शोधत होतो
अन्यायाच्या जगात
जीव तोडून खपत होतो
पहाडास टक्कर देत
कसे समजावून सांगू
दाखवण्यास दृश्य नाही
कसे व्यक्त करू
जे दिसते ते सत्य नाही.
समोर बघता
असल्याचा काळोख होता
जरा मागे वळून पहाता
सत्याचा दीप जळत आहे.
रक्ताचं नातं नाही
माणूसकीची जाण आहे
तडफणाऱ्या आत्म्यावर
कलंकाचा घाव आहे.

**कांबळे मल्हारी रामा**
एम. ए. प्रथम (इतिहास)

## दलाल

थांबणार केव्हा उष्ट उचलून
पायतन खाताना सिंहासनाची
पायरी मोजणाऱ्या अभंगाचे
कृत्रिम अत्याचार
थांबणार केव्हा
पोटाला घालून
पोटच्या गोळ्यावर
नजर भेडणाऱ्या भेड्याचे डोळे
थांबणार केव्हा
इज्जतीच्या आश्रयाला
विसावा घेणाऱ्या
मायबहिणीला धोका करणारे दलाल

**सोनकांबळे सुनिल चंदरराव**
बी. ए. द्वितीय वर्ष

## इशारा

जपून चाल मित्रा वाट जीवनाची वाकडी आहे
जग शोभिवंत असून राण काटेरी आहे
तिच्या हृदयातील तारूण्य विशाल आहे
ती जळती मशाल आहे
तू गोळा लोण्याचा आहेस
भूक जरी लागली आसेल तरी
इच्छा खाण्याची करू नकोस
फायदा काहीही नसून
हाणी मात्र शरीराची आहे
उगाच ध्यास धरू नकोस
हाती काहीही येणार नाही
मरशील जरी अखेरच्या क्षणीही
ती वळूनसुद्धा पाहाणार नाही

**कांबळे मल्हारी रामा**
एम. ए. प्रथम (इतिहास)

# विखुरलेल्या वाटा

**सुनिल सोनकांबळे**
बी.ए.द्वितीय वर्ष

१९८३ चा ऑक्टोबर महिना हा नांदेड जिल्ह्याचाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेला हादरा देणारा होता. अजूनही आठवतात ते दिवस. मुजळगा हे एक नांदेड जिल्ह्यातील छोटसं खेडं. सर्वगुणसंपन्न. गंगाधरराव पाटलांचा वारसा येथे जपलेला होता. त्यांच्या कार्य कर्तृत्वाने गावच्या पूर्वेकडून पश्चिमेकडे गावापर्यंतचा तीन किलोमीटरचा सरकारी रस्ता होता. गावात दुसरं काही नव्हतं. गावात एकता मात्र नांदायची. मध्येच या कर्तव्यापायी लढणाऱ्या माणसाचा मृत्यू व्हावा आणि संपूर्ण गाव दुःखात बुडून जावं आणि तेव्हापासून त्या खेड्याला वाईट नजर लागलेली. गावाचा पाटील मेला आणि गावात नांदणारी लक्ष्मी गावाच्या वेशीला सोडून पाटलाच्या शरणावर जळाली.

पाटलाच्या काळात असलेली गावाची परंपरा राहिली नाही. एकता विस्कटलेली. कोणी कोणाचे ऐकेना. महार आणि पाटील असा संघर्ष गावात सुरू झाला. पाटलाची पाटीलशाही गंगाधरराव पाटलांच्या बरोबर तेव्हाच सोडून गेलेली. अशा परिस्थितीत गावाला सांभाळणारा नेतृत्व कोण देणार? पाटलाची पाच मूलं, त्यांच्यातही एकता राहिली नाही. असं हे सगळं गाव पाटलाच्या मृत्यूनंतर विखुरलेलं. अशातच पावसाळा सुरू झाला आणि शेतकरी आनंदात होता. दरवर्षीपेक्षा यंदा पाऊस चांगला झाला, भरपूर पाणी शेताला आणि प्यायला मिळणार या विचाराने गावच्या लोकांत एक दिलासा देऊन जाणारा हा पावसाळा. १९८३ सालाचा ऑक्टोबर महिना. पहाता पहाता पावसाळ्याची चार महिने निघून गेली. गावात सर्वत्र चिखल. रस्ते नव्हते. गावाच्या पूर्व दिशेला महारवाडा, पश्चिमेला पाटीलवाडा आणि मध्यभागी गावच्या सर्व मंडळींचे श्रद्धास्थान असलेले मारोतीचे मंदिर, मध्य भागातून पूर्व-पश्चिम एक रस्ता होता, बाकी सर्व गाव बोळ्यांनी भरलेले. पावसाळा आला की गावात लोकांची कुचंबणा व्हायची. जाण्या-येण्याला रस्ता नको. प्रातःविधीला जायचं म्हणलं तर घागरभर पाणी काढून ठेवून जावं लागायचं. असेच दिवस या गावाच्या लोकांचे जात होते. आणि दसऱ्याचा महिना उजाडला. पाऊस काही उघडायचा नाव घेईना. सगळीकडेच पाण्याची झड लागलेली. गावच्या दक्षिणेला अगदी गावखोरी लागून पश्चिम-पूर्व वाहणारी लेंडी नदी, तसेच गावच्या उत्तरेला अगदी गावाला चिकटून जाणारी पश्चिम-पूर्व लवण आपले दोन्ही भाग चिरून अगदी भरून चाललेली लेंडी, आपले रूप बदलून अगदी गावाची ओळख बुडवून वाहू लागलेली, गावाला दोन्हीकडून या पाण्याने घेरलेलं, गावची माणसं अशा परिस्थितीत घाबरलेली. पाऊस उघडायचं नाव घेत नाही. पाण्याची पातळी वाढत गेली आणि गावात पाणी येऊ लागलं. रात्री लोकांना झोप नाही. पाऊस तब्बल तीन दिवस सुरू होता. तिसऱ्या दिवशी पहाटेलाच गावाच्या मध्यभागी असलेल्या मारोतीच्या पायरीला पाणी येऊन ठेपलेलं. गावात आरडाओरडा सुरू झालेला. महारा-मांगांची लोक आपली लेकरं-बाळं घेऊन पाटलाच्या वाड्यावर धावू लागले. अशा वेळी पाटीलही धीर देत होते. संपूर्ण गाव पाण्यात बुडालेलं. गावात पाटलाची घरे तेवढीच चिरेबंदी व मोठी असलेली. त्याच्या वाड्यात महारा-मांगांना निवारा मिळाला. प्राण्यांची अवस्था कोण पहाणार? कमावलेलं जाईल याची चिंता कोणाला नव्हती. विचार होता तो आपला व आपल्या बाळांचा जीव वाचवण्याचा. पूर्वी आनंदात राहणाऱ्या या गावाला कोणाची दृष्ट लागली होती? पाटलाच्या वाड्यात सगळीकडे रडापडी. कोणाची म्हैस गेलेली, कोणाची गाय गेलेली, कोणाच्या शेळ्या

गेलेल्या. लेंडी आणि लवण यांच्या मिलनात गावाची अनेक वर्षांपासून चालत आलेली इभ्रत वहात चाललेली. अशातच नको ती घटना गावात घडली. एकीकडे जीव वाचवण्याची धडपड प्रत्येकाची चाललेली, कोणाची विचारपूस करायला कोणालाही वेळ नव्हता आणि कोणाची विचारपूस कोण करणार? अशा परिस्थितीत एक बातमी लोकांत पसरली. लोक आधीच घाबरलेले, त्यात या बातमीने मनाला हेलावून देणारे प्रसंग डोळ्यापुढे उभे राहू लागले.

गावातल्या महारवाड्यातली हुलबा महाराची बायको गिरजा मेली. सतत बिमार राहणारी गिरजा आज गावावर संकट आलेलं पाहून स्वतःच निघून गेली. हुलबा महार हा गावातले रस्ते झाडणारा होता. तसं काही त्याचं वेगळं स्थान गावात नव्हतं. महारातल्या महारात तो खालच्या पातळीचा. एक मुलगा दशरथ नावाचा व मुलगी धोंडी नावाची. गिरजा सतत बिमार असायची. हुलबा कधी गावात रस्ते झाडायचा, मारोतीचं मंदिर साफ करायचा, पार स्वच्छ करायचा. लाकडाची मोळी आणून वाड्यात टाकून देतील. ते तुकडे घेऊन येणारा त्याचा संसार म्हणजे एक निरूपयोगी संसार होता. दशरथ बापाने मागून आणलेल्या तुकड्यावर आराम करायचा. कामधंदा काही करायचा नाही. धोंडी ही वयात आलेली. लग्न न होऊ शकल्याने गावातल्या पोरांसोबत त्यांना आपल्या जाळ्यात पाडायची आणि त्यांच्याकडून पैसे कमवायची, असा हा त्याचा संसार. मारोतीच्या मंदिराजवळ त्याचं घर. हुलबाला एक का दोन भाऊ होते पण त्यांचाही संसार काही प्रमाणात तसाच असलेला. गावात त्याची काही किंमत नव्हती. कोणी त्यांना बोलायचं नाही. गिरजाला अनेक उपचार करूनही तिचा आजार कमी होत नव्हता. तिच्या प्रकृतीत काहीच फरक पडलेला नाही. तिच्या परिस्थितीत काहीच बदल होत नव्हता. एकीकडे पोटाचा प्रश्न सोडवण्याची काळजी करणारा हुलबा गिरजाला कुठे नेऊन दाखवणार? गावातल्या मरूमाय, पोचूमाय, म्हैसाई अशा सगळ्या देवीला नवस करूनही गिरजा काही चांगली होईना. गावातल्या लोकांनाही त्याच्या अशा चिडचिड्या संसाराचा कंटाळा आलेला. सतत बिमार असलेली गिरजा, इकडून तिकडे फिरणारा दशरथ आणि गावात पोरांना आपल्या नखऱ्याच्या जाळ्यात फसवणारी धोंडी एवढेच चरित्र त्याच्या संसाराविषयी सांगितले जाते.

गिरजा मेली हे ऐकून सर्वांच्या समोर तिचे प्रेत दिसू लागले, प्रेतयात्रा दिसू लागली. बायांचे रडणे, बाजा वाजवणारे मांग बाजात गुंग आहेत, पाहुणे येत आहेत. गिरजाच्या प्रेताभोवती सगळे बसून तिच्या चांगुलपणाविषयी बोलणारे, तिच्या वागण्याचे आज तोंड भरून स्वागत चाललेले. सर्वत्र दुःखाचे सावट पसरलेले आहे. गाव शांत होऊन गिरजाच्या प्रेताची पाहणी करीत आहे. पहाता पहाता सगळे मैदान गिरजाच्या मातीला आलेल्या पाहुण्यांनी भरलेले, बाया-पोरांनी भरून गेलेले. बाजे दोन चार जमा झालेले. किती किती हा सगळा गोंगाट सुरू झाला आहे. रडण्याचा आवाज बंद होत नाही. बँडवाले पिऊन जोरजोराने वाजवत आहेत. थांबायचं नाव नाही. एकच वर्दळ उडालेली. पाटलाच्या बाया येऊन प्रेत पाहून उगीच डोळ्याला पदर लावून बाहेर जात आहेत. पाटील मंडळी सहानुभूती दाखवून संपूर्ण गावच्या महारांचं सांत्वन करत आहेत. गिरजासारखीच बाईच आमच्या गावात नव्हती. तिचं वागणंच निराळं होतं. गावाचे पाटील हळूच खाली बसत, महाराचा स्पर्श होणार नाही अशा ठिकाणी बसत म्हणाले,

'होय जी, आमच्या महारवाड्यात बाया एकीकडं तर गिरजा एक भक्कड होती.'

'तिचं वागणंच लई न्यारं पाटील,' पिरू महार म्हणाला.

'माझी गिरजा तू आमच्यात का राहिली नाहीस? तुला काय आमुचा कंटाळा आला होता काय?' म्हणून सजा धाय मोकलून रडायला लागलेली.

'नको, सजा रडू नको. आग, गिरजाला तर चांगलं मरण आलंय, लयी चांगलं केलंय. देवानं कुठं झिजत ठेवलं नाही. कोडा गिरजाची जाऊ सजाला म्हणाली.

तिची समजूत काढत काढत कोडाही रडू लागली होती.

अशा वेळी गिरजाच्या प्रेताला पहाण्यासाठी जणू रात्रीच्या हिमांशूच्या ताऱ्या हिमांशूला सांगत आहेत. तू जरा लवकर प्रवास कर, सकाळी गिरजाचं प्रेत आपणाला पहाता येणार नाही. असंच काहीतरी सांगत असावी त्यासाठीच रात्र तिच्या हट्टाला न जुमानता मस्त गमन करत होती. सकाळ होता होता एकदाची झाली, कपडे आणणाऱ्यांनी रात्रीलाच कपडे आणलेले. बस्ता येऊन पहुडलेला. मडक्यात पाणी गरम होऊन [illegible] होत होतं. गिरजाला आंघोळ घालायची वेळ झालेली. गिरजाला आंघोळ घालण्यात आली. सुगंधित साबणाच्या सुवासात गिरजाची आंघोळ झाली होती. सारा महारवाडा, पाटीलवाडा, मांगवाडा प्रेतासोबत आहे. प्रेत उचलून स्मशानाच्या दिशेला निघालेले. सर्वात पुढे मांगांचा बँडबाजा आहे. त्याच्या मागे बँडवाले आहेत आणि त्याच्या मागे प्रेत आहे. प्रेतामागे लोकांची गर्दी आहे. बायका-पोरांचा आवाज एकमेकांच्या सहवासात गुदमरून जातो आहे. बायांचे रडणे सारखे चालू आहे. त्यांना आता कोणी समजावत नाही. प्रेतयात्रा गावातून थेट गिरजाच्या घरापासून ते स्मशानापर्यंत आहे. लोकांची गर्दी झालेली आहे. येरवी भयाण असणारे हे स्मशान आज कसे माणसांनी गजबजलेले आहे. जणू कोणत्या तरी देवाची यात्राच निघालेली आहे आणि सगळ्या गावाचे लोक जमा झालेले. स्मशानावर सगळेच जण आलेले आहेत. जिकडे तिकडे माणसेच माणसे दिसत आहेत. ''किती मोठं आहे माझ्या गिरजाचं नरीब, संपूर्ण गावाला माझ्या पोरीनं कसं जमा केलंय.'' इतके लोक कोणाच्या मातीला आलेले नाहीत म्हणून गिरजाची आई गर्व करू लागली. इतकी माणसे जमा झालेली, बाया तेवढ्याच तर पोरं-बाळं तेवढीच. एक पाखरूही जिथं बसू शकत नाही ते ठिकाण आज माणसांनी गजबजून गेलं आहे. एवढ्या मोठ्या जनसमुदायात गिरजाला अग्नी देण्यात आला. आणि जळता जळता प्रेताचा वास सुटला. माणसं कशी एकदम पांगली. जणू वेगवेगळ्या रस्त्याने पक्षी जसे आकाशात भ्रमण करतात त्याप्रमाणे 'असं कसं हे माणसाचं जीवन असेल इतकी शान गिरजाची जिवंतपणी होती काय?' असा प्रश्न दावलाजींच्या मनाला स्पर्शून गेला. सगळी दृष्टी त्यांच्यासमोर आहे. दावलाजीचे डोळे स्वप्नातून मोकळे झाले आणि गिरजाचे एकटे पडलेले प्रेत त्याच्यासमोर फिरू लागले आहे. त्याच्यासमोर प्रश्न होता तो गिरजाच्या अंतिम संस्काराच्या वेळी गावात पाणी आहे, लोकांना भाकर नाही. कशी तरी तोडकी मोडकी चूल रचवून कच्ची-पक्की भाकर खावं म्हणणाऱ्या मांगाच्या समोर गाव संकटातून जात असतांना गिरजाच्या प्रेताचा कसा कर करावा हा विचार पडला. गिरजाच्या भावकीला वाड्यात बोलावून पाटलांनी गिरजाच्या प्रेताचे काय करायचे ते करा. पाणी उतरायचं नाव घेत नाही असं म्हणून पाटील सुटकेचा एक निःश्वास सोडले परंतु त्यांच्याही मनात विचाराने गलबल केलेली. तसेच पाटील वाड्यात आलेल्या दावल्या, गण्या, पिऱ्या यांच्या काळजीने निस्तावलेल्या चेहऱ्याकडे पहात राहिले. तर त्यांना गण्या, पिऱ्या व दावला यांचे काळजीने काळवंडलेले चेहरे पहावेनात. शेवटी गावच्या पाटलाचे ते वारस होते. गावावर संकट आले म्हणजे आपल्या गावाची काळजी करणारे पाटलाच्या माघारी तेच होते. दावलाच्या अंगाला पाणी चिंबून टाकलं होतं. 'आता तुम्हीच सांगा पाटील आम्ही काय करायचं ते, एवढ्या पाण्यात तिला कुठं गाडावं?' दावला आतापर्यंत पाटील आणि त्याच्यात असलेली शांतता दूर करीत म्हणाला. पाटलाला काही करता येत नव्हतं. गिरजाचं प्रेत उचलून वाड्यात तर आणता येत नव्हतं. कारण गिरजा तर महारीण होती. पाटील काळजीच्या भयाण डोंगरात वाहून गेले. ओट्यावर असलेला एक पाय खाली लोंबता सोडून झोके देऊ लागले. गप राहणारा गण्या एकदम बोलला, 'बघत्या आधी आमच्या भावकीला विचारून येत्या' तसे तिघे निघाले. वाड्याबाहेर पडले तर पाठशिवणीचा खेळ पाण्याचा सुरूच होता. पाटलाच्या वाड्याला पाणी येऊन ठेपलेले होते. जणू आत जाण्याची तयारी नाही पाटलाचा वाडा होता तो. महार-मांगाची घरे नाहीत

ती असेच जणू पाण्याला कळले आहे. वाड्यातून तिघेही बाहेर पडले आणि पाय हलवीत बसलेले भास्करराव पाटील आपल्या मायच्या आठवणीत रेंगाळत गेले. आपल्या बापाचा काळ त्यांच्यापुढे येऊ लागला. गंगाधर पाटील हे धाडसी व्यक्तिमत्व. मुजळगा सोडून आजुबाजूच्या सर्व खेड्यात त्यांचे नाव लोक घेत असत. त्यांचा दरारा मोठा जबरदस्त होता. तालुक्याच्या ठिकाणी पाटलाचा घोडा न थांबता पळायचा. सगळ्या गावाची व्यवस्था ठेवणारे गंगाधर पाटील हे एक वेगळेच व्यक्तिमत्व घेऊन आलेले. त्यांच्या हयातीत लेंडीसुद्धा कधी गावापर्यंत येऊ शकली नाही. पारावर बसलेल्या पाटलाच्या पायाजवळ गावाची सगळे माणसे जमा व्हायची. एक एक घंटा पाटील बोलायचे. डोक्याला टोपी घालून, पांढरे शुभ्र कपडे घालून पाटील जर बाहेर निघाले तर आख्ख्या गावात कोणाची ताण व्हायची नाही मान वर करून चालायची, इतका दबदबा होता. पाटील पारावर बसले म्हणजे गावातली गडीमाणसं, बाया-पोरं मान वरी करत नसून सर्वांच्या माना खाली दिसायच्या. गावात कोणतेही संकट आले तर सगळ्या गावाला पाटलाचा धीर होता. 'गंगाधरराव पाटील असतांना त्या गावाला काय चिंता?' असं मुजळग्याविषयी आजुबाजूच्या खेड्यातील लोक म्हणायचे. पाटलाचा निर्णय म्हणजे सगळ्या गावाचा निर्णय. सगळ्या महार-मांग पाटील यांचा निर्णय असायचा. त्यांच्या निर्णयाविरूद्ध कोणी ब्रही काढू शकत नव्हता. इंदिरा गांधींनी लोकसंख्या कमी करण्यासाठी जेव्हा पुरूषांचे ऑपरेशन करण्याचे सत्र सुरू केले तेव्हा सगळ्या खेड्यांची माणसे घाबरली होती. परंतु या गावच्या वेशीलासुद्धा कोणता अधिकारी येऊन ओलांडू शकला नव्हता. इंदिरा गांधीच्या या निर्णयाचा सर्वांना धक्काच बसला होता. तवा या पाटलांनी सगळ्या गावाला वाड्यात बोलावून सांगितले होते.

'घाबरायचं काही कारण नाही. इंदिरा गांधी राहू दे, नाही तर कोणतीही गांधी राहू दे, म्या आसेपर्यंत माझ्या गावचा एक माणूससुद्धा इथून बाहेर जाणार नाही. कोणाच्या केसाला धक्का लागला तर तुमच्या या पाटलाची टोपी तुमच्या पायाखाली जाईल.' अशी घोषणाच पाटलांनी त्यावेळी गावाच्या समोर केली होती. पाटलाच्या या रूबाबाला तर सगळे सरकारी ऑफिसरसुद्धा घाबरले होते. पाटलांनी गावाच्या मारोतीसमोर बसून गावाच्या रक्षणाचे व्रतच हाती घेतले होते. त्याकाळात काय त्यांचा दबदबा होता, किती प्रचंड ताकद होती त्यांची? अख्ख्या दिवसातून गावाच्या जवळ सरकार जीपा येऊन परतून जात होत्या. पण नाही कोणाची ताकद झाली गावात यायला. किती मोठे होते पाटील? आमचे आबा कसे मिळविले होते? एवढी मोठी वजनदारी, त्यानी काय होतं? त्यांच्या वजनदारीचे मूळ आपले बाबा खरोखरच रूबाबदार होते काय? आपण कसे आहोत? याचा विचार भास्करराव पाटलांना पडला. आपल्या बापाचा वारसा आपण विसरून गेलो आहोत की काय असं त्यांना वाटू लागलं. सर्वकाही मागचा आपल्या बापाचा संपूर्ण काळ पाटलांच्या डोळ्यांसमोर येऊन थांबला. याच गावचे लोक आमच्या बापाच्या काळात आमचे पाया पडायचे तवा आम्ही पायच पसरायचे नाहीत. भाऊ आपणच सर्वात मोठे! नाही ते लाड आपल्याला मिळाले होते. किती किती मारत होतो आम्ही नौकरदारांना? एवढ्या एवढ्या गोष्टीसाठी हागलेलं उचलायला लावत होतो आम्ही! तवा सगळा महारवाडा घाबरत होता. पाटील म्हणून बापाच्या एका जबानीवर आमच्या लग्नाला पोरी जमा होत होत्या. किती किती वैभव होतं हे सगळं! तवा आमचा ढोरबैलाचा वाडा होता. सगळीकडे ढोरं, बैल, शेळ्या-मेंढ्यांनी तो वाडा गजबजून गेलेला असायचा. लक्ष्मी आमच्या घरी पाणी भरायची. सगळा सगळा वाडा माणसांनी गजबजलेला असायचा. नौकरदारांनी बापाचा सल्ला घेण्यासाठी आलेल्या माणसांनी एवढं मोठं वैभव होतं आमच्या वाड्याचं! एवढं वैभव आपले बाबा कोठून आणलेले असतील? सगळं सगळं वैभव भास्कर पाटलांना आठवू लागलं. बापाचा संपूर्ण काळ पाटलाच्या पुढे एखाद्या चित्रपटाप्रमाणे नाचू लागला होता. एकदमच पाटील भानावर आले. आज ते गावात

नाहीत तर गावावर संकटं आली आणि आपल्या बापासारखी वजनदारी आपल्यात नाही. याचं दुःख पाटलांना वाटू लागलं. हळूच ढेलजातून बाहेर डोकावून पाहिले. पाणी चालूच होतं. पायरीला गुडघ्याभर पाणी जमलं होतं. भास्कर पाटील उठून घरात गेले आणि अंगात सदरा घालून ते वरच्या वाड्यात गेले. आणि आता त्यांच्यासमोर होता तो गिरजाचा प्रश्न. तिचं प्रेत कोठे सोडावे याच विचारात ते गेले होते. शंकर पाटील, तुळशीराम पाटील यांच्या सर्वांच्या वाड्यात सगळीकडे महार-मांग निवारा करून बसले होते. त्यांचा एकच गलबला सुरू होता. बाया गिरजाला बघायला जाऊ शकत नव्हत्या कारण गिरजाच्या घरात पाणी आलेलं. बाजेवर गिरजाचं प्रेत ठेवलेलं. कशीबशी दोन चार माणसं पोवळाचा थारा घेऊन बसलेली होती, पण पाणी जास्त झालं तर प्रेत बाजेसहित वाहून जाणार अशी भीती त्यांना होती. तुळशीराम पाटील यांच्या वाड्यात माडीवर माणसे जमली. बारक्या पोरांचा माडीवरचा आवाज काही ऐकू देत नव्हता. जणू या गरीब पोरांना आपलीच माडी वाटत होती. गावाला संकटानं घेरलेलं असतांनाही बारकी पोरं उड्या मारून खेळत होती. पत्रावर उड्या मारत होती. जणू त्यांना पाटलाची ढोराची पत्रं महाडीच वाटत होती. सगळी माणसं जमा झाली. गिरजाच्या प्रेताचं कसं करायचं, कुठं पुरायचं याचाच विचार सगळ्यांना पडलेला. पाटलाच्या पोरांचं शंकर पाटील, संभाजी पाटील; सोपान पाटील या सर्वांच्या मतावर गावाच्या लोकांचा विश्वास होता. नक्कीच पाटील काहीतरी तोडगा काढतील असा अंदाज होता. सगळे महार-मांग जरी एका जागी जमा झाले असले तरी एका प्रेताची विल्हेवाट त्यांना लावता येत नव्हती. कारण पाटलाच्या रूबाबाच्या आधीन ते होते. पाणी जोर धरूनच होते. गिरजाचे प्रेत लवकर गाढणे गरजेचे होते. पाणी वाढत होते. गिरजाची बाज आधार होत होती. तिच्या शरीराचा वास सुटला होता. तिच्या जवळ बसलेल्या माणसांना कोणताही निर्णय घेणे जमेना. पाटलांनी निर्णय दिला. गिरजाला बाजावर बांधून लवणीच्या पाण्यात सोडून द्यावे असा पाटलांनी हुकूम दिला. या निर्णयाने सगळ्या महारांची नजर गरगरा फिरू लागली. लोकांना पाटलाचा हा निर्णय पटला नाही. गिरजाला नदीत सोडणार कोण? तिच्या घरची मंडळी असं करण्यास तयार होईल काय? पाटलाचा हा निर्णय लोकांना अन्याय वाटला. त्यांनी पाटलाला सांगितले की, आम्हाला तुमचा निर्णय मान्य नाही. आम्ही असं करणार नाही. मध्येच कोणीतरी आवाज काढला. आम्ही गिरजाला गावच्या वरतं पुरणार, गिरजाचं मडं शिवाला पुराचं, वरतं पाणी नाही काही नाही. म्हणून शिवालाच पुरावे असा सगळ्यांचा दावा झाला. परंतु या निर्णयाने पाटील मात्र फडकले होते. 'गिरजाला पाण्यात सोडून द्या. गावातून वरलाकडं मडं नेता येणार नाही. गावाचा नाश होईल, गावावर कोप येईल. गावाच्या खालतं मडं जावं लागते. गाव वरलाकडं मडं नेता येणार नाही म्हणून पाटील फडकले परंतु लोकांनी त्यांचं ऐकलं नाही. 'आमच्या समाजाची बाई आम्ही कसं काय पाण्यात सोडून देणार? तिला काय कोणी वाली नाही काय?' असा लोकांनी हट्ट धरला. आम्ही तेवढे कठोर नाही म्हणून सगळे मांग-महार पाटलाची समजूत काढीत होते. परंतु पाटील ऐकायला तयार नव्हते. पाटलांनी जोर धरला. त्यांना गावातून महाराचं मडं वरतं नेऊ देणं खपत नव्हतं. गावाचा नाश होईल, गाव फुटेल हे जरी कारण आडवं लावत असले तरी मुळात गिरजा ही महाराची असल्याने तिचं प्रेत आपली घरं ओलांडून जाणे हे त्यांना पटत नव्हतं. याचसाठी त्यांनी विरोध दर्शविला होता. परंतु या गावातही गंगाधरराव पाटलाच्या माघारी एक देवमाणूस रहात होते. त्यांचं नाव होतं सरपंच गंगाराम पाटील. हे आमचे पूर्वीचे गावाचे सरपंच होते. त्यांच्या दानधर्माला तर सीमाच नव्हती असं म्हणतात. केवळ दानधर्माला कंटाळून त्यांना सरपंचकीचा राजीनामा द्यावा लागला असे गावचे लोक म्हणतात. कारण गावात कोणताही सरकारी अधिकारी आला तर त्याच्या सर्व सोयी हे आमचे सरपंच विनामूल्य करीत असत. आणि याचपायी त्यांना देवमाणूस ही उपाधी मिळाली होती. त्यांनी आपल्या गावाची शान राखण्यासाठी या

लोकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. आपल्या गावातील एक माणूस मरतो आणि आपण त्याच्या प्रेताला वर जाऊ देत नाही ही बाब मोठी लाजिरवाणी आहे. म्हणून त्यांनी आपल्या गावाजवळ असलेल्या शिवाच्या शेतातील जागा गिरजाच्या अंतिम संस्कारासाठी दिली. तरीही त्यांचं शेत गावाच्या वर असल्यामुळे यालाही ह्या लोकांनी विरोध केला. परंतु शेवटी पाटलाच्या विनवणीखातर विरोधी पाटलांना आपली जागा द्यावी लागली. अखेर प्राचीन संस्कृतीला कवटाळून बसणारे पाटील गिरजाच्या प्रेतयात्रेस संमती देतात व गिरजाचं प्रेत गावातून पाटलाची घरे ओलांडून शिवाच्या वर पुरलं जातं. अशा अवस्थेत गिरजाचे अंतिम संस्कार करण्यात आले होते. गिरजाची गावकी इथं या गंगाराम पाटील नावाच्या देवमाणसाने शाबूत ठेवली होती. त्यातच त्यांचा मोठेपणा अवतरतो. गिरजाचं प्रेत पुरलं गेलं आणि सुमारे तीन दिवसांपासून चालू असलेला पाऊस थंडावला होता. उग्र रूप धारण करून वहाणारी लेंडी आपल्या विक्राळ रूपाचं दर्शन गावाला देऊन थंडावत चालली होती. वाड्यातून लोकांचे लोंढेच्या लोंढे आपल्या घरी येऊ लागले होते. पहाता पहाता सगळा गाव पूर्ववत झाला होता. कोणाची घरे पडलेली, कोणाची ढोरे मेलेली, कोणाचा संसार गेलेला. राहिल्या होत्या घरांच्या भिंती व वरचे पडलेले खापर. प्रत्येकाच्या घरात पाण्याची धार येऊन सगळा संसार बिनधास्त उचलून नेलेला. उरल्या त्या फक्त उभ्या पडक्या भिंती. अनेक पिढ्यांनी बसवलेला हा संसार एकाएकी तीन दिवसांत भुईसपाट झालेला. गावाला आता वेगळीच कळा लाभली होती. गावात सरकारी माणसे येत जात होती. गरीबांना सरकारतर्फे मदत मिळू लागली होती. आता ही सरकारची मदत संपूर्ण जीवन पाटलाच्या पायात घालवणाऱ्या पाटलाच्या पायावर घाव घालणारी ठरली होती. गरीब जनतेला आता आपल्या अस्तित्वाची जाणीव होऊ लागली. प्रत्येकाच्या मनात आपणही माणसं आहोत याची जाणीव झाली. गावात पार्ट्या सुरू झाल्या. पाटलाचा व महाराचा एक गट निर्माण झाला. आणि याचाच फायदा घ्यावा तसा गोपाळराव देशपांडे यांनी घेतला. पहाता पहाता गोपाळरावांना आपला काळ आठवू लागला. तेच ते द्राक्षाचे मळे, केळीचे मळे, संत्रीचे मळे, मोसंबीचे मळे. किती किती फळांची लागवड व्हायची यांच्या मळ्यात! इंदिरा गांधीला जाऊन बियाणं मागून आणले होते असे गावचे लोक म्हणतात. एवढं मोठं वैभव यांच्या मळ्यात होतं. लक्ष्मीचं हिरव्या लुगड्याप्रमाणे हमेशा यांचा मळा हिरवा दिसायचा! सदा फुललेला, फळलेला असायचा. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचा मळा पहिला असायचा असं म्हणतात. काय तो काळ? किती आमची प्रतिष्ठा? आणि हे सर्व बुडालं आहे. आज आपण एक सुन्न मूर्ती आहोत. आणि याच विचाराच्या गराळ्यात एक चेहरा त्यांच्यासमोर येरझाऱ्या मारू लागला. गंगाधर पाटील, त्यांनीच तर हा मळा लुटलेला, संपूर्ण वैभव चिरडलेला. गावाच्या महारा-मांगाला लावून संपूर्ण मळा लुटला होता पाटलांनी. हजारो रूपयांचं नुकसान पाटलांनी केलेलं आणि आपण तवा एवढे मोठे जमीनदार असून गप्प होतो. एवढा रूबाब होता पाटलाचा! सगळा सगळा काळ देशपांड्याच्या समोरं एखाद्या चित्रपटाप्रमाणे आला होता. आता हीच तर संधी गावाला फोडण्याची, हजारो वर्षांपासून गंगाधर पाटलाच्या नावावर एकत्र रहाणाऱ्या या गावाला वेगळं करण्याची. आणि या देशपांड्यानी बसल्या जागेत गावात राजकारण आणलं. गावात पाटलाच्या विरोधात महार-मांग वागू लागले. १९८५ ला गावात पहिल्या प्रथम ग्रामपंचायत निवडणुका झाल्या. संपूर्ण पाटीलशाही संपवून गावात या निवडणुकीने एका मांगणीला सरपंच करण्यात आले. हा तर आमच्या गावाचा एक विक्रमच होता असंच वाटते. पहिल्या प्रथमच पाटलाच्या विरोधात सरपंच झाला तो मांग आणि ही सर्व देशपांड्याची कृपा. या घटनेने संपूर्ण पाटलाची लाज वेशीला टांगली होती. पाटलाच्या टोप्या खाली आल्या. गाव आता पाटलाचा नव्हता. केवळ महारांचं आणि मांगांचं राजकारण या गंगाधर पाटलाच्या गावात सुरू झाले होते. गावात लोक चर्चा करू लागले आणि याच चर्चेतून शेवटी पुनर्वसन ही गोष्ट मनात रूजली आणि या देशपांडेनी आपल्या

स्वत:च्या मळ्यात जागा देऊन सगळ्या महारा-मांगांना गावातून उठविले होते. आणि हजारो वर्षांपासून काडी काडी जमा झालेला संसार या देशपांडेंनी उद्ध्वस्त केला. गावाची दाणादाण झाली. पाटलाची पाटीलकी झुगारून लोक स्वतंत्र वागत होते.

पाटलाचा अभिमान इथे लोप पावला होता आणि आमच्या गावाचा नाश करणारा हा देशपांडेच आहे. याची जीत आपण नाही होऊ देणार म्हणून सर्व पाटील एकत्र आले. तलाठ्याला लाच-लुचपत देऊन शेवटी गावातून उठलेला हा गरीबाचा संसार तिथेही टिकू दिला नाही. आणि एका विराण अशा सरकारी गायरानावर त्या महारा-मांगांना हलविण्यात ते यशस्वी झाले. आज जिथं एकही माणूस आपला मिळणार नाही तिथं गावाचा हा संसार बनलेला आहे. आज मुजळगा हे गाव सुमारे तीन रूप धारण करून बसले आहे. काही माणसं गावाची माती सोडायला तयार नाहीत, ती आपली जन्मभूमी आहे म्हणून ते आजही गावातच आहेत. तर काही माणसं गावात भीती वाटते म्हणून गावाच्या वरती जाऊन आपला संसार मांडत आहेत. आणि एकदा गावातून उठलेली ही महारांची संसारे आज गावाची शिव सोडून पार दूर गेली आहेत. आणि एका हावरगा, चैनपूर या हद्दीतील शिवारात आपले संसार मांडले आहेत. आज एकही माणूस असा नाही की जो आपला आहे. गंगाधर पाटलांनी जपलेला गावाचा वारसा एका पाटील-ब्राह्मण संघर्षात धुळीला मिळाला आहे. आजही पाटलाच्या आठवणी केवळ गिरजावर आहेत. गिरजाला गावातून वर नेल्यानेच आमचा गाव आज उद्ध्वस्त झाला आहे, असंच ते म्हणतात. गंगाधर पाटलांनी जपलेल्या या मुजळग्याचे सुमारे तीन संसार होऊन विखुरले आहेत. हळूच वाऱ्याच्या एका मृदू झुळक्याने मनाला स्पर्शून जावा आणि स्वप्नात रममाण झालेल्या मनाला दिसावे ते फक्त तीन संसार आणि विखुरलेल्या वाटा ज्या कधी गंगाधर पाटलांनी एकत्र जोडल्या होत्या.....!

●●●

## उद्ध्वस्त घरे

['चिखलाच्या वाटा' कवितासंग्रहातून]

इथे पुरला आहे
संसार गरिबांचा
उद्ध्वस्त झाली घरे
लांडग्यांचा झाला सुळसुळाट
राज्य करतात आता
केवळ शोषित शोषितांचे
इथे पुरला आहे
श्रम बळीचा
उघडे आहे ते फक्त
शरीर माऊलीचे
हात शापीत श्रमाने
शोषितांच्या दाऱ्या खाली
इथे पुरलेली आहे भूक
उघडं पहावं तिच्याचसाठी

**सोनकांबळे सुनिल चंदरराव**
बी. ए. द्वितीय वर्ष

# वाड्यातल्या भाकरी

**सोनकांबळे सुनिल चंदरराव**
बी. ए. द्वितीय वर्ष

रानबा नांगर हाकत होता, परंतु त्याची सगळी नजर घराकडच्या वाटेवर लागली. उन्हं इतकी जोरात होती की, रानबाची उघडी पाठ घामाने न्हाऊन असतांना सुद्धा उन्हाचा चटका सहन होत नव्हता. नुकताच दोन दिवसाआधी पडलेला पाऊस रान ओले करून गेला. वापसा येऊन नांगरणी चालू होती. शिवारात, शेता-शेतावर नांगरण्या, वखरण्या दिसत होत्या. रानबा नांगर उभा करून थोडा विसावा घ्यावा म्हणून झाडाखाली आला. पहाटेला आलेला रानबा उपाशीच होता. न्याहारीची वेळ होऊन गेली. पोरानं भाकर का आणली नाही म्हणून तो आता येईल तवा येईल म्हणून वाट पाहू लागला. परंतु पोराचा काही पत्ता दिसेना म्हणून रानबा उठला. वाड्यात भाकर झाली नसंल असं मनातच बोलून पुन्हा नांगराकडे निघाला. नांगर हाकता हाकता पोरगं आता येईल तवा येईल म्हणू लागला. पुन्हा पुन्हा भुकेके हपापलेली त्याची नजर गावाच्या वाटेला चकरा मारू लागली. त्याने आकाशाकडं पाहिलं. दिवस पार वर आला होता. परंतु काळे ढग आकाशात भ्रमंती करू लागले. पाणी येण्यासारखं दिसते म्हणून एवढा घाम आलाय असं स्वत:शीच म्हणाला. भाकर काही येत नव्हती. पहाता पहाता आकाशात ढग जमा झाले. वाऱ्यानी ढगाशी सांगड घातली व वादळ होऊन ढगांना घेऊन पळू लागला. वारं, वादळ व आकाशातील काळे ढग पाऊस येणार याची कल्पना देऊ लागले. थोड्या वेळात पाऊस येणार म्हणून रानात काम करणाऱ्या बायका, पोरी खोपीला आश्रय घेऊ लागल्या. 'पळा, या' असा आरडाओरडा सुरू झाला. ढगाची गर्जना मनाला उगीचच भीव घालून जाऊ लागली. रानबानेही नांगर सोडलं. बैल धुऱ्यावर सोडून खोपीला आला. वादळात काहीच सुदरत नव्हतं. बाजूच्या शेतातून बाया, पोरी खोपीकडे येताना पाहून रानबा थोडा प्रसन्न झाला. पाणी पाऊसात एकटं रहाणं होत नाही म्हणून सोबतीला बाया, पोरी बऱ्या झाल्या. पहाता पहाता मेघगर्जना भयानक रूप घेऊन जमिनीवर कोसळू लागली. कडाकड विजा चमकू लागल्या. खोपीत रानबा गुडग्यातून मान वर काढून बसला. बाया, पोरी खोपीत बसल्या. वारा, पाऊस खोपीला झेपत नव्हता म्हणून मधून खोपीला धरू धरू बसू लागले. पहाता पहाता पावसाने तांडव सुरू केला. भिजत भिजत हारबा पळत खोपीत आला. ओले कपडे काढून घ्यावं म्हणून बायाजवळच्या दस्त्या घेऊन ओले कपडे उतरून पिळवण करून गुडघ्यावर हाडकवीत एका कोनाट्याला बसला. पाणी जोर धरला होता. वारं, पाणी पाहून खोपीतल्या बाया घाबरू लागल्या. रानबा त्यांना धीर देऊ लागला. हारबा मध्येच रानबाला भाकर वगैरे खाल्लास की नाही म्हणून विचारू लागला. भाकर आलीच नाही. गावातून पोरगं येईचना गेलं बघ म्हणून रानबाने गुडघ्यातील मान वर काढली. तसं हारबानं नजर वाकवत शब्द टाकला, 'पोरगं रानात चाललं होतं मी येताना,' हारबाची गोष्ट कटवतच रानबा म्हणाला, 'तू कवा आलास?' 'म्या आताच आलावं. हिंग थोडा वाकलाव तर पाणीच सुरू झालं' हारबाने शब्द टाकला. परंतु त्याच्या या शब्दाने रानबाच्या काळजाला छिन्न-विछिन्न करून टाकले. पोरगं भाकरी घेऊन वाटेत तर आलं नसेल काय म्हणून रानबा चिंतीत झाला. त्याच्या मनात पोराविषयी नको त्या शंका येऊ लागल्या. पाणी वरच्या वर जोर धरत होतं. पहाता पहाता साऱ्या शिवारात पाण्याच्या सऱ्या धावू लागल्या. पक्षी हैराण होऊन झाडांच्या फांदीत दडी मारून पाण्यापासून बचाव करू लागले. रानबाच्या शेताजवळून लवण जात होती. तिकडे पाहून

एका बाईने लवण तुडूंब भरून चालल्याची कल्पना दिली. रानबाही हळूच डोकावून बाहेर लवणीच्या दिशेला पाहू लागला. त्याची रोजची सोबती असणारी लवण एकदम उग्र रूप धारण केली. दोन्ही कडेवरच्या झाडांना आपल्या विक्राळी जबड्यात सामावून घेऊन वहात होती. हे दृश्य पाहून रानबा घाबरला. आपल्या गावाजवळची लवण भरली असेल, पोरगं कुठं अडकून बसलं की काय, घरीच असलं तर लयी चांगलं झालं असं म्हणू लागला. परंतु आतून तो घाबरला होता. चेहरा एकदम उतरून गेला. पाण्याची कमी होण्याची काही आशाच नव्हती. गोण्यात जमा झालेल्या बाया कडकडू लागल्या. थंडीने त्यांचे अंग गारठून गेले. शेकोटी पेटवावी म्हणून त्या विनंती करू लागल्या. गोठा लहान असल्यामुळे शेकोटी लावणे भीतीचेच होते. परंतु थंडीने बाया, पोरी कडकडू लागल्याने हारबा कोनट्यातला गवऱ्या घेऊन, आड्याचा पाचोळा जमवून, खोपीच्या मधोमध जाळ लावला. सगळ्या बाया जाळाभोवती बसून थंडीने गार झालेल्या अंगाला गरम करू लागल्या. बायांचा गलबला सुरू झाला. माहेरच्या गोष्टी, सासूच्या गोष्टी, नवऱ्याच्या गोष्टी एकमेकींना सांगू लागल्या. त्यांच्या गोष्टीला चांगलाच रंग आला. पाणी थोडं अंदाजावर आलं. आभाळाकडं बघत आभाळ निर्वाळलेलं दिसत होतं. ढगांचा काळेपणा संपला. रानानं पाणी धावत होतं, तसं आत बसलेल्या बाया उठल्या. बाहेर येऊन पाणी किती भारी पडलं याचा अंदाज घेऊ लागल्या. पाण्याने सगळे रान ओलेचिंब झाले. रानबाने नांगर उभा केला त्या जागी तर नांगराच्या पडलेल्या नालीने पाणी जमा झालं. रानबा उठला. नांगराचे बैल सोडून चरायला धुऱ्यावर सोडले. नांगर उचलून खोपीला सोडला. आता काही काम करता येत नाही म्हणून बाया घराकडे जाण्याची तयारी करू लागल्या. रानबाची छाती धडधड करत होती. बाया बाहेर पडल्या. हरबाही खोपीबाहेर पडला. जिकडे तिकडे बाया पांगल्या. रानबाही थोडा वेळ बैल चारून घरला जाणार होता. गावाच्या रस्त्याने बाया चालू लागल्या. गावाजवळची लवण भरून चालली म्हणून बाया एकमेकीच्या मागे-पुढे होऊ लागल्या. गावाजवळची लवण भरून वाहत होती. गावातले लोक लवणीच्या काठावर येऊन लवणीच्या उग्र रूपाकडे पाहू लागले. येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना रानातून घरी येण्यासाठी काही तरी करावं लागंल, सोल बांधावं, सांगडी घालावं असा विचार त्यांच्या डोक्यातून बाहेर येऊ लागला. परंतु कोणीही काहीही करत नव्हते. नुसतेच एकापेक्षा एक सूचना देऊ लागले. रानातून आलेले बाया-पोरं लवणीच्या कडवर येऊन थांबले. रानबाची बायको घरून लवणीवर आली होती. लवणीच्या शिवाराकडच्या बाजूच्या बायाला पाहून आपले धनी आले नाही काय? पोरगं आलं नाही काय म्हणून विचारू लागली. परंतु इकडच्या एका बाईनं पोरगं शेतात आलं नसल्याचं सांगितलं. ते ऐकून रानबाची बायको तर खालीच बसली. भाकर घेऊन पोरगं शेताकडे गेलं होतं. पाण्याच्या आधीच शेतात गेला काय की म्हणून म्या घरी बसलो असं म्हणून ती आक्रोश करून घेऊ लागली. गावात कोणाच्या तरी घरी बसला असेल याची चौकशीही झाली. परंतु पोराचा कुठंबी पत्ता नव्हता. लवणीच्या कडवर जमा झालेले लोक घाबरले. पोरगं लवणीत तर वाहून गेलं नाही, पाण्यात कुठून भिवून पडलं काय अशा विविध शंका निर्माण करू लागल्या. बाया तर नाही नाही त्या गोष्टी बोलू लागल्या. विविध प्रकारच्या शंका निर्माण करू लागल्या. रानबा बैल चारून घराकडं निघाला. लवणीचं पाणी उतरायला लागलं होतं. रानबाची बायको रडणं थांबत नव्हती. लोक पोरगं वाहून गेलं म्हणून हळहळ करू लागले. परंतु कोणीही मदतीला हात पुढे करत नव्हता. रानबा लवणीजवळ येताच त्याची छाती फुटली. लटकन खालीच बसला. पोरगं भाकरी घेऊन आलं होतं परंतु घरला आलं नाही असे त्याची बायको गावाकडच्या बाजूनं सांगू लागली. तेव्हा घाबरून जाऊन रानबा लवणीवर आडवा झाला. तेवढ्या चिखलाचं भान त्याला राहिलं नाही. लवणीतलं पाणी कमी झालं होतं. लोकं इकडून तिकडं येऊ जाऊ लागले होते. लोकांनी रानबाला धीर दिला. आपण सगळे लवणीनं पोराला बघत जाऊत म्हणून रानबासह आठ-दहा गावातली

करून मोकळं व्हायचं बघू लागले तसं पोराला काढण्याची तयारी होऊ लागली. पाटील अपराधी उभं टाकल्यासारखं रानबाच्या घरासमोर उभा होता. रानबा पाटलाकडं तिरस्काराच्या नजरेनं पहात होता. लिंबाच्या डहाळात घालून पोराचं मृत धड स्मशानाकडं नेण्यात आलं. तिथं पोराला जाळतांना रानबानं मनात वाड्यावर पाऊल ठेवणार नाही, त्याच्या वाड्याची पायरी चढणार नाही. या नौकरशाहीला सोडून शहरात जाऊन कारखानदारीत काम करून पैसा कमवीन परंतु या वाड्यातल्या भाकरीला पहाणार नाही. माझ्या हातचं पोरगं ओढणाऱ्या गरीब लाचार संसाराचा त्याग करून शहरात जाऊन पैसा कमावल्याशिवाय या पाटलाचं तोंडही पहायचं नाही. अशी शपथ पोराच्या सरणावर रानबानं घेतली. पोराची आग थंडावली न थंडावली रानबा बायकोला घेऊन शहराला निघून गेला. कोणता शेजारी त्यांना विचारू शकला नाही. किंवा पाटील सुद्धा या दोघांना बोलू शकले नाहीत. निव्वळ नजरेने पोराच्या आत्म्याला जाळून जाणाऱ्या या गरीब दांपत्याच्या पायाच्या खुणा पहात, गाव चौकात न सुटणारे कोडे सोडवत गावकरी उभे होते. जाता जाता जाणाऱ्या दोन सावल्या गावाशिवापासून मावळल्या. लोक निस्तावलेले चेहरे घेऊन सुटकेचा नि:श्वास टाकत जड मनानं पावलं परतीच्या प्रवासाकडं टाकू लागले.

●●●

## जीवन

जीवन सारं जगतांना
कधी रडायचं नसतं
उरी वेदना होतांना
सदा हसायचं असतं
काटा कुणाच्या मार्गी
कधी बनायचं नसतं
फूल बनून या जगी
सर्वांगा सुखवायचं असतं
ओझं आपलं दु:खाचं
कुणावर लादायचं नसतं
घेता आलं दु:ख कुणाचं
तर घ्यावयाचं असतं
शब्दाच्या माऱ्यानं...
घायाळ व्हायचं नसतं
स्निग्ध प्रितीच्या शब्दाने
सर्वांना सावरायचं असतं
क्षणभंगूर उदासीन
जीवनाला निभवायचं असतं
अंती मरतांना सर्वांना
प्रकाशीत करायचं असतं

**वाडीयार नारायण**
बी. ए. प्रथम वर्ष

## खंत

केलो विश्वास तुजवरी
तुझ्या अथांग नजरेवरी
थांबून होतो थकून होतो
तुझ्या बघण्यावरी
गेले दिवस बघण्यात किती
किती राहिलेत उन्हाळे आता
डोईवरी
समजलं होतं तुला माला
पण निघालीस तू ज्वाला
वाटलं फूल बनून घ्यावं तुला
पण केली तू पाषाण मला
नाही माहीत तुला प्रेमाचे प्रेमपण
म्हणून समजलीस मला पाषाणाचं खण
नाही झालो प्रेमी तुझा तरी
वाटली नाही खंत मला
राहीन बनूनी आकाश
तुझ्यावर शेवटचा श्वास

**वाडीयार नारायण**
बी. ए. प्रथम वर्ष

# आजची दिवाळी

आजची दिवाळी।
महागाईची दिवाळी। भ्रष्टाचाराची दिवाळी।
ते मिरवत आहेत
आणि गरीबीचे सोंग घेऊन
आम्हाला मात्र दरिद्री भेटत आहे
ही तर दरिद्रीचीच रोषणाई।
दिवाळी हा सण आनंदाचा। सुख-समृद्धीचा।
गोडधोड खाण्याचा।
पहाटे उठून पहिले पाणी, दुसरे पाणी करण्याचा
कुठे गेला हा आनंद?
आणि कसले गोडधोड?
सगळी बेचव झाली
उरली आहे एकच चव
महागाई ! महागाई !! महागाई !!!
फटाके कोण वाजवीत आहे?
फटाक्याचा भाव काय?
अशी ही आजची दिवाळी
अशी ही आजची रोषणाई !

**चिलवरवार व्यंकट आर. करडखेडकर**
एम. ए. प्रथम वर्ष (मराठी)

# लक्षात असू द्यावे

आल्या आहेत जवळ निवडणुका
लक्षात असू द्यावे।
आलो आहे मी कशासाठी?
लक्षात असू द्यावे।
करणार आहे कल्याण तुमचे
लक्षात असू द्यावे।
मांडणार आहे मी तुमचे प्रश्न
पण लक्षात असू द्यावे।
लावतो नौकरी मी तुमच्या मुलाला
लक्षात असू द्यावे।

*[निवडून आल्यानंतर]*
भेटतो पुन्हा मी पाच वर्षांनी
ते पण लक्षात असू द्यावे।
करीतो कल्याण नातेवाईकांचे
ते पण लक्षात असू द्यावे।

**चिलवरवार व्यंकट आर. करडखेडकर**
एम. ए. प्रथम वर्ष (मराठी)

# तो दिवस

दिवसामागून दिवस असेच
जात राहील आणि
आतुरलेले मन हे असेच
तो दिवस पाहत राहील
सूर्य उगवल्याप्रमाणे
तूही उगवशील
असे मला वाटत राहील.
कौलारू घराच्या छिद्रामधून
आलेला प्रकाश पाहून
जणू ते तुझाच प्रकाश
आहे की काय?
असा भास होऊन जाईल.
मी इकडे तिकडे वेड्यासारखे
चारी दिशांना पाहत राहीन
तू कोणत्या दिशेने येशील
हे मला काही समजत नाही
ह्या आतुरलेल्या मनाला
एक दिवस म्हणजे एक वर्ष
अजून माझे पूर्ण आयुष्य
तुझी वाट पाहण्यात जाईल.
पण तो दिवस मला काही
मिळेनासा होईल !

**चिलवरवार व्यंकट आर. करडखेडकर**
एम. ए. प्रथम वर्ष (मराठी)

## अनओळखी ओळख झाली

नव्हती तुझी ओळख काही
पडलीस माझ्या नजरेत तुही
पुन्हा-पुन्हा दिसतेस तुही
पण नव्हती तुझी ओळख काही
पुन्हा एकदा भेट झाली
तिच्या नावाची ओळख झाली
नविन प्रेमाची सुरूवात झाली
माझी तुझी ओळख झाली
मी तुझा प्रियकर झालो
तिच्या गालावर चढली लाली
पहिल्या स्पर्शाने घायाळ झाली
अर्धवट प्रेम सोडून गेली!

**एच. एम. कांबळे**
बी. ए. प्रथम वर्ष

## हा क्षण

कालचे पाय...
आज पाऊल कसे झाले?
ही बुद्धीची किमया
की मनाची असूया?
ही देहाची उन्नती
की आत्म्याची अवनती?
अरेरे.....
साऱ्या सुविधा असून
तू दुविधा!
हा क्षण... हे लक्षण...
सारंच विलक्षण!

**एच. एम. कांबळे**
बी. ए. प्रथम वर्ष

## नदी किनारी

नदीच्या किनारी होते रे, उभी
भेटण्यास मला येशील रे, कधी
वाटेकडे तुझ्या नजर रे, माझी
नदीच्या किनारी होते रे, उभी

किशोर वयाची सुरूवात आहे
तुझी भेट मला महत्त्वाची आहे
संगीन जीवन जगायचं आहे
किशोर वयाची सुरूवात आहे.

सोळावं वर्ष धोक्याचं वाटते
प्रेमाची चर्चा करावी वाटते
म्हणून तू मला भेटावे वाटते
सोळावं वर्ष धोक्याचं वाटते

**एच. एम. कांबळे**
बी. ए. प्रथम वर्ष

## आठवण प्रेमाची

प्रित तुझ्याशी जुळवूनी मी झालो सखे वेडा ग
कोमल मनाच्या नात्यांनी मी झालो सखे बावरा ग
तुझ्या विना मज वाटे जग सुना-सुना
तुझ्या शोधात फिरते मन वना-वना
आठवतो अजूनी तो दिवस मला
अथांग सागराच्या त्या लाटेला
बसून गाईलीस तू गोड गळा
त्या स्वराच्या भारात झालो मी आगळा वेगळा
खंत वाटे या मनाला
कसे विसरू या प्रेमाला?
नको हे जगणे मला
साथ दे माझ्या मनाला
खूप दूर आहे तुझ्यापासूनी
तुझ्या आठवणीत येते अश्रू नयनी
का मोहिलेस मला तू मृगनयनी
मी जातो तुझ्यापासून प्राण त्यागूनी

**वानखेडे मोहन गणपतराव**

## विसरलेल्या आठवणी

विसरलो तुला व तुझ्या आठवणी
पण तुला विसरलो हेच विसरलो नाही
ते गोड क्षण तुझ्या बोलण्याचे
विसरलो सारे आठवणी प्रेमाचे
चुकून कधी पाहिले तुला जर मी
तर तुला विसरून गेलो असे भासते
चुकून आठवण कधी आल्यास तुझी
स्वत:ला सांगतो, खेळ आहेत हे मनाचे
मनही भरून गेले आहे आता माझे
संपले ते वर्तूळ क्षुद्र भावनांचे
सर्व खोटं आहे हे कळूनसुद्धा
पाय वळतात तुझ्या दिशेने
कळत नाही हे दोष माझे आहे की,
माझ्या पावलांचे...!

**अनोद्दीन शेख**
बारावी, कला

## व्यर्थ जीवन

दारिद्र्याच्या खोल दरीत मी
जीवन माझे जगत आहे
वास्तवाचे भान सोडून मी
स्वप्नातल्या जगात वावरत आहे
मनी आशा बाळगून मी
तुटपुंजे शिक्षण घेतलो आहे
भ्रष्टाचारी समाजात मी
नौकरीसाठी भटकत आहे
बेकारीमुळे जीवनात मी
तीळ-तीळ खचत आहे
असा बेभान होऊन मी
या भूगर्भात व्यर्थ जीवन कटीत आहे.

**सोनकांबळे उत्तम मरीबा**
बी. ए. प्रथम वर्ष

## जाग स्त्री

शिकून सवरून मुलगी सासरी गेली,
पण कुणी हळद पुसण्याआधी मेली,
तर कुणी मेहंदी मिटण्याआधी मेली
अशी ही स्थिती पुरुषाने स्त्रीची केली
पैशाने हपापलेल्या या नराधमाने
हुंड्यासाठी स्त्रीची ही अवस्था केली
हुंड्याच्या रागाने किडलेल्या या समाजाने
स्त्रीची कॅन्सरसारखी दैना केली
तरी या स्त्रीला जाग कशी नाही आली?
जाग कशी नाही आली?

**सोनकांबळे उत्तम मरीबा**
बी. ए. प्रथम वर्ष

## भूकंपातील दिवस

निसर्ग कोपला भूकंप जागा झा
मानव भयभीत होऊ लागला
मानवाने घरे सोडून रानाचा थारा घेतला
भीती अधिक जागृत होऊ लागली
भीतीची खरी संज्ञा आता लोकांना कळू लागली
आतापर्यंतचा भूकंप मानवाला फक्त ऐकण्यात व
वाचण्यातच होता
आता प्रत्यक्षात अनुभवात येऊ लागला
भूकंपाच्या धक्क्याने मानव बेचैन होऊ लागला
आताचे जीवन क्षणाचे, मिनिटाचे, तासाचे व काही
दिवसाचे भासू लागले
जीवनातील जगण्याचा रस कमी होऊ लागला
मानवाला नंदनवनात असून देखील
वाळवंटात असल्यासारखे भासू लागले
स्वसंरक्षण देणारेच घरे आता शत्रू भासू लागले
आनंदाचा रस हळूहळू ओसरून
दु:खाच्या नदीत जाऊन मिळू लागला

**सुदर्शन सदाशिवराव क्षेत्री**
जांब बु., ता. मुखेड.

## 'मृगजळ'

जीवनाचे गीत मुक्तपणे गुणगुणत राहिले,
भूतकाळ हा विसरून पुढे चालत राहिले.
निष्पर्ण झाडांना पालवी फुटावी असं वाटले होते,
पण पानांचे ओझे सहणे झाडांना अशक्य झाले होते.
सागरातील शिंपल्यात मोती शोधीत राहिले,
ऐन उमेदीच्या काळात मृगजळामागे धावत राहिले.
माणुसकीला कोळून पिलेली माणसे भेटली होती,
वसंतऋतुतही वठलेली वृक्षे दिसली होती.
इवल्याशा जीवनात अनेक तुफानं आली,
दुरच्यांचे तर दूर, आपल्यांनीही नजर फिरवली.
असंख्य वेदना, जखमांचे ओझे वाहत राहिले,
अंधारातही आशेचा एक किरण शोधत राहिले.

**कु. एस. एल. कल्याणकर**
एम. ए. द्वितीय (इतिहास)

## 'स्त्रीत्व'

त्याग, कष्ट हा तर स्त्रीचा स्थायीभाव,
कष्टातून सौख्याचे मळे फुलविणे जणू तिचे जीवित कार्य,
फक्त वाट्याला येऊ नये तिच्या सहानुभूतीशून्य आपपर भाव
चंदनासम झिजत राहणे हीच तिच्या जीवनाची व्याख्या,
एवढीच होय स्त्रीची अपेक्षा, न व्हावी तयाची उपेक्षा
हा प्राणाहून प्रिय संदेश स्त्रीच्या रोमारोमात भिनला,
त्याग, कष्ट हा तर स्त्रीचा स्थायीभाव झाला.

## 'हुंडाबळी'

भातुकलीचा खेळ कधी संपला होता हे कळले नव्हते
भावी आयुष्याच्या भाव-विश्वात मी रमले होते
उंच उंच मनोरे मी मनाशी बांधीत होते
सुखासीन जीवनाचे स्वप्न मी रंगवीत होते
निरभ्र आकाश क्षणात ढगाळले होते
वळवाच्या पावसाने सुख वाहून नेले होते
दुसऱ्या विश्वात मी प्रवेश केला होता
माहेरची मी पाहुणी झाले होते
स्वप्न क्षणभंगूर असतात हे मला कळले नाही
हुंडाच माझा बळी घेईल हे उमगले नाही
दोष कुणाचा? प्रायश्चित कुणाला?
न्याय मागत नाही पण अन्याय सहन होत नाही
वास्तव्याचे उन पोळत आहे, वेदना सहन होत नाहीत
सांगते शेवटी एकदा, सज्जनहो!
हुंडा देऊ नका, घेऊ नका,
मुलींना बळी वेलीवर चढवू नका!

**कु. एस. एल. कल्याणकर**
एम. ए. द्वितीय (इतिहास)

## हिवाळी पावसाचे

रात्रभर ऐकूनी कर्कश सूर त्या हिवाळी पावसाचे
मन झाले आतूर निरोप घेण्यास थंडीचे
तिष्ठत राहिलो, वाट पाहिलो
त्या कोवळ्या उन्हाची
धमक लागता सोनेरी ती
आस झाली तृप्त मनाची
वळूनी पाहता तो रवी
मेघांआड मुख लपवी
पाठ दावीता तयास
धावत येतो खेळण्यास
लपंडाव तो मज सांगाती, खेळण्या इच्छितो अतिप्रीती
भास्कररूपी करवली जान
हळद फासली मजलागून
सजवूनी नवऱ्यासमान
नाम विचारते तियेचे
शिंपीत मजवरी मधू उन
न्हाऊ घालितो होळीसमान
अंग पाहता माझे
रंग दिसते पळस फुलाचे
प्रीतीने त्या उनाच्या मी रहस्य विसरलो जीवनाचे...!

**पडलवार नागनाथ मारोती**

## शारदे

हे शारदे, विश्ववरदे, आसन शोभते कमळीचे
आरूढ होऊनी कमळावरती दान करीसी विद्येचे।
तुज वर्णिता या जगती
नाही कोणी अधिपती
विश्वाची चालक शक्ती
देवादिक तुजला नमिती
तंतूवाद्य करी, घेऊनिया भारी, घुमविसी अंबर
ऐकुनी स्वर, सर्व नारीनर, झाले अजरामर।
चौसष्ट कला विद्येला
आशिष देसी संगीताला
वरदहस्त ठेवूनी माथा
[illegible]न करीसी गायकाला
विद्येने तुझ्या, हृदयात माझ्या, ठाण मांडीले
कृपेने तुझ्या, कष्टाने माझ्या, मी जग जिंकले।

**पडगलवार नागनाथ मारोती**

## हीच चावते शंका

असेच होते राष्ट्रात भांडण
सत्ता-सत्तांचे करीत होते खंडण
गोऱ्यांनी व्यापारी डाव मांडून
नेला संपूर्ण भारत लुटून
आले हातात घेऊन तराजू
पण चढवित राहिले सत्तेची बाजू
पहिल्यांदा होती कंपनी
मग घेतली सत्ता पार्लमेंटनी
लगेच अन्याय आले फुलून
त्यात काळे झाले छिन्न-विछिन्न
असून मायभू स्वत:ची
भीती झाली जगण्याची
यांची आली देवाला दया
दिली भारतीयांना छाया
गांधी, नेहरू, भगतसिंग
फुंकीले स्वातंत्र्याचे रणशिंग
त्यांच्या कष्टास फळ आले
ध्वज तिरंगी फडकले
पूर्वीसमान परकीय आज
भारतात करू लागले नाच
कंपन्या उघडून सारे
दावतात टी. व्ही. वर वारे
राष्ट्रात आहे आमचा राजा
विकू पाहतो मातेच्या लाजा
करार करूनी गॅट
परकीय भरले पोट
याचीच शंका वाटते
जीव तीळ-तीळ घटते
माझी मायभू गाईसमान
होईल परस्वाधीन!

**पडगलवार नागनाथ मारोती**

## म्हणे 'विसरून जा'

आजवरी जे काही घडले
सर्व ते 'विसरून जा'
आर्ततेने सांगसी गे
'सर्व ते विसरून जा'
मिलनाचे सुखही तुजला
सहन नाही जाहले
मुसमुसूनी अश्रू आले
गाल दोन्ही नहाले
अमृताच्या त्या क्षणाला
सांगसी विसरून जा
आर्ततेने सांगसी गे
'सर्व ते विसरून जा'
दैवयोग लाट येता
एक आपुल्या जीवनी
दूर हा सतिश झाला
दूरही संजीवनी
विरह दु:खे विकल हृदया
सांगसी 'विसरून जा'
आर्ततेने सांगसी गे

'सर्व ते विसरून जा'
चंदनाचा गंध सखये
घासुनी जाईल का
केशराचा रंग धुऊनी
हा कधी झाला फिका?
विस्मृतीचा यत्न करता
स्मृतीच भिडते काळजा
आणि तरीही सांगसी गे
'सर्व ते विसरून जा'

**जलदावार एस. व्ही.**
बी. ए. द्वितीय वर्ष

## स्मृती

भूतकाळाच्या डोंगरामध्ये
स्मृतीचा एक झरका होता
त्यात एका खोल कोपऱ्यात
होते आठवणींचे जाळे
फिरत होतो मी जाळ्यांचा
सोनेरी धाग्यांना शोधत
स्मृतीचं स्वप्न.....
..... भग्न झालेलं
तुटलेल्या धाग्यासारखं...
... नि फुटलेल्या नशिबासारखं!

**जलदावार एस. व्ही.**
बी. ए. द्वितीय वर्ष

## क्रूर तू होऊ नको

आजच्या या चांदण्याला चंद्र तू होऊ नको।
स्वर्ग वेड्या कोंदण्याला इंद्र तू होऊ नको॥
स्वप्न माझे पाहतांना रंग तू होऊ नको।
धुंदलेल्या कस्तुरीला गंध तू होऊ नको॥
सौख्य माझे शोधतांना लक्ष्य तू होऊ नको।
वेदनाच्या वाळवीला वृक्ष तू होऊ नको॥
रक्त माझे वाहतांना प्राण तू होऊ नको।
शोधूनी जे संपलं ते सूर तू होऊ नको॥
प्राक्तनी जे आपुल्या त्या क्रूर तू होऊ नको॥

**जलदावार एस. व्ही.**
बी. ए. द्वितीय वर्ष

## १. अनाथ

चोहीकडे नजर जाळणारे भकास चेहरे
व्याकूळ, पिसाट, खरजेल कुत्र्यासारखे!
भाद्रपदात तृप्तावलेल्या आत्म्यांचे बीज...
बेवारशी पसरतात महानगरात...
भाकरीवर रेंगाळणारी नजर -
आसवांच्या पुरात बुडते.
काळ्याकुट्ट रात्री, मिणमिणत्या उजेडात
झेपावतात प्रकाशाकडे.
पोचेपर्यंत सडते आयुष्य रात्रीच्या अंधारात
दुर्दैवाने वेशीवर विसावतांना...
चरकते हृदय, ऐन हिवाळ्यात...!

## २. नकळत

नकळत माझ्या ओठांवरती,
शब्द करो हे दाटून येती
या शब्दावरती जडली माया
माझी मलाच विसरली काया.
नकळत माझ्या स्पर्शाने
प्रित ही जडली, फुलली माया
या मायेच्या प्रेमासाठी
घुसलो अंतरात, नव तेज पहाया.
नकळत माझ्या नयनामध्ये
तरंगत असते तिची ती छाया
या छायेला फुटली माया
परी ती गेली अशीच वाया.

## स्वप्न-जीवन

तुझा सहवास
ऐन तारूण्यभरात
वचने प्रेमाची
साकारती स्वप्नात
खोटीच आन
शपथाही खोट्या
जीवन स्वप्नच का?
भंगल्याही आशा
समुद्रात मी आता
सापडलो कसा एकटा
शोधीतो किनारा म्हणूनी,
पण; मिळेनात त्या वाटा

## सांज

गेलो असता सागर तीरावर,
दृश्य देखिले नयन मनोहर
गोड गुलाबी छटा फैलवूनी
धुंद खेळतो रवी हा गगनी
निळ्या जळाचा अथांग सागर
दु:ख पिवूनी करतो, प्रेमाचा पाझर
बरहरी; वायूची हलचल,
रांगेतल्या माडांनी केले नयन भुरळ
शांत विहारी थवे पक्षांचे अंबरी
पाहुनी वाटे, परतावे घरी

## योग

एकच आस मना असावी,
त्यात जीवन उजळून जावे
एकदाच अशी तहान लागावी,
दु:ख सारे पिवुनी निघावे.
जीवनाच्या या वाटेवरती,
केव्हा तरी सडा सुखाचा पडावा
काट्यातूनही मार्ग सापडावा,
कधी तरी असा योग घडावा.

## हुरहूर

तू गेल्याने दूर
मला लागली हुरहूर
अश्रुंचा वाहतोय पूर
माझ्यात राहिलाच नाही नूर
आठवणींचा आलाय भरून उर
स्वप्न झालीच सारी चूर
का गेलीस तू दूर?
माझी नियतीच बनली क्रूर
दु:खाच्या डोहात मारतोय सूर
पण अश्रु ओझरतांना
ओसंडतोय महापूर...!

## उणीव

इथे एकटाच पडलो
दु:खाच्या खोल डोहात
गेलीस तू क्षितिजाच्याही पलीकडे
आभाळच कोसळले जीवनात
लुब्ध स्मृतीवर होते जीवन माझे
सरणही तू रचिले नाहीस
तरी तुझ्या मागे धावलो
वळून कधी तू पाहिले नाहीस
चांदण्याच नाहीश्या झाल्या
फिका दिसतो चंद्र आज
खोट्या प्रितीची साक्ष ठेवून
चढवलेस दु:खाचे साज
आता नच उन्मेष बहरण्याचा
वैफल्य हे मनात कुढण्याचा
वाळवंटात भटकतोय मी
तरी नच शोध पाण्याचा

## जीवन

जीवन नढले सुखदु:खांनी
त्यास शिष्याचे आवरण भारी
वेचले काटे; पुन्हा टाकती
कलयुगाची रीत ही न्यारी
मन इथे रूठलेले
खुंटलेली वाट सारी
काळरात्र हसते इथे
माणुसकीची पाठ कोरी
प्रवाह हेच जीवन
जिथे रस्ता, तोची धारा
दु:ख सारे पिवूनी
होतो पवित्र किनारा

## प्रतिक्षा

नको करू रे प्रतिक्षा
तुज नाही सखे कोणी
किती युगे असाच तू
जगशी वेड्यावानी
ढळले आसवं सुद्धा
तुज कोणी ना हळले
मग तूच असा कसा रे
तिवर आतुनी जीव भाळले
खडतर वाटेतून आयुष्याच्या
करतोस अजूनही प्रतिक्षा
यातना झेलून विरहाच्या
लोपवतोस तुझ्या आकांक्षा
राईच्या पर्वताआड
सूर्य तरी पोहचणार कसा?

## जड मन

माझ्या अंगणात
माझे शेवटचे घरचे आहे
तुझ्या शब्दाच्या थारोळ्यावर
माझे आसुसलेले जीवन आहे.
वर नभात चांदण्यांची दिवाळी
खाली रचले ते माझे सरण आहे
इवलेसे तृण कसे,
चुंबन मातेचे घेत आहे.
असा भरला सागर तरी
हा किनारा कोरडा आहे.
वारा सुटला जोरात
पान झाडाचे गळाले हे
मन बेभान लहरी
पान जुनाट राहिले हे.

## लाचारी

लाचारीत जगणे नको
अजानास ह्याचे काय?
आई-वडिलांची आस
पण डोनेशनचे काय?
शिक्षणच घेणे अवघड
मग बेकारीचे काय?
जीवनच असे निकामी
अशा जगण्याला अर्थ काय?

## दैव जाणिले कुणी!

जीवनात रंगतात स्वप्ने
काळाच्या ओघात बुडण्यासाठी
क्रूर नियतीची अभेद्य खेळी
झिरपून-झिरपून मरण्यासाठी
नकोत महाले मने जाळणारी, जळणारी
आमची झोपडीच आम्हास प्यारी
हरिश्चंद्र इथे नांदतो —
स्वप्नात राज्य दान करूनी
दैव जाणिले कुणी?
क्षणिक धरती, क्षणिक अंबर
क्षणिक क्षितिज, क्षणिक जीवन
मृत्यू येतो क्षणातुनी —
दैव जाणिले कुणी?

## व्यथा

आठवणीच्या व्यथा सोसतांना
हृदयातील दु:ख कोंडतांना
दाटून येतात ताज्या खुणा
अश्रुंच्या वाहत्या पुरावर
एक फूल उभारले होते
ते फूल कोमेजले -
जिथे इंद्रधनुष्य लकाकले होते
उजाड रानमाळावर जिथे -
उदासीन वारा कोंडला आहे
वादळात सापडलेल्या त्या -
स्मशानात घर माझे आहे
समाधिस्त त्या घरात
व्यथा दाटून येत आहे
मिळेना ठाव अश्रीत जगात
भाव फुटून येत आहे

## स्वप्नातल्या आसवांनो

किती तरी स्वप्ने होती,
तरंगत जीवनात ह्या
ती स्वप्ने होऊन बसलेत,
राख आगेच्या लपेटात ह्या
स्वप्नातल्या आसवांनो
अनमोल अश्रु नका ढाळू
स्वप्नेच मनाला उद्ध्वस्त करतात
जगाला एकदाचे द्या कळू
जीवन काळाच्या ओघात
कित्येक आघात बसले
ते हसणे, स्वच्छंद बहरणे
मध्येच रूसून बसले.

## भूक

डोळीयांची भूक
न वजे जनांची
अतृप्तच आत्मे
मृगजळही पिवूनी
सुख-सुख म्हणूनी
धुंडती अवघे जग
परी या देहाची
न शमे ही भूक
आसुसलेले विश्व सारे
कोणास तरी जागवावे
भोग म्हणूनी शिक्षा सखे
सोसावे आजन्मवासात
डोळ्यांनीही न पहावे
अवघा भरला हा बाजार
दुर्मिळच झाली ती शांती
रात्रीच्याही अंधारात.....

**हिवराळे सुभाष व्यंकटराव**
बी. ए. द्वितीय वर्ष
विद्यार्थी संसद सदस्य

## माणूसकीची हाक

माणुसकीची हाक सर्वत्र पसरते
गरीबाला कोणी विचारत नाहीत
पैशासाठी माणूस धावत आहे
गरीबाचा अन्याय कुठपर्यंत चालणार आहे?
गरीबाचा धिक्कार सर्वत्र होत आहे
रूपयासाठी माणूस शरमिंदा होत आहे
पैशाच्या भिकासाठी माणूस मागे जात आहे
गरीबाचा अन्याय कुठपर्यंत चालणार आहे?
व्याजाने माणूस बुडत आहे
कर्जाने माणूस डुबत आहे
गरीब माणूस काय खावे
गरीबाचा अन्याय कुठपर्यंत चालणार आहे?

**राजेश रंजीतराव ठाणेकर**
बी. ए. द्वितीय वर्ष

## दुष्काळ

आता ऋतु श्रावण
आल्या पाण्याच्या लहरी
आनंद [illegible] झाला
विराट रूप घेईले लहरी
विद्रोह माचला सरवीकडे
[illegible] दुष्काळ पाहता पसरला
भाकर कोन देईन आम्हा
भरून आले सागरी डोळे
[illegible] मनांना काय सुचे?
[illegible] कोण देई आम्हा
[illegible] गोजीरे पाहुणी
[illegible] झाली कशी शेताच्या सौद्याशी?

**जहागिरदार सुनिल मधुकरराव**
बी. ए. द्वितीय वर्ष

## ऊन

ऊन दिस पडले
रवी जळता गोळा दिसे
सरी केव्हा येती वाट पाहे मन
नांगर, वकर, ओसाड दिसे जमीन
हिरवी हाराळी न दिसे डोळी
जुपले बैल खुट्याली
फुटली भट्टी अंगाची
भाजून निघे अंग
वाटे पडावे ढवात, न पाणी ढवात
असा कसा हा उन्हाळा?
व्याकूळ केले मनांना
मना वाटे धरती वरती आले कसे नर्क?

**जहागिरदार सुनिल मधुकरराव**
बी. ए. द्वितीय वर्ष

## बदल

हलकासा वारा सुटला
वातावरण बदलू लागले
आभाळाकडे मी पाहिले
'ढग' काळे पडली
त्या ढगांना निळ्याकडून
काळ्याकडे जाण्यासाठी
बराच काल लागती
परंतु ए प्रिये!
वातावरण बदलण्यासाठी
इतका काल लागती
तू क्षणामध्ये बदललीस
ढग बदलून पाऊस पडून
ओलावा देऊन गेले
तू पण ओलावा दिलास
तो मात्र माझ्या डोळ्यातून
सतत वाहणाऱ्या अश्रुचा...!

**जहागिरदार सुनिल मधुकरराव**
बी. ए. द्वितीय वर्ष

## फुलपाखरू

वाऱ्याच्या मधुर लहरीवरती डोली फुले
त्यावर बसुनी फुलपाखरे शोषीत पराग
लाल, निळे, पिवळे, हिरवे नारंगी रंगाचे हे...
मना वाटे फुलपाखरू व्हावे, घ्यावी झेप
ह्या फुलावरती, त्या फुलावरती
मनसोक्त जाऊनी बसावे...
ना भीती कशाची, ना चिंता कशाची
आनंद दिसे चोहीकडे न दिसे दुःख
असे हे पाखरू जीवन जगू...
ना दिसे गुलामी, दिसे स्वातंत्र्य चोहीकडे
पहाती मन विरघाळून जाई
असे हे पाखरू जीवन जगती...

**जहागिरदार सुनिल मधुकरराव**
बी. ए. द्वितीय वर्ष

# जीवनरेखा

**सोनकांबळे उत्तम मरीबा**
बी. ए. द्वितीय वर्ष

दिवाळीच्या सुट्या संपल्या होत्या. कॉलेज सुरू होऊन दोन दिवस झाले. तरीही मुलं आलेले नव्हते. कॉलेजचे वातावरण उत्साही नव्हते आणि साहजिकच दिवाळीच्या सुट्यानंतर मुलांचा उत्साहही कमी होतो.

माझा ८.३० चा तास नव्हता म्हणून मी हिरवळीवर जाण्यास निघालो. तर ती माझ्या अगोदर हिरवळीवर बसून सकाळच्या त्या कोवळ्या सोनेरी किरणांकडे पहात बसली होती आणि ती सोनेरी किरणं तिच्या चेहऱ्यावर पडल्यामुळे ती अधिकच सुंदर दिसत होती. जणू सकाळी सकाळी नभातून 'परी' धरतीवर आली असं वाटत होतं.

ती एकसारखं आपलं तन, मन, धन लावून ती आपलं अस्तित्व विसरून त्या किरणांकडे पहात बसली होती. आणि तिच्या चेहऱ्याकडे मी पहात होतो व हळूच तिच्या बाजूस जाऊन बसलो; पण तिचं लक्ष काही माझ्याकडं नव्हतं. म्हणून मी 'खोकलं,' तेव्हा ती भानावर आली आणि म्हणाली, 'हॅलो राहूल, केव्हा आलास?' 'अर्धा तास झाला असेल, काय पहात होती इतका वेळ? आणि हो, पिरेडला का गेली नाहीस?' 'सहज रे ह्या सोनेरी किरणांकडे पहात बसले होते आणि त्या सोनेरी किरणांकडे पाहून आपल्याही जीवनात असे 'सोनेरी क्षण' केव्हा येतील याचाच विचार करीत होते व केव्हा पिरेड सुरू झाला हे कळलंच नाही.' आणि मग दोघांनीही त्या सोनेरी किरणांकडे पहात आपल्या आयुष्यातील सोनेरी स्वप्न पाहत होते. अशातच वेळ केव्हा गेला कळालंच नाही. सकाळचे दहा वाजले होते. कोवळे असणारे किरण आता तापू लागले होते.

दोघांनीही कॅन्टीनला जाऊन चहा घेतला आणि उरलेले पिरेड करून घरी परतले. रोज भेटत होते, प्रेमाच्या गोष्टी करत होते. सुखमय आयुष्याची सोनेरी स्वप्न पहात होते.

जानेवारी संपत आले होते. परीक्षेसाठी दोन ते तीन महिने उरले होते. त्यासाठी अभ्यास जलद गतीने होणं आवश्यक होते. म्हणून दोघांनीही समोरील भविष्याचा विचार करून भेटायचं नाही असं ठरविलं. कारण आता हे बी. ए. चे तृतीय वर्ष होते आणि आयुष्याची जडणघडण या परीक्षेनंतर ठरणार होती. त्यासाठी परीक्षा संपेपर्यंत भेटायचं नाही असं दोघांनीही ठरविलं होतं.

अभ्यास दोघांचाही चांगला चालला होता. अशातच परीक्षेचे वेळापत्रकही आलेलं होतं. परीक्षा ३ एप्रिलपासून सुरू होणार होत्या. परीक्षेची तयारी जोमाने चालली होती. याही वर्षी मी कॉलेजमधून सर्वप्रथम यावे अशी सुचित्राची इच्छा होती.

एकदाचं ३ एप्रिल उजाडलं. पहिला पेपर मराठीचा होता. आम्हा दोघांचाही ऐच्छिक मराठी हा विषय होता. अकरा वाजता परीक्षा सुरू होणार होती. मी दहा वाजताच कॉलेजला पोहचलो होतो. कारण आम्हा दोघांचं भेटण्याचं एकमेव ठिकाण हे कॉलेजच होतं. साडे दहा वाजले तरी अजून सुचित्राचा अजून पत्ता नव्हता. मला काळजी वाटू लागली की, परीक्षेला अर्धा तास शिल्लक असतांना 'ही' कशी आली नाही? आणि पहाता पहाता शिल्लक असलेला अर्धा तासही पूर्ण होत आला होता. तरीही तिचा अजून पत्ता नाही. मला अधिकच काळजी वाटू लागली. माझे मित्र मला 'चल चल' म्हणत होते. मी आलो म्हणून सुचित्राची वेट करत उभा होतो. पण ती काही आली नाही. अखेरीस घंटा देखील वाजली तरीही ती आली नव्हती. मी आता मित्रांसोबत हॉलमध्ये तर गेलो; पण सारखा

प्रश्न पडला होता की, वर्षभर अभ्यास करून ही परीक्षेला का आली नाही? काय झालं असेल? अशा विविध प्रश्नांनी मनात एकच गोंधळ निर्माण केला होता. परीक्षेत काही मन लागत नव्हतं; पण तरीही धीर धरून मनाला लगाम घालून कशी तरी परीक्षा दिली आणि पेपर सुटला. पेपर देऊन थेट सुचित्राचं घर गाठलं तर घराला कुलूप! छातीत धस्स झालं. शेजाऱ्यांना विचारपूस केली असता असं कळालं की, तिच्या वडिलांची प्रकृती ठिक नसल्याची तार मुंबईहून आली होती. मुंबईला तिचे वडील नौकरीला होते. तेव्हा तिची आई, ती व तिचा लहान भाऊ हे सकाळीच मुंबईला गेले असं समजलं आणि मी हलक्या पावलानं घरी परतलो. तरीही मनात येतच होते काय झालं असेल? अशी सर्वजण गेलेत तर जास्तीचा आजार नसेल ना? असे अनेक प्रश्न निर्माण होत होते.

सुचित्राने तरी कमीत कमी परीक्षा देऊन जायचे होते. मला भेटायचं तरी होतं. बी. ए. झाल्यानंतर 'लॉ' करायचं तिचं स्वप्न होतं. त्याचा तरी विचार करायची होती. असेच विचार मनात घोळत होते. प्रत्येक क्षणी तिची आठवण येत होती. अशातच आजचा शेवटचा पेपर देऊन आलो. तरी ह्या दहा-पंधरा दिवसांत तिनं एकही पत्र पाठवू नये याचा रागही येत होता आणि काळजी वाटत होती. मुंबईला जावे तर पत्ताही नव्हता. मग अशा वेळी काय करावे ते सुचेना. ह्यात दोन महिने झाले.

सकाळीच निकाल लागल्याचं कळालं पण निकाल पाहण्याचं सामर्थ्य माझ्यात नव्हतं. कारण गेल्या वर्षी म्हणजे मी द्वितीय वर्षात असतांनाच निकाल तिनंच पाहिला होता. आणि कॉलेजमध्ये सर्वप्रथम आलो म्हणून ती इतकी खूष झाली की, ती माझ्या सर्व मित्रांना माझ्याकडून दिली आणि आज ती इथं नव्हती. मित्रांनीच येऊन सांगितलं की, मी पास झालो म्हणून; पण मला त्या पास होण्याचा आनंद माझ्यात उरलेला नव्हता.

आठ-दहा दिवसांनी एक पत्र आलं आणि ते सुचित्राचं होतं. नाव होतं पण पत्ता दिलेला नव्हता. मी त्याकडे दुर्लक्ष करत पत्र फोडलं आणि वाचण्यास सुरूवात केली.

प्रिय मित्र राहूल यास

स. न. वि. वि.

प्रथम तुला न सांगताच गेल्यांबद्दल माफी मागते. दुसरी गोष्ट म्हणजे तू पास झाल्याचं कळालं. 'अभिनंदन'!

राहूल, माझ्या वडिलांची प्रकृती ठिक नसल्यामुळे मला मुंबईला यावं लागलं आणि परीक्षा देता आली नाही. तरीही त्याचं दु:ख मला नाही. तू पास झाल्याचा आनंद अधिक झालेला आहे.

माझ्या वडिलांना 'अ‍ॅटॅक' चा दुसरा झटका आलेला आहे. तेव्हा डॉक्टरांचं असं म्हणणं आहे की, यांच्या मनावर कसलाही ताण बसला तर त्यांच्या जीविताला काहीही होण्याची शक्यता आहे. आणि अशातच माझ्या वडिलांची इच्छा आहे की, मी त्यांच्या मित्राच्या मुलाशी लग्न करावं. कारण त्यांनी तसं त्या मित्राला सांगितलं की, मी लग्नास तयार आहे म्हणून. कारण त्यांना (वडिलांना) पूर्ण विश्वास माझ्यावर होता. आता अशा परिस्थितीत त्यांना विरोधही करता येत नाही. त्यांना जर मी हे लग्न करणार नाही समजलं तर त्यांना काहीही होण्याची शक्यता आहे.

मला अनेक परिस्थितीतून विचार करावा लागत आहे. माझी काय परिस्थिती होत असेल याची जाणीव माहीत नाही तुला. मी मनावर फार मोठा दगड ठेवून ह्या लग्नास तयार झाले आहे. कारण ह्यात माझ्या आईचं कुंकू, भावाच्या भविष्यासाठी मला आपल्या प्रेमाचा बळी द्यावा लागत आहे. राहूल, माझ्या जागी तू असतास तर काय केलं असतसं? राहुल, मी कोणत्या शब्दात माफी मागू कळत नाही. राहुल, मला क्षमा कर! तू मला व माझ्या परिस्थितीला समजून घेण्याचा प्रयत्न कर. स्वत:चं भवितव्य माझ्यासाठी अंधारात ठेवू नकोस. तुला आपल्या प्रेमाची शपथ! स्वत:ला सावर. राहुल, मी हे पत्र कसं लिहित आहे तुला

समजत नसेल. राहुल, I am very very sorry.

तुझीच

सुचित्रा

पत्र वाचताच माझ्या हातून पत्र केव्हा खाली पडलं आणि हाता-पायातील बळही केव्हा गेलं कळलंच नाही व डोळ्यांसमोर अंधार पडला.....

•••

## कापलेले पंख

स्वप्नात केल्या होत्या,
मुक्तीच्या त्या कल्पना
स्वप्नात न जाणले मनाने
स्त्रीचे हे असह्य जगणे
मुक्ती अंगीकारावी म्हटले,
पण, बोटे माझ्याकडे वळली
श्वास घेणे कठीण झाले
आणि जीवन अर्धेच सोडावे लागले.
तेव्हा विचार मी मनीं केला
मुक्तीपेक्षा बंधनेच बरे,
जीवन जगता येईल सारे.
पण जेव्हा माझ्यातली,
स्त्री जागी होते, तेव्हा...
माझ्या गुलामगिरीची लाज वाटते मला
धिक्कार वाटतो या जगण्याचा
पण तेव्हा कोणीच नसतो
मुक्तीची वाट दाखवायला
म्हणूनच म्हणते बंधने आपुल्या वाट्याला.

**कु. पुनम देशमुख उर्फ दर्शना**
बी. ए. प्रथम वर्ष

## फक्त तुझ्यासाठी

उरलं आहे माझं जीवन
फक्त तुझ्यासाठी
अतुर आहे मन
फक्त तुझ्यासाठी
मी हसले दुःख विसरून
फक्त तुझ्यासाठी
तुझा चेहरा दिसावा या जगी
म्हणूनी नयन पाहती या जगी
दृष्टी आहे माझी
फक्त तुझ्यासाठी
ओठ माझे कुजबुजतात
फक्त तुझ्यासाठी
शृंगार माझा,
फक्त तुझ्यासाठी
जगाला विसरून गेले
फक्त तुझ्यासाठी
नयनी आश्रू आले
फक्त तुझ्यासाठी
प्रेम माझं, नातं माझं
फक्त तुझ्यासाठी
जगत आहे
फक्त तुझ्यासाठी
सर्व काही तुझ्यासाठी
असं काहीच नाही माझ्यासाठी
कारण, मीच आहे तुझ्यासाठी...!

**कु. पुनम देशमुख उर्फ दर्शना**
बी. ए. प्रथम वर्ष

# शुन्यातले जगणे

**कु. पुनम देशमुख उर्फ दर्शना**
बी. ए. प्रथम वर्ष

पावसाळ्यातील ते दिवस होते, पाऊस म्हणावा तसा नव्हता. तरी जमिनीला ओला करण्यापुरता सडाका येत होता. थोड्या-फार प्रमाणात हिरवळ उमलली होती.

या हवामानात.... अचानक तू मला प्रवासात नजरेला पडला होतास.... आणि दोघांच्या नजरा एक झाल्या.... तेव्हा तुझा चेहरा चकाकला होता.... परंतु आपण नुकतेच भेटलो होतो.... आणि अनोळखी.... म्हणून नजरेचा खोल परिणाम झाला नाही.... पण मनाच्या कोपऱ्यात काहीतरी मुरत होते....

कित्येक दिवस निघून गेले.... आणि नंतरही तू मला प्रवासात भेटलास.... आणि तुला पाहून न जाणे मला आनंद वाटला होता.... तू माझ्याकडून कसली तरी अपेक्षा करीत होतास.... हे तुझ्या गोड हसण्यातून समजून आले पण त्याचवेळी माझे ओठ कुजबुजत होते.... का कुणास ठाऊक?

माझी नजर खाली झुकली.... तेव्हा तू माझ्या अगदी जवळ आलास.... समुद्र आणि नदी मिळतात त्याचप्रमाणे माझ्या परछाईत तुझी परछाई मिळून गेली होती.... मला असं वाटत होते की तुला मी फार पूर्वीपासून ओळखते.... या विचारातच मी होते.... आणि तू एकदम माझा हात तुझ्या हाती घेतलास... मी घाबरून गेले.... तुला रागावण्यास मनही तयार नव्हते.... पण तुझा स्पर्श मला अनोखा आणि हवाहवासा वाटत होता.... तुझ्यापासून दूर जाण्यासाठी माझी पावलं उचलत नव्हती.... माझ्या हृदयातील धडकन बोलू लागली होती.... माझा हात सोडून तू मधुर स्वरात म्हणालास.... तुझं.... नाव.... ''सुरेखा''.... मी अस्पष्ट म्हणाले.... त्यावर तुझ्यात कवीपण जन्म घेतल्याप्रमाणे बोलत होतास.... नावाप्रमाणे खरंच तू सुरेख आहेस.... तुझ्या या बोलण्याला उत्तर म्हणून.... मी तुझं नाव विचारलं होते.... तू अवाकपणे श्वास न घेता म्हणालास.... ''केतन'' मी दचकून तुझा चेहरा न्याहळत होते.... तुझा धीटपणा, मला खूप आवडला होता....

आणि काही क्षणातच मी तुझी आणि तू माझा झाला होतास.... मनाने आपण एकरूप झालो होतो.... तुझ्यावर मी भाळले होते, आणि माझ्यावर तू फिदा झाला होतास.... हे अचानक घडलं की कल्पना सुद्धा कधी मनात केले नव्हते.... तुझ्या डोळ्यातील आतुरता आणि प्रेम पाहून मी प्रतिसाद दिला होता.... तेव्हा तुझा चेहरा खूपच खुलून दिसत होता.... ज्याप्रमाणे पोर्णिमेचा चंद्र दिसतो त्याप्रमाणे तुझा चेहरा अतिशय मोहक दिसत होता.... माझ्या मनातलं स्नेह प्रेम जागं झाले.... आणि या सुरम्य प्रसंगी तू मला मिठी मारली होतीस.... तुझ्या बाहुपाशात मी पूर्ण जग विसरले होते.... आणि तुझ्या भारदस्त छातीवर डोके ठेवले.... तुझी ही मिठी अद्‌भूत होती आणि हा माझ्या जीवनातला अविस्मरणीय क्षण होता....

वेळ निघून गेला.... आणि आपले प्रेम वाढत गेले.... माझ्यासाठी तू सर्व काही होतास.... आणि आपल्या प्रेमाचं रूपांतर आपल्या लग्नात झालं.... मला अतिशय आनंद झाला होता.... तू ही मॅनेजरचा मालक झाला होतास.... दाही दिशांनी आनंदी आनंद होता....

पण या आनंदात दुःखाने आपला वाटा विसरला नव्हता.... आनंदाच्या पाठीमागे दडलेले दुःख.... मला तेव्हा माहीत झाले, जेव्हा मी शिक्षणासाठी तुझ्यापासून दूर जात होते.... याचे अमाप दुःख तुला होत होते.... कारण तुझे अश्रू, उदास चेहरा मला सर्व काही सांगून जात होते.... पण तुझ्यापेक्षा कितीतरी जास्त दुःख मला होत होते.... पण दुःखाला बळी जाणे हे मला रूचत नव्हते.... म्हणूनच मनाला दगड बनवले होते....

अगदी थोड्याच दिवसात आपण एकमेकामध्ये किती गुंतलो होतो.... पण भाबड्या मनाला समजूत दिली.... आणि निरोपाची वेळ आली.... आणि ''अश्रुने डबडबलेल्या डोळ्याला, अश्रुंनी डबडबलेल्या डोळ्यांनी निरोप दिला होता''.... पाय उचलत नव्हते.... अस्वस्थ होऊन मी स्थिर पावले उचलत होते.... तेव्हा तू हळवी आणि गोड हाक मारलीस.... ''सुरेखा''.... मी वळले होते.... कंठातून शब्द फुटत नव्हता.... तरीही डोळे तुझ्या चेहऱ्यावर टिपले होते.... करून आवाजात म्हणालास तू.... ''मला विसरू नको काळजी घे, मी वाट पहातो....'' मी तुझ्याकडे पाठ फिरवली आणि वेगाने चालत गेले होते....

मी निघून गेले.... तुझे प्रेम सोबत घेऊन.... आणि माझी प्रतिमा तुझ्या डोळ्यात ठेवून....

तुझ्या आठवणीत दिवस जात होते.... अचानक दुपारी फोनची घंटी वाजली.... मी फोन उचलला.... माझ्या पायातले त्राण गळून गेले.... माझा माझ्यावर विश्वास बसेना.... मी चक्रावून गेले होते.... विचार करू लागले तुझ्या मृत्यूचा.... तुझा अपघात मला यातना, त्रास देत होता.... रडवत होता.... तुझ्या मृत्यूची बातमी मला अफवा वाटत होती.... दु:खात आणि आश्रुत मी विलीन झाले.... हे घडलेच नाही असं वाटत होते.... शेवटी मनाचा तोल सांभाळून.... दु:ख आत्मसात करून.... अश्रू पिवून मी तुझ्याकडे निघाले.... वाटत होते.... ''माझा केतन'' माझी वाट पहात असेल.... पण माझा समज जखमेवर मलमपट्टी केल्यासारखा होता....

हे मला तेव्हा समजले जेव्हा मी तुझ्या मृत शय्येजवळ पोहोचले.... अनंत दु:खाच्या डागण्या देत होत्या.... मी दुर्दैवी होते हे समजून आले.... कारण तुझ्या मृत्यूची जबाबदार मला ठरवलं गेले.... तुझ्या दफनाची वेळ येऊन ठेपली.... तेव्हा मी स्वत:ला आवरू शकले नाही.... मी केविलवाणा आक्रोश करून रडू लागले.... पण त्या ठिकाणी माझ्या अश्रूला समजून घेणारा कोणीच नव्हता.... जो होता त्यानेच पाठ फिरवली होती.... तुझी चिता पेटविली.... तेव्हा तुला भाजेल या भीतीने मी तुझ्याकडे धावले.... तेव्हा पण तू साधी हालचाल केली नाहीस.... मी तशीच उभी राहिले....

तुझी चिता पेटली आणि सर्व लोक घरी परतले.... त्यात मी ही होते.... पाठ फिरवून जातांना असं वाटत होतं.... ''तू मला सोडून गेलास की.... मी तुला सोडून जात आहे, हा प्रश्न प्रश्नच राहून गेला.... आणि मी घर गाठलं....

केव्हा केव्हा विचार येतो.... मी ऋतु असते तर.... प्रत्येक मोसमाप्रमाणे मला बदलता आले असते.... पण मी माणूस आहे.... माझा आत्मा एकच आहे.... आणि मन ही तुझ्यात गुंतले आहे.... तुला विसरणे तर फारच कठीण आहे.... म्हणूनच जेव्हा पावसाळ्यातील दिवस येतात.... तेव्हा हवामान थंड असूनही.... शीतल, सौम्य, प्रसन्न वातावरणात मी अस्वस्थ, नाराज, तगमगत असते.... आणि शुन्यात विलीन होऊन.... जाते जाते....

•••

## वेडे मन

वेड्या मनाची वेडीच आशा
वेड्या मनाची वेडीच कल्पना
वेडे मन स्वप्न उगीच रंगवते
वाऱ्यासारखे भरकटत जाते
वेडे मन खूपच सुसाट पळते
आधार त्याला कुणाचाच नसतो
पळून पळून थकून जाते.
या मनाला समजून नाही कोणी घेत
वेडे मन एकटेच धावण्यास सुरूवात करते
वाटेवरचे काटे यातना करून जातात
वेडे मन थकून अश्रू ढाळते
आशेतून उत्पन्न होणारी स्वप्नं
कोणीतरी धुळीत मिळवितो ते स्वप्नं
तेव्हा मन निराशेचा धूर सोडते
आणि स्वप्न पुन्हा सजविते
वेडे मन आशा ठेऊनच जगते
वेडे मन आधार मला देते
माझे मन, मलाच समजते!

**कु. पुनम देशमुख उर्फ दर्शना**
बी. ए. प्रथम वर्ष

# ''कटपुतळी मृत्यू तिचा''

**कु. पुनम देशमुख उर्फ दर्शना**
बी. ए. प्रथम वर्ष

पावसाळ्यातील दिवस होते. निसर्ग अगदी नवीन नवरीप्रमाणे सजलेल्या, बहरलेल्या रूपात डोलात होता. पक्षी आकाशात भराऱ्या मारत होते. कोकीळा गाणी ऐकवीत होती. चोहीकडे प्रसन्नता होती. सुमन सारी बाग फिरत होती. फिरता फिरता फुलपाखराला पकडण्यासाठी ती त्याच्या पाठीमागे धावत होती. पण तिचा पकडण्याचा प्रयत्न फोल जात होता.

ती थकून झाडाखाली येऊन बसली. आणि सगळीकडे नजर फिरवत होती. सुमनची नजर एकदम एकांत, दुःखी, निराश असलेल्या 'ललिता' कडे गेली आणि सुमन आवाकपणे म्हणाली, ''माय गॉड, काय ही उदासीनता?'' सुमनच्या शब्दातून ललिताविषयी आस्था दिसून आली. ती पुन्हा उद्गारली, ''मी पण स्त्री आहे, पण मी तिच्यासारखी अस्वस्थ नाही, तिचे दुःख जाणलेच पाहिजे.''

सुमन ललिताच्या दिशेने वळली आणि म्हणाली, ''मला, ती नाहीच बोलली तर...'' परत ती चालू लागली, आणि सुमन ललिताच्या जवळ बसून म्हणाली, ''मी सुमन! आपण...'' ''मी ललिता...'' ती म्हणाली.

सुमन ललिताच्या चेहऱ्याकडे पहात म्हणते, ''किती आल्हाददायक आहे हे वातावरण, किती सुंदर आणि हवाहवासा वाटणारा निसर्ग फुलून आला आहे, किती रम्य आहे हे सर्व. निसर्ग किती मेहरबान आहे मानवावर...'' ललिता भानावर येऊन दुःखाने म्हणते, ''हो, निसर्ग माणसावर मेहरबान आहे म्हणून सर्व काही पचत आहे. निसर्गाला हजार रूपं घेता येतात पण...'' सुमनने ललिताचं पण मधले वाक्य जाणले. ललिताच्या भावना, क्रोध, जोश मारत होता. सुमन सत्यता जाणण्यासाठी अंजान बनली आणि म्हणाली, ''तुम्हाला खूपच यातना होतात. असं झालं तरी काय?''

सुमनकडे पहात अश्रू ढाळत, ललिता म्हणाली, ''ज्याचं जळतं त्यालाच कळतं.'' ललिता दुःख आवरून म्हणाली, ''माझे हे शरीर आहे, पण त्यात आत्मा नाही. फक्त कोरड्या दुःखाची गाठोडी आहे. स्त्री शरीर जळून खाक झालं आहे. फक्त आकृती बाकी आहे.''

सुमन गोंधळून म्हणाली, ''मिस ललिता, आपल्या बोलण्याचा अर्थ मला समजला नाही, तरीही आपल्या भावना, व्यथा, यातनांची जाणीव करून देतात. तरी तुम्ही वास्तवता दाखवण्यापेक्षा आपल्या व्यथेची कहाणी सांगा. प्लीज.''

ललिता म्हणाली, ''हलकट, वासनी पुरूषासमोर मला माझ्या ध्येयाचा बाजार मांडावा लागला, शरीराचे प्रदर्शन करावे लागले. वासनेने भुकलेल्या कुत्र्यांनी आपली तृष्णा शांत केली. आणि मला अग्नीच्या खाईत नरकात सोडलं, ज्यात मी जीवन संपवू इच्छिते. पण थांबावं लागलं, एका धाग्यासाठी. ही माझी कहाणी आहे, नुसती कहाणी नसून जीवनाची बरबादी या कहाणीतून झाली.'' ललिता सांगू लागली.

माझा जन्म गरीब झोपडीत झाला. खूप इच्छा होती प्राध्यापक व्हायची. पण आड आली गरिबी, आड आली पोटाची आग. बारावीपर्यंत शिक्षण घेतलं, तेही मोडकं तोडकं, आईची भांडी धुणी कुठपर्यंत भागवायची. लहान भावंड, त्यांचे शिक्षण, त्यांची भाकरी यामुळे शिक्षण सोडून द्यावे लागले. आणि आपल्याला पेलवणारं नव्हतं. आणि झोपडीतला दिवा रॉकेल असेपर्यंत चालायचा, रॉकेल संपले की झोपडीत

काळोखाचे साम्राज्य. म्हणूनच दिव्याला रॉकेल आणि पोटाला भाकरी हे मिळणे अवघड होते. आईचे हाल पाहवत नव्हते आणि मी नौकरीच्या शोधात लागले.

प्रत्येक ठिकाणाहून रिकाम्या हाताने परतावे लागले होते. झोपडीतले तारूण्य सर्वांच्या नजरेला झोंबत होते. कारण झोपडीत कुडाला कितीही थोपवून धरण्याचा प्रयत्न केला तर, सुसाट सुटलेल्या वाऱ्याने थोपून धरलेले कुड मोडून टाकते. त्याच प्रमाणे माझ्या जवानीला लपवण्यासाठी इमारती नव्हत्या, मजल्याची घरे नव्हती. होती ती कुडाची झोपडी, रिकामे भाकरीचे टोपले. प्रत्येक ठिकाणी माझ्या तारूण्यावर फिदा झालेले गरूड भेटले आणि प्रत्येक ठिकाणाहून मी पाठ फिरवली. पण आता ते शक्य नव्हते. चार पैसे कमविणे जरूरी होते. या विचारात झोप लागली.

मी सकाळी नऊच्या दरम्यान घराच्या बाहेर पडले आणि मनाशी निश्चय केला, ''नोकरी करायची.'' पायी पायी ऑफिस गाठलं, आणि ऑफिससमोर जाऊन नोकरीची मागणी केली. पूर्वी ह्या ऑफिसच्या नोकरीला लाथ मारून आले होते. पण आता हात जोडले होते. त्याने नोकरी देण्याचे मंजूर केले आणि टेबलावर पडलेल्या फाईल उघडून त्यावर सही करण्याचा इशारा केला. मी सही करण्यासाठी झुकले तोच त्याने आपल्या बाहुपाशात जखडले. त्याच्या हातात रूमाल होता तो मी घेतला. कारण नाकाच्या समोर धरला होता आणि क्षणात मी बेहोष झाले. जेव्हा मला होश आला, तेव्हा मी लुटले होते. मी कशीबशी उठून घरी परतले.

माझी मला लाज वाटत होती. डोळ्यात रक्ताचे अश्रु थांबले. बरबादीचे चिन्ह डिवचू लागले. चोहीकडे काळोख दिसत होता. अस्वस्थ होऊन बिछान्यावर पडले. तिथली नोकरी सोडून द्यावी आणि आपल्या अपमानाचा बदला घ्यावा, असे वाटत होते. पण पुन्हा आईचा, लहान भावंडांचा विचार येई. पण मी ठरवले होते, काहीही असो हा मार्ग स्वीकारायचा नाही. पूर्ण रात्र विचारात गेली. ऑफिसमध्ये झालेला प्रकार मला शांत बसू देत नव्हता आणि नोकरीसाठी झालेली बेअब्रू मला सहन होत नव्हती.

सकाळी उठून मी ऑफिराचा रस्ता धरला आणि मी रागाने कॅबिनमध्ये गेले. तो नालायक म्हणाला, ''वेलकम.'' असं म्हणून मी काही म्हणण्याच्या अगोदरच त्याने माझ्या समोर पांढरा लिफाफा दिला. मी तो लिफाफा लगबगीने फोडला आणि पाहते तर काय, मी बेहोश असताना घाणेरडे फोटो व ऑफिसरचा नालायकपणा सहनशक्तीच्या बाहेर होता. पायातले त्राण गळून गेले. मी विस्कळीत झाले आणि रागाने त्या फोटो जाळून टाकल्या. तोच तो मोठ्याने हसत म्हणाला, ''ह्या फोटो तू जाळल्या, परंतु निगेटिव्ह माझ्याकडे आहेत.'' माझा क्रोध अनावर झाला आणि ''यू रॉसकल,'' म्हणून मी हात उचलला तोच त्याने हात रोखला आणि म्हणाला, ''या फोटो पेपरमध्ये दिल्यानंतर चांगलीच प्रसिद्धी आणि पेपरवाल्याच्या प्रती पण खपतील.'' ''यू शटप, मला वाटलं नव्हतं, तुझ्याइतका नालायक दुसरा कोणी नाही.'' यावर तो म्हणाला, ''तुझ्या घरी, नातेवाईकांना दिल्या तर प्रत्येक फोटोची फी मिळेल.'' मी अश्रू ढाळत होते, फक्त अश्रू. यावर तो म्हणाला, ''ललिता, तू लुटली गेली आहेस. जर तुला बदनामीपासून दूर रहायचं असेल तर तुला माझ्या म्हणण्याप्रमाणे वागावे लागेल. तुझा हट्टीपणा सोडला नाहीस तर या जगात स्थान राहणार नाही, हे लक्षात ठेव. जाऊ शकतेस आता, तुझा निर्णय उद्या हवा आहे मला. माझं ऐकलंस तर त्यातच तुझं भलं आहे.'' मी जड अंत:करणाने तेथून निघून आले, सगळीकडे अंधार माजला होता. अंदाजाने पावले टाकणे हेच बाकी होते. पण मन तयार होत नव्हते.

आणि प्रत्येक वासनी पुरूष, श्रीमंतीने गांजलेला, माणुसकीला विसरलेला, प्रत्येक वासनी आपली तृष्णा शांत करीत होते. त्याच्या जाळ्यात मी अडकले होते. त्यातून सुटण्याचा मार्ग नव्हता आणि त्याने माझा कठपुतळीप्रमाणे वापर केला. त्याच्या इशाऱ्यावर मी वागले. मी गुलाम होते, मला गुलाम बनवलं गेलं होतं.

मला माझीच लाज वाटू लागली होती. कारण मी कित्येक तरूण मुलीला, महिलांना त्याच्या जाळ्यात टाकलं होतं. कितीतरी जीवन उद्ध्वस्त केलं होतं. माझ्या कुकृत्याची चांगली किंमत मला मिळत होती. पण माणुसकी विकून, अब्रू विकून पोट भरणं, ऐश करणं हे मला काटे बोचल्याप्रमाणे वाटू लागले.

पण असह्य होऊन मी माझ्या वृद्ध आईसाठी जगत राहिले. मी स्त्री होण्याचा अधिकार गमावला होता. स्त्री जातीला काळीमा फासण्यासारखे वाईट कामे केली होती. प्रत्येक वासनी पुरूषापुढे मी ध्येयाचे, शरीराचे प्रदर्शन केले होते आणि कित्येक जीवन मी नरकात ढकलले होते. तरूण मुलींची मी बरबादी केली होती. आज यातल्या काही मुली या व्यवसायात मग्न आहेत, तरी काहींनी आत्महत्या केली, तर काही खितपत, सडत जीवन जगतात. अशा प्रकारे स्वत:च मी महापापी आहे, मी माझा जमीर विकले आहे. मला जगण्याचा अधिकार नाही.

आज माझ्याकडे बंगला, गाडी आहे, वृद्ध आहेत, थोडी मोठी भावंडं आहेत, पण मला हा ऐषआराम सुईप्रमाणे टोचत राहतो. ही श्रीमंती डागण्या देते. आईच्या आणि समाजाच्या नजरेतून गिरण्यापेक्षा मी मृत्यू स्वीकारीन, कारण उद्या मिळणारे बदनामीचे शिक्के मला कळणार तर नाहीत.

तिचे बोलणे सुमन कटाक्षाने ऐकत होती आणि लांब नजरेत ती स्वत:ला विसरून गेली. अश्रूंनी डोळे डबडबलेले होते. आणि ललिताने पर्समध्ये ठेवलेली विषाची बाटली काढून क्षणात ते विष आत्मसात केले. तोच सुमन उद्गारली, ''हे काय केलंस ललिता?'' अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी सुमनकडे पहात ललिता म्हणाली, ''मला जगणं नको होतं आणि किती दिवसात हे काळजात दफन करू?'' सुमन म्हणाली, ''प्लीज, काहीतरी बडबडू नकोस. डॉटवरी! मी दवाखाना गाठते. त्यावर थरथरत्या आवाजात ललिता म्हणाली, ''थँक्स, सुमन मला माफ कर, मी फार वाईट कृत्य केले आहेत.'' सुमन म्हणाली, ''तुला कशी माफ करू? तू चुकच केलेली नाहीस. असह्य यातना होत होत्या तरी हसत ललिता म्हणाली, ''आता मी..... शांत...पणे म......रे.....न!

सुमनने हॉस्पीटल गाठले. पण शेवटी व्हायचं तेच झालं. कारण ललिताने विष अति प्रमाणात घेतलं होतं. ती जगात नाहीशी झाली, तिने प्राणाची आहुती दिली.''

तिची चिता पेटवली आणि तिचा देह जळून खाक झाला. वर उडणारी प्रत्येक घुलंगी सांगत होती, ''मला अभिमान आहे ललिताच्या मृत्यूचा आणि धिक्कार आहे वासनी पुरूषाचा आणि भक्ष झालेल्या स्त्रीयांचा.''

सुमनने पाठ फिरवली. काळोख पसरला आणि ती उद्गारली, ''तू जीवन संपवलंस, पण तुला भक्ष बनवणारे त्यांना कोणी मारावे? ती रागाने बेभान होऊन म्हणाली, ''वासनेच्या आहारी गेलेल्या प्रत्येक पुरूषाला, स्त्रीच्या देहाचा बाजार करणाऱ्या, भक्ष बनवणाऱ्या प्रत्येक हरामखोराला, आणि त्याला बळी पडणाऱ्या प्रत्येक असह्य स्त्रीला हातात निखारा घेऊन पेटवून द्यावे आणि त्यांच्या वासनेला जाळून खाक करावे, म्हणजे पुन्हा तर हे घडणार नाही.

सुमन चितेपासून दूर गेली. पुन्हा पुन्हा वळत होती. चिता जळत होती. आणि काळोखात ती धगधगती आग अधिकच तेजोमय दिसत होती. सुमन निघून गेली...!

•••

## क्षण

क्षण ... हे आयुष्याचे<br>
क्षण ... हे दु:खाचे तर कधी हसायचे.<br>
क्षण ... हे बेधुंद, बेभान करणारे<br>
क्षण ... हे फसवे स्वाती नक्षत्राचे<br>
क्षण ... हे हूरहूर लावणारे, सम यायला लावणारे<br>
क्षण ... हे, आयुष्याला सुखदु:खाची किनार लावणारे

## सहा डिसेंबर एक घटना

बापूजी,
तुम्ही हिंदू मुस्लीम ऐक्यासाठी
प्राण गमावले
पण आज ही भारत भू,
रडत आहे
का? तर तिचीच लेकरे
आज तिचा खून करत आहेत
व्यर्थ ठरलं बापूजी,
व्यर्थ ठरलं, तुमचं बलिदान
उभा देश रक्तबंबाळ झाला
कुठे दुकान, कुठे घर
तर कुठे रेल्वे जळाली
पहा हे 'माणसांनो' विचार करा
की कुठे तुमच्या मनामध्ये
आग लागली
केव्हातरी हे व्हायलाच पाहिजे
'राम' आणि 'बाबर' एक
व्हायलाच पाहिजे
तुम्हीच सुज्ञपणाने विचार करा
आणि 'भारत माता की जय'
हा जयघोष जगात
पुन्हा एकदा
दुमदुमू द्या!

## गुलमोहर

इतक्या वर्षानंतरही मनाच्या कानाकोपऱ्यात
व्यापून असतात तुझी स्वप्न
पहाट ओल्या वेळा सर्व
अस्वस्थ होतात, तेव्हा राहून राहून वाटते॥ १॥

गुलमोहराच्या फांद्या
ऋतुभाराने वाकतात
कोकीळ देखील पचंम स्वरात गाते
तेव्हा राहून राहून वाटते॥ २॥

रस्ते आपल्याच चालीने चालतात
पाऊस मात्र तोच असतो
नको तिथे पाय थबकतात
चुकलेल्या पायवाटेकडे सारखे ओढतात
तेव्हा राहून राहून वाटते
तूच भेटावा पुन्हा
एकदा त्याच पाटवाटेवर...!

## कविता

कविताच आज माझी इथे न उरली
आयुष्य माझे रखरखीत वाळवंट बनले
कविता माझे स्वप्न होते, बांधलेले मनोरे होते
कविता करणं सोपं नसतं
वास्तवतेच्या, अनुभवाच्या तप्त
वाळवंटातून जावं लागतं
मगच तिथे शब्द सुचतात
शब्दांचे गुलाब फुलतात
फक्त एवढाच फरक
काही गुलाब गुलाबी
तर काही पांढरे असतात

**कु. माधवी देगलूरकर**
बी. ए. तृतीय वर्ष

## 'स्पंदन'

गर्क मनाचे स्पंदन
रूपी रस्ता हेच जीवन
रस्ताच हा.....
कुठे संपतो कुणास ठाऊक?
येणाराही थकला
जाणाराही थकतो
पण.....
कोणासही मिळेना
ह्या रूक्ष रस्त्यांचा अंत
येतात कोठून
जातात कुठे.....
सर्व काही दूरच दूर
चालून चालून थकतील
जाता कशाला पायी दूर?

**वनंजे सुरेश बाबूराव**
बी. ए. तृतीय वर्ष

# काकांनी सरण पेटवले

**वनंजे सुरेश बाबूराव**
बी. ए. तृतीय वर्ष

पावसाचे थेंब अजूनही टपकतच होते. तरी पण घरातील अस्वस्थेमुळं सुधाकर आणि मी बाहेरच्या हिरवळीवर खुर्चीवर बसलो होतो. दोघांसाठी छत्री एकच असल्यामुळे खुर्च्या एकास एक जोडूनच टाकल्या होत्या. वातावरणात मंदपणा जाणवत होता. आमचं मौन पाहून वातावरणही उदास झाल्यागत वाटत होतं. तेवढ्यात बोनी आमचा स्वयंपाकी चहा घेऊन आला. चहाचे झुरके घेत सुधाकर म्हणाला, ''चहा बोनीनेच बनवला असेल का?''

''का रे? तुला काही शंका वाटते.''

''नाही रे सहज विचारले, कारण चहा चांगली बनवतो बोनी, नाही का?'' सुधाकर म्हणाला.

''असेल!''

मंद वातावरणातील तो मौनपणा संपविण्यासाठी सुधाकर चहाची प्रशंसा करीत होता. पण मी 'होय' किंवा 'नाही' याशिवाय जास्त बोलण्याच्या मनस्थितीत नव्हतो.

सकाळी पहाटे कुठेतरी भूकंप झाल्याचे जाणवलं होतं. पण भूकंप कोठे झाला याची माहिती न घेताच माझ्या आळशी स्वभावामुळे झोपी गेलो होतो. आईबाबा कामानिमित्त बाहेरगावी गेल्यामुळे टी. व्ही. सुद्धा कोणी चालू केला नव्हता. कारण बोनीला तर टी. व्ही. चालूच करता येत नव्हता. त्यामुळे भूकंप कोठे झाला याची नेमकी माहिती मला सकाळी मिळाली नाही.

मी वर्तमानपत्राची वाट पाहत होतो. पण सुधाकर मात्र अर्थ नसणारे प्रश्न विचारून त्रास देत होता. मला त्याची चीड वाटू लागली. मी त्याच्यावर खेकसलोच, गप्प रहा. मला तुझ्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर द्यायचे नाही.'' मी त्याच्यावर रागावलो परंतु त्याचा त्याच्यावर काहीच परिणाम झाला नाही.

''सुजीत, तुला झालं तरी काय?'' पुन्हा सुधाकरचे बोलणे चालूच होते.

''मला काही झालेलं नाही, तू गप्प राहण्यास काय घशील?''

''बरं ठिक आहे, आपण आज कॉलेजला जायचं का नाही?''

मी आज किल्लारीला मावशीकडं जायचं सुधाकरला सांगितलं नव्हतं. कुणाला काही न सांगता आठच्या गाडीनं जावं आणि संध्याकाळपर्यंत परत यावं असा माझा बेत होता. मी आता निघणार तेवढ्यात आमचे रंजूकाका वृत्तपत्र घेऊन माझ्याकडे धावत आले.

''अरे सुजीत, हे वाचलस का, हे पहा किल्लारीला भूकंप झालाय म्हणे.''

अगोदरच माझी छाती धडधडत होती. मात्र काकाचे शब्द कानावर येताच काळजाला चिर पडल्यागत झालं. भेदरल्यासारखं त्यांच्याजवळील वर्तमानपत्र हिसकावून घेतलं आणि वाचू लागलो. ''भूकंपाचे केंद्रस्थान किल्लारी'' ही मुख्य ओळ वाचताच मी वर्तमानपत्र फेकून दिले आणि धावत घरात शिरलो. काही रूपये सोबत घेतले व एक टॉवेल बॅगमध्ये टाकून घेतला आणि किल्लारीला जाण्यास निघालो. सुधाकर पण येतो म्हणत होता पण घराकडे कोणीही नसल्याने मी त्याला घरीच सोडून निघालो.

जशी जशी बस धावत होती त्या वेगाने माझ्या मनात विचार बदलत होते. विचारांचा काहूर माजला होता. मनामध्ये भयानक चित्र उमटत होते. किल्लारीच्या

गल्ली-गल्लीचे, रस्त्या-रस्त्यांचे चित्र डोळ्यांसमोर खेळू लागले. विचारांना पूर्णविराम मिळतच नव्हता. मनावरचा पूर्णपणे ताबा सुटला होता. डोकं ठणकत होतं. ड्रायव्हरने ब्रेक लावताच समोरच्या माणसांवर आदळलोच. भानावर येत त्या माणसाची माफी मागितली आणि गाडीतून खाली उतरलो.

रस्त्याच्या कडेनं जाऊ लागलो. दोन्ही बाजूची घरे भुईसपाट झालेली. रस्त्यावर गावातील कुणीच दिसत नव्हता. कुत्री रडक्या आवाजात भुंकत होती. दगडाखाली सापडलेली चिचुंद्री चिकचिकत होती. उंच आकाशात घारी, गिधडे घिरक्या घेत होती. चिमण्या झाडात लपल्या होत्या. वातावरणात सनसनाटी जाणवत होती. पाऊले पुढे सरसावण्यास दचकत होती.

बाहेरगावची माणसे माझ्यामागून चालत होती. कुणातरी एकाची नजर रस्त्याच्या बाजूच्या सापावर पडली. त्याने ''अहो तेथे साप आहे पहा'' असे ओरडताच मी मागे वळलो. तेवढ्यात एक उभी भिंत कोसळली. त्या भिंतीचे एक लहानसे दगड त्या पळणाऱ्या सापाच्या शेपटीवर पडले. हे दृश्य पाहून माझ्या मनात एक विचार आला. 'हा साप संकटातून वाचण्यासाठी पळत होता आणि अद्यापपर्यंत उभी असलेली भिंत आम्हा माणसांसमोरच पडली. आणि ह्या भिंतीचा दगड त्या सापाच्या शेपटीवर पडतो' म्हणजे ह्या दृश्यात काहीतरी दैवी गुण आहे असा भास मला झाला. कदाचित ही माणसाची देवाने पाहिले सत्वपरीक्षा तर नसेल ना? असा प्रश्न मला पडला. मी लगेच तो दगड बाजूला करण्यास पुढे सरसावलो तेवढ्यात एका म्हाताऱ्या माणसाने मला अडवले. एका पुण्य कृत्यापासून त्या म्हाताऱ्याने मला वंचित केले याचा मला खेद वाटू लागला. तेवढ्यात दोन मुंगूसे तेथे आली. ती मुंगूसे सापाला खातील असे भय माझ्या मनात निर्माण झाले. पण त्या मुंगूसांनी सापावरील त्या दगडाला बाजूला सारले आणि सापाच्या बाजूला थांबले. मी ते दृश्य पाहून थक्क झालो. त्या सापाला खाणारी ती मुंगूसाची जात त्या सापाचे प्राण वाचवते. तर आपण एक माणूस असून ते पुण्याचं काम करू शकलो नाही.

बामणवाडा, कुंभारवाडा मागे टाकून पुढे जात होतो. जिकडे तिकडे रडण्याचा आवाज येत होता. त्या गावचा जमीनदार माणिकराव पाटील याचा वाडा जमिनदोस्त झाल्याचे पाहून खुषी वाटली. कारण याचा पूर्ण गावावर अंकूश चालत आलेला होता. त्याने गावातील लोकांना फारच त्रास दिलेला होता. आता मात्र तो आपल्या मुलाच्या प्रेताजवळ बसून रडत होता.

हे सारं दृश्य पाहून थरकाप सुटला होता. केव्हा एकदा मावशीच्या घरी पोहचतो? असे वाटत होते. चालण्याचा वेग वाढवला. तेवढ्यात बळीराम काका रडत समोरून आले.

''सुजीत, सारं काही संपलं रे पोरा'' बळीराम काका रडू लागले. त्यांचे शब्द ऐकताच धक्काच बसला.

''काका घरी तर चला ना'' मी म्हणालो.

''पोरा काय उरलंय त्या घरी? तुझी मावशी व मुन्नी देवाघरी पोहचलेत रे.'' काका हुंदके देत रडू लागले.

''मग तुम्ही कुठे जात आहात इकडे?''

''थोडसं पाणी पिऊन येतो. तू घरी चल.'' मला दु:ख अनावर झालं. मी रडत पळत सुटलो. माझ्या अगोदरच आई व बाबा तेथे पोहचले होते. त्यांनी क्रियाक्रमाची तयारी चालविली होती. अंतिम संस्कार तरी कसले करणार? घराचीच वासे उपसून अंगणातच सरण रचवत होते. एकाच सरणावर मावशीला व मुन्नीला जाळणार होते. मुन्नीला पाहून माझे रडणे थांबतच नव्हते. मी वेड्यासारखे तिचे प्रेत हातात घेऊन धावू लागलो. तेवढ्यात बाबांनी माझ्या हातून मुन्नीला काढून घेतले आणि मला शांत करण्याचा प्रयत्न करू लागले.

बळीरामकाका परत येताच मावशीला व मुन्नीला सरणावर टाकण्यात आले. काकांनी सरण पेटवले. जाळाचा भडका वाढत होता. तेवढ्यात कुठून तरी

लहान मुलाचा आवाज माझ्या कानावर आला. मी बाजूला डोकावले. तर एका बाजूच्या भिंतीआड शेजाऱ्याचे सात ते आठ वर्षाचे मूल आपल्या आईच्या प्रेतावर पडून रडत होतं. मला पाहताच तो माझ्याकडे आला. ''आई गेली, माझी आई गेली.'' तो रडतच होता. ''दादा, आता मला आई कुठे मिळणार हो?'' त्या मुलाने नाजूक मर्मभेदक आवाजात प्रश्न विचारला. मी त्या मुलाला खांद्यावर घेऊन काकांच्या घरी आलो. हवेच्या वेगाने सरणाची आग भडकत होती. सर्व काही जळून खाक होत होते. उंच आकाशात धुराचे थैमान माजले होते. कारण प्रत्येकाच्या घरासमोर, रस्त्या-रस्त्यावर असेच प्रेत भाजत होते. सर्व सरणाच्या धुरांड्या आसमंतात एकत्र येत होत्या.

•••

# स्वदेशी वापरा

**वनंजे सुरेश बाबूराव**
बी. ए. तृतीय वर्ष

'इतिहासाची पुनरावृत्ती होत असते' हे वाक्य कितपत योग्य आहे याची प्रचिती येण्यास सध्याचा काळ अनुकूल असाच आहे.

'स्वदेशी चळवळ' ही चळवळ प्रथमत: स्वामी दयानंदांनी सुरूवात केली. याला जवळपास शंभर ते सव्वाशे वर्षे होत आहेत. प्रारंभीच्या काळात ही चळवळ म्हणजे स्वदेशी वस्तू वापरणे हे फक्त धार्मिक स्तरावर एका विशिष्ट धर्मियांपुरतेच मर्यादित होते.

पुढील काळात म्हणजे लोकमान्य टिळकांच्या काळात या चळवळीचे स्वरूप बदलले. लोकमान्य टिळकांनी या चळवळीचे नविन असे स्वरूप तयार करून 'स्वदेशी व बहिष्कार चळवळ' असे त्याचे नविनीकरण केले. म्हणजे परदेशी मालावर बहिष्कार टाकावे व स्वदेशी मालच खरेदी करावे. लोकमान्य टिळकांनी या चळवळीला राष्ट्रीय पातळीवर नेण्याचं काम केलं. स्वदेशी माल खरेदी करावा व परदेशी मालावर बहिष्कार टाकून इंग्रजांना देशाबाहेर हाकलून द्यावे असा त्यांचा उद्देश होता. आणि त्याचा परिणाम पुढील काळात इंग्रजांना देशाबाहेर हाकलून देण्यात झाला किंवा इंग्रजांना हा देश सोडून जाणे भाग पडले हे आपणास माहीत आहे.

मग आता पुन्हा स्वदेशी चळवळ कशासाठी? हा प्रश्न निर्माण होणं साहजिकच आहे. सध्या आपला भारत देश फार बिकट अशा परिस्थितीचा सामना करीत आहे. त्याला भयंकर अशा महारोगाने ग्रासले आहे. ज्याप्रमाणे माणसे एड्स, क्षयरोग, कर्करोगसारख्या महारोगाने ग्रासले जातात. तशाच एका महारोगाने भारत ग्रासलेला आहे. हा कोणी भारत नावाचा रोगी नसून आपल्या भारत देशाला रोगाने ग्रासले आहे. 'कर्जबाजारीपणा' हे त्या महारोगाचे नाव. आज भारत इतका कर्जबाजारी बनलेला आहे की, त्याला या कर्जाचे व्याजही फेडणे शक्य नाही. मुद्दल तर बाजूलाच राहिलं. आज भारतावर तीन लक्ष कोटी (३०००००००००००) इतकं परकीय कर्ज आहे. म्हणजे दरडोई ३६०० रू. आपण परकियांचे देणं लागतो.

अशा परिस्थितीतसुद्धा आपला देश सुधारण्यासाठी, आपल्या देशाचा विकास घडवून आणण्यासाठी म्हणून विकास कामे चालू ठेवणे जरूरीचे आहे. देशाच्या प्रगतीस्तव विकास कामे चालू ठेवायची असतील तर भारताला कर्ज घेणे हे अपरिहार्यच आहे. जर आपण कर्ज घेतले नाही तर आपल्या देशाचा विकास खुंटेल, जगाच्या स्पर्धेमध्ये आपणास फार दूर फेकले जावे लागणार आणि आपला मागासलेपणा जगाच्या निदर्शनास येईल व त्यावेळी आपणास कुणीही कर्ज देणार नाही. जर कर्ज घ्यायचेच नसेल तर आणि विकासही घडवायचा असेल तर आपले उत्पन्न वाढवले

पाहिजे. आपली निर्यात वाढविली पाहिजे आणि उत्पन्न व निर्यात वाढेपर्यंत विकास कामे स्थगित करणे तेही हानीकारक होईल. आपले उत्पन्न वाढेपर्यंत हे जग फारच पुढे गेलेले असेल. तेव्हा जगाच्या स्पर्धेमध्ये टिकायचे असेल तर कर्ज घेऊन विकास कामे चालू ठेवणे अपरिहार्यच आहे.

भारताने डंकेल प्रस्तावावर सही करून मुक्त बाजारपेठांना जवळजवळ मुक्तताच दिलेली आहे. ह्या गॅट (General Agreement on Trade and Tarrifs) या कराराने बहुराष्ट्रीय कंपन्यांची भारतात येण्यास रिघच लागलेली आहे. आजमितीस तीन हजार बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात आल्या आहेत. हा करार भारताला फायद्याचा का तोट्याचा हे काळच ठरविल. पण एक गोष्ट खरी की, ज्या सावकाराचे आपण देणं आहे म्हणजे आपल्यावर ज्या सावकाराचं कर्ज आहे त्या सावकाराची कोणतीही अट मान्य करावीच लागणार. जर आपण ती अट नाकारण्याचा प्रयत्न केला तर तो 'आताच्या आता माझी रक्कम परत कर' म्हणणार आणि देणंकराला (जो कर्ज घेतला) ती रक्कम त्वरीत परत करणे शक्य नसते. तेव्हा आता त्याला त्या सावकाराची कोणतीही अट मान्य करण्याशिवाय दुसरा पर्यायच नसतो आणि तो सावकार पण कसलीही संधी न देता आपल्या देणंकराला बरोबर कोंडीत पकडतो. ह्याच प्रकारे भारताची स्थिती झाली आहे. गॅट (GATT) ही तशीच त्या परकीय सावकाराची अट आहे. आणि भारताला ते मान्य करावच लागलेलं आहे आणि लगेच परकीय कंपन्यांनी येथे आपला संसार मांडलेलाच आहे.

इ. स. १६०० मध्ये इंग्रजांनी 'ईस्ट इंडिया कंपनी' ची सुरूवात केली. त्यावेळी भारताची परिस्थिती दयनीय होती. त्यावेळी भारतीय निद्रीस्त होते म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. कारण या जगात कोणकोणत्या आणि कशा प्रकारच्या घडामोडी घडत आहेत याकडे भारतीयांचे तिळमात्र लक्ष नव्हते. फक्त आपापसात लढाया करून भूप्रदेश जिंकणे हा एवढाच मोठेपणा येथील राजे मिरवत असत. त्यामुळेच भारतीय मागास राहिले. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली आणि त्यांनी कारखान्यांद्वारे, यंत्राद्वारे नवनवीन मालाची निर्मिती करून जगाला भ्रमिष्ट करून टाकलेलं होतं. ''आम्ही आमच्या यंत्राने बनविलेल्या नविन वस्तू त्या तुमच्या देशात विकू व तुमच्या देशाला नवनवीन वस्तूंची माहिती करून देवू.'' असं त्यावेळी ईस्ट इंडिया कंपनीने शहाजहान, त्यावेळचा बादशहा, याच्याकडे व्यापारासाठी परवानगी घेतली व शेवटी हळूहळू त्यांनी तराजूच्या माध्यमातून शस्त्र हाती घेतले व आपल्या भारत देशाला आपल्या अंकीत करून घेतले. तेव्हा त्यांनी जवळजवळ दिडशे वर्षांची आपल्या देशाची 'महालूट' (Long Steal) केली आहे.

आता वेळ बदलला काळ बदलला पण भारताची लूट चालूच आहे. फक्त स्वरूप तेवढे बदलले. इथंही इतिहासाची प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष अशी पुनरावृत्तीच दिसून येईल. त्यावेळी नविन वस्तूंचे कुतूहल होते. म्हणून परकियांना भारतात व्यापारास परवानगी दिली. आता मात्र ती परकीय सावकाराची अट, जी मान्य करावीच लागते म्हणून व्यापारास परवानगी दिली. एवढाच मात्र फरक दिसतो. आपण भारतीय मात्र याकडे उघड्या डोळ्याने गुपचूप पाहत आहोत. आपल्या देशाची मोठ्या प्रमाणात लूट होणार आहे हे आपणाला माहीतच आहे; पण आपणाला व आपल्या सरकारला काहीच करता येत नाही. सरकार हतबल झालेलं आहे हे आपल्याला माहीत असूनही आपण सरकारवर मोर्चे काढतो, आंदोलने करतो आणि शेवटी आपल्या देशाचे नुकसान करतो. पण आपण हे काय चालवलंय? आपण आपल्याच पराजित लोकांच्यावर संतापतो आहोत. आपण आपल्याच हतबल स्वकीयांच्यावर रागावतो आहोत? सरकारच काय आपणसुद्धा आपल्या डोळ्यांसमोर उघड्या बाजारात चोरी करणाऱ्या चोराला (बहुराष्ट्रीय कंपन्यांना) पकडून शिक्षा करू शकत नाही. इथं आपली मर्दांगी संपुष्टात येत आहे. जर चोराला आपली वस्तूच चोरून द्यावयाची नसेल तर ती वस्तू व्यवस्थित ठिकाणी ठेवली पाहिजे. म्हणून त्याचप्रमाणे आपल्याला

आपल्या देशाची लूट थांबवायची असेल तर, आपला पैसा परदेशात जाऊ द्यावयाचा नसेल तर आणि तद्वतच आपले सोने परदेशात जावू द्यावयाचे नसेल तर आपण सर्व भारतीयांनी एका अहिंसक शस्त्राचा वापर करणे जरूरीचे आहे. ते अहिंसक शस्त्र म्हणजे 'स्वदेशी चळवळ'. आपण भारतीयांनी फक्त स्वदेशी वस्तूंचाच वापर करावा. आपण आपल्या दैनंदिन जीवनात जितकं शक्य आहे तेवढं स्वदेशी वस्तू वापरण्याचा प्रयत्न करावा.

बहुराष्ट्रापुढं आपलं सरकार हतबल झालेलं आहे आणि परकियांविरूद्ध सरकार काही करू शकत नाही याची आता आपल्याला जाणीव झाली आहे. आणि आता सरकारच्या मदतीसाठी आपण आपले हात पुढे करण्याची वेळ आली आहे. ज्या ज्या वेळी आपल्या भारत देशावर संकट कोसळलं तेव्हा तेव्हा आपण जनतेने मदतीला धावून गेलोत. त्याच प्रकारे देशाला आता जनतेची गरज आहे. ही एक लढाईच आहे. या लढाईत सरकार कसंतरी निभावून जाईल; पण या देशातील गरीब जनता भुकेने मेल्याशिवाय राहणार नाही. म्हणून आपल्या देशातील गरीब जनता, कामगार, शेतकरी, शेतमजूर, कारागीर, भारतीय कारखानदार व भारतीय कंपन्यांना वाचवायचे/जगवायचे असेल तर स्वदेशी वस्तूंचा वापर करणे व देशाचे उत्पन्न वाढविणे ही काळाची गरज आहे.

•••

## नव वर्ष

नव वर्षाचे स्वागत करू या।
हार सुमनाचे हाती घेऊनी॥
ह्या जीवनाचे मार्ग सुधारू।
शुद्ध मनाचे जल शिंपूनी॥
घेऊन तबक समतेच्या हाती।
बंधुत्वाचे निरांजन हे॥
प्रेमाचे घृत त्यात घालूनी।
ज्ञानाचे दीप उजळू या॥
गुढी उभारूनी आनंदाची।
सदाभावाची फुले उधळू या॥

**परसुरे एस. एस.**
एम. ए. द्वितीय वर्ष

## अपुरे मीलन

नाचत माया निळ्या महाली
फडफडला डफ चंद्राचा
अपुरे मीलन तुझे नि माझे
जीव तयाने तडफडला
शत जन्मांच्या पडद्यामागून
चुकवून मजला तू लपशी
जे न मिळे त्यास्तव जगणे
जडला नाद मधुर-कटु मजशी
स्वप्नांचे गीत मी गातो
रंग नसे तव साथीविण
आलापीची अखंड वळवळ
परंतु सम न गवसे तुझविण

**परसुरे एस. एस.**
एम. ए. द्वितीय वर्ष

## करावे प्रेम असे

माळ मोकळे हिरव्या-हिरव्या
त्यावर गायी ढवळ्या-ढवळ्या
प्रेम करावे अ॒ण ठिकाणी
विसरून घाई विसरून भीती
रक्तामधले प्रेम करावे
पशूसम, शुद्ध करावे प्रेम
शतजन्माच्या अवसानाने
रंगतामधील गाठावी सम
प्रेम करावे मुके अनामिक
प्रेम करावे होऊनिया तृण
प्रेम करावे असे परंतु.....
प्रेम करावे हे कळल्याविण

**परसुरे एस. एस.**
एम. ए. द्वितीय वर्ष

# अशांत नागालँड

**योगेश सुधाकरराव वझलवार**
बी. ए. तृतीय वर्ष

बांगलादेशातील घूसखोर आणि खिश्चन मिशनरी यांच्या संयुक्त कारवायांमुळेच आज नागालँड भारताच्या राष्ट्रीय प्रवाहापासून पूर्णतः अलग विलग झाले आहे. थोडा-फार तपशीलाचा फरक वगळता पूर्वांचलातील अन्य राज्यांचीही हीच स्थिती आहे. नागालँडची भूमी केवळ १६,००० चौरस कि.मी. ची म्हणजे आपल्या पुणे जिल्ह्याएवढी. अप्रतिम निसर्ग सौंदर्याने नटलेल्या या तागा भूमीत एकूण १७ प्रमुख जनजाती आहेत. राज्याची अधिकृत भाषा इंग्रजी, तर बोलीभाषा किंवा राज्यभाषा ही नागामिझ. याशिवाय बंगाली, हिन्दी, आसामी याही भाषा बोलल्या जातात. ९१ च्या जनगणनेनुसार तेथील लोकसंख्या अवघी १२ लाखांची आहे.

नागा माणूस हा स्वभावाने अत्यंत मनमोकळा आणि हसतमुख आहे. परंतु परक्या माणसाविषयी अतिशय संशयी ! बाहेरच्या माणसावर तो लगेच विश्वास ठेवत नाही. त्यासाठी त्या माणसाला खूप सायास करावे लागतात. अर्थात याचे कारणही तसेच वाजवी आहे. नागा जमात ही तशी कलासक्त आणि निसर्गोपासक. खावे, प्यावे आणि आनंदी रहावे. यांचा आयुष्यक्रम निसर्गाने आपली संपत्ती इथे हजार हातांनी उधळलेली आहे. त्यामुळे सर्वजण खाऊन-पिऊन सुखी. दोन वेळचं अन्न मिळवायला इथे फारसा त्रास होत नाही. शिक्षणाचा फारसा प्रसार नाही आणि त्याची गरजही वाटत नाही. परिणामी अशिक्षितांचे प्रमाण मोठे. याचाच फायदा बाहेरून इथे आलेल्यांनी उठविला आणि जमेल तेवढे नागांना लुटले. यामुळेच अनुभवाने शहाणे झालेले नागा बाहेरच्यांवर पटकन विश्वास ठेवत नाहीत. दुर्दैवाने भारतीयांबद्दलही त्यांची अशीच भावना आहे आणि ही दरी वाढतच आहे.

नागालँडमध्ये हिंदू-खिश्चनांचे प्रमाण हे १५:८५ एवढे आहे. येथील हिंदू माणूस हा मूलत: निसर्गपूजक आहे. नद्या, डोंगर, सूर्य, चंद्र, झाडं आदींची हा हिंदू मनोभावे पूजा करतो. राज्यातील १७ जनजातीमध्ये तीन जाती १०० टक्के खिश्चन झाल्या आहेत. इतर जातींमध्येही थोड्या-फार फरकाने हेच प्रमाण आहे. यापैकी 'झिलियन' या जातीचा 'हराक्का' नावाचा हिंदू संप्रदाय आहे. हा कडवा धर्मनिष्ठ संप्रदाय आहे. नागालँडची राणी गाईडिनल्यू हिने या संप्रदायाची स्थापना केली आहे. 'अंगामी' या जातीमध्येही 'फ्यूत्सोकेसको-केहो' या नावाची एक संघटना आहे. तर 'कोनिअँक' जमातीतले लोक अजूनही शेंडी ठेवतात. तेथील हिंदूचे मोठे दुर्दैव म्हणजे भारतभर संतमहंतांचा जो एक मोठा प्रभाव निर्माण झाला तो इथे होऊ शकला नाही. कारण इथे कोणी मोठा संतच झाला नाही.

हिंदूच्या या दौर्बल्याचा खिश्चन मिशनऱ्यांनी अचूक फायदा उठविला. सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी १८७० ते १८८० या दशकात मिशनऱ्यांनी इथे प्रवेश केला. विविध सेवाकर्त्यांच्या माध्यमातून आणि त्याला धन, आमिष आणि धाकदपटशा यांची जोड देऊन इथे मोठ्या प्रमाणावर धर्मांतर झाले. याचा भयानक परिणाम तिथल्या जनजीवनावर झाला आहे. गेल्या १०० वर्षांत तेथे नागांची संस्कृती पूर्णपणे नष्ट झाली. नागांची अस्मिता ओळख या केवळ बोलण्याच्या गोष्टी राहिल्या आहेत. पण हे होत असतांना एका जीवघेण्या आपत्तीला तो तोंड देतो आहे. एकीकडे धर्मांतरामुळे आपल्या मूळ हिंदू परंपरेपासून तो तुटला गेला, त्याच वेळी खिश्चनरींच्या भ्रष्ट विळख्यात तो सापडला. 'संस्कृतीचा ऱ्हास म्हणजे अस्मितेचा नाश' हे नागालँड अनुभवतो आहे. आज इथे खिश्चनरी म्हणजे केवळ जीन्स, दारू, बायका, एड्स याच गोष्टी शिल्लक आहेत.

इथल्या आरामदायी वातावरणात आणि धार्मिक बंधनातून तुटलेल्या अवस्थेत हा समाज घसरणीला न लागला तरच नवल! तेथील विचारी समंजस लोकांना आता हे पटू लागले आहे की, मिशनऱ्यांनी आपल्याला केवळ एक भ्रष्ट सुखासीन आणि व्याभिचारी संस्कृती दिली आहे. या भ्रष्ट संस्कृतीच्या सैतानी विळख्यात आपली मूलं सापडू नयेत यासाठी काहीतरी करायला हवे ही जाणीव त्यांच्यात हळूहळू होत आहे.

नागालँडमधील मुख्य दहशतवादी संघटना आहे 'नॅशनल सोशॅलिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड'. या संघटनेला चर्चचा छुपा पाठिंबा आहे. राज्यातील कोणत्याही बाबीसंबंधी निर्णय प्रथम चर्च घेते तर त्याची अंमलबजावणी एन. एस. सी. एन. करते. या निर्णयाच्या विरोधात जाणाऱ्यांना निर्दयपणे दूर केले जाते. संघटना चालविण्यासाठी लागणारा पैसा खंडणीतून गोळा केला जातो. संघटनेचा एक माणूस राज्यातील व्यापारी, उद्योगपती, सरकारी अधिकारी व इतर श्रीमंत व्यक्तींकडून ठरलेल्या रकमेचा आकडा सांगतो. ही रक्कम त्याने ठरल्या दिवशी द्यायची, अन्यथा त्याला वाचविणारा नागालँडमध्ये तरी कोणी नाही. सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार १/४ इतका कापला जातो. याविरूद्ध कोणाला तक्रार करायची असेल तरी पोलीस मुळात तक्रारच लिहून घेत नाहीत. पुढल्या कारवाईचा प्रश्नच येत नाही.

नागालँडमध्ये भारतविरोधी भावना कायम तीव्र ठेवण्यासाठी १५ ऑगस्ट, २६ जानेवारी हे राष्ट्रीय सण 'काळे दिवस' म्हणून पाळले जातात. याविरूद्ध आवाज उठविणाऱ्याचा सरळ खून पाडला जातो. अत्याधुनिक शस्त्रांनी सुसज्ज असलेले बंडखोर लष्करावरही हल्ला करण्यास कचरत नाहीत. एन. एस. सी. एन. विरूद्ध हिंदूत्ववादी शक्तीचा संघर्षही अटळच आहे.

ईशान्य भारत उर्वरीत भारतापासून तोडण्याच्या प्रक्रियेत ख्रिश्चन मिशनरी-चर्च दहशतवादी संघटना या गटाप्रमाणेच मुस्लिमसुद्धा तितकेच सक्रीय आहेत. पाकिस्तानची आय. एस. आय., अरब राष्ट्रातील पैसा आणि बांगलादेशातून घूसखोरांचा अप्रतिहत लोंढा अशी भारताच्या दृष्टीने भयावह युती या भागात झाली आहे. कामाच्या शोधात असलेले बांगला घूसखोर आधाशासारखे टोळधाडीने या भागात घुसत आहेत. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे यावर कोणतीही ठोस उपाययोजना अजून सरकारने केलेली नाही. साहजिकच भारताकडे या बांगलादेशीय घूसखोरांचा प्रचंड लोंढा कायमच वाहत आहे. जणू बांगलादेशात जन्मायचे आणि भारतात वस्ती करायची हाच तेथील नियम आहे. पूर्वाचलकाचे लचके तोडण्यासाठी येणाऱ्या या टोळधाडीला रोखण्याची नितांत गरज आहे.

•••

## तुझ्या डोईवरच्या घटाने

तुझ्या डोईवरच्या घटाने
असे का केले बहाणे
सखे असे का न्हाले
तुझ्या ओठावरचे उखाणे
जिच्यात उभे राहुनी
आरशात पहाणे कुणाचे
गाण्यास शब्द अपुरे
शब्द घेऊ आता कुणाचे...?

## जखमा

कुठे गेले, तुझे इशारे
कुठे गेले, तुझे नयन तारे
वाटा मिटत चालल्या भेटीच्या
जखमा उकलत चालल्या
ओठावल्या डाळींबाच्या
भेट तुझी मी मागावी
तितके आता सोपे नाही
झाडाला फळे लागावी
झाडाला कवटाळणे
आता सोपे नाही!

जगत होते. उच्च ज्ञान व धर्म ज्ञान संस्कृतात असल्याने मराठी भाषिकांना त्याचा फारसा उपयोग नव्हता. या विकाल परिस्थितीत ज्ञानेश्वरांनी एक नवे चैतन्य निर्माण केले. म्हणून त्यांनी मराठी संस्कृतीचा पाया घातला असे म्हटले जाते.

[इ] ज्ञानेश्वरांची रचना नेवासे येथे ज्ञानदेवांनी इ. स. १२९० मध्ये केली. ज्ञानेश्वरी ही भगवद्गीतेवरील टीका होय. या ओवीबद्ध भाषेत ज्ञानेश्वरांनी ज्ञानयोग, कर्मयोग व भक्तीयोग यांचा प्रेरक असा आविष्कार केला. समाजाला या भाष्यरूपाने एक नवे सर्वंकष तत्त्वज्ञान सादर केले आणि हे तत्त्वज्ञान महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या जडणघडणीत फार महत्त्वाचे ठरले. भगवद्गीतेवरील ही सर्वश्रेष्ठ अशी टीका मानली जाते. अमृतानुभव आणि स्फुट अभंग यातून ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान आणि साक्षात्कारी अनुभव प्रकट झाले आहेत.

ज्ञानेश्वरी हे अक्षरकाव्य आहे. तत्त्वज्ञान आणि काव्य यांचा इतका थोर असा आविष्कार क्वचितच आढळतो. हा ग्रंथ संस्कार ग्रंथ आहे. त्यातून शतकानुशतके मराठी मनांचे पोषण झाले आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरीवर मराठीतून आणि महाराष्ट्रात सतत चर्चा होत असते. मराठी साहित्य आपल्या उगमस्थानीच हा थोर ग्रंथ माथ्यावर मिरवत आहेत. मराठी साहित्य आणि संस्कृती समजावून घ्यायची असेल तर ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी वाचलीच पाहिजे.

●●●

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांनी बांधलेल्या मंदिरांवर एक दृष्टीक्षेप

**परसुरे एस. एस.**
एम. ए. द्वितीय वर्ष

मराठा कालखंडात जिजाबाई, येसूबाई, ताराबाई, आनंदीबाई, होळकरांसारख्या कर्तबगार स्त्रियांची मालिका दिसून येते. या सर्वांनीच आपल्या काळात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आणि इतिहासात स्थान पक्के केले. या सर्वापेक्षा राजमाता म्हणजेच जिजाबाई आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी या दोन स्त्रीया महाराष्ट्राला आदरणीय वाटतात.

पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी धर्म आणि राजकारण या दोन्ही क्षेत्रात आपले उत्तुंग कर्तृत्व सिद्ध केले. त्यांच्या या कामगिरीला मराठ्यांच्या इतिहासात तोड नाही.

**अनेक ठिकाणी मंदिरे व घाट बांधले :-**

स्वत:चे व्यक्तिगत जीवन अत्यंत दु:खी, कष्टी, दुर्दैवी असून जीवनातील या आघातांनी पूर्वीच्या धार्मिक अहिल्याबाईंचा कल अधिकाधिक धार्मिकतेकडे वळला. ''भारतात अनेक ठिकाणी मंदिरे, घाट, विहिरी बांधल्या.'' अहिल्याबाई या अतिशय धार्मिक होत्या. त्यांची धर्मावर अतिशय अतूट श्रद्धा होती. म्हणूनच संपूर्ण आयुष्यभर धर्माचरणानुसार त्यांच्या हातून संपूर्ण भारतात प्रत्येक तीर्थक्षेत्री काहीना काही तरी लोककल्याणकारी कामे धार्मिक भावनेतून झालेली दिसून येतात. ही सर्व कामे त्यांनी आपल्या खाजगीच्या उत्पन्नातून केली. ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. सुभेदार मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर १६ कोटी रूपये खाजगीची शिल्लक पूर्णपणे अहिल्याबाईंच्या मालकीची होती. या खाजगी जहागिरीवर अहिल्याबाईंनी हातात पाणी देऊन, त्यात तुळशीची पाने टाकून व ब्राह्मणांकडून मंत्र म्हणून हे द्रव्य दानधर्मासाठी खर्च केले जाईल असा संकल्प सोडून त्या द्रव्यावर तुळशीपत्र ठेवले. विहिरी, तलाव, देवालये, अर्पण करणे, अन्नदान करणे, सार्वजनिक उद्याने ह्यांच्यासारख्या कृत्यांना पूर्ण असे म्हणतात.

**मंदिरांचा जीर्णोद्धार :-**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांनी १२

ज्योतिर्लिंगांपैकी काही ज्योतिर्लिंग बांधले. १) सोरटी सोमनाथ, २) ओंकारेश्वर व ममलेश्वर, ३) परळी वैजनाथ, ४) काशी विश्वनाथ, ५) घृष्णेश्वर - वेरूळ. या पाच ज्योतिर्लिंगांचा जीर्णोद्धार केला. तसेच श्रीशैल - मल्लिकार्जुन येथे शिवमंदिर, अधारेश्वर, ओंकारेश्वर, त्रिभुवनेश्वर - त्र्यंबकेश्वर, रेवाडेश्वर - महाबळेश्वर, नागेश्वर - अयोध्या, अहिल्येश्वर, जेजुरी, भैरवनाथ, काशी विश्वेश्वर नाशिक, मुर्डेश्वर - चांदवड, इंदोर असे अनेक पंचवीस शिवमंदिरे अहिल्याबाई होळकरांनी संपूर्णपणे नव्याने उभारली. अहिल्याबाई या शिवभक्त असल्याने त्यांनी अधिकाधिक मंदिरे उभारली आहेत. तसेच वेगवेगळ्या अनेक देवतांची मंदिरे बांधली. अशा रीतीने अहिल्याबाई होळकरांनी संपूर्ण भारतात एकूण ८५ मंदिरांची निर्मिती केल्याचे उल्लेख कागदोपत्री आढळतात.

त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीत अतिशय भव्य व दिव्य अशा देवालयांची निर्मिती झालेली दिसून येते. धर्माचे संवर्धन व प्रजेचे कल्याण व्हावे या उदात्त हेतूने पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी भारतात अनेक ठिकाणी घाट, विहिरी बांधल्या आहेत. अहिल्यादेवींच्या या धार्मिक कार्यामुळे प्रजेच्या मनात धर्मजागृती होऊन राष्ट्रप्रेम निर्माण झाले.

**लोककल्याणकारी कार्य :-**

अहिल्याबाईंच्या धार्मिक कार्यामुळे प्रजेच्या मनात धर्मजागृती निर्माण होऊन राष्ट्रप्रेम निर्माण झाले. आज भारत शासनाच्या बांधकाम विभागामार्फत जे काम केले जाते त्या कामाचा पाया अहिल्याबाईंनी २०० वर्षांपूर्वी घालून दिला. त्या कामासाठी त्यांनी खाजगी घरगुती पैसा वापरला ही गोष्ट आजच्या राज्यकर्त्यांपुढे अहिल्याबाईंच्या उदाहरणाने एक अनुकरणीय आदर्श निर्माण करून ठेवणारी आहे. आपल्या प्रजेसाठी लोककल्याणकारी कामे करतांना आपला उदोउदो व्हावा असा उद्देश नसून धर्माचे संवर्धन व्हावे व प्रजेचे कल्याण व्हावे. हा शुद्ध प्रामाणिक हेतू त्यांच्या या धार्मिक कार्यामागे होता. अहिल्याबाईंचे राज्य भारतात २०० वर्षानंतर देखील त्यांच्या धर्मकार्याच्या रूपाने प्रत्येक तीर्थक्षेत्री अमर आहे. म्हणून म्हणावेसे वाटते की, पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे धार्मिक व लोककल्याणकारी कार्य म्हणजे भारताच्या इतिहासातील एक सोनेरी पान आहे.

●●●

## कठीण होत आहे

दररोज स्वत:ला धीर देत जगणे
कठीण होत आहे.
किती आवरावे आपणच आपणाला
कठीण होत आहे.
भोकाड पसरणाऱ्या मनास थोपटीत
झोपवून घेतो.
भुसा भरलेले औत दिसूनही थांबणे
कठीण आहे.
वडजोडीत जगावे, जगतो. दररोज कठीण
होत आहे.
आपले अस्तित्व असूनही नाकारणे
कठीण होत आहे.
समजून समजावतो, समजावूनही नच
मानलो.
कोठारात काडी न पडेल हमी देणे
कठीण होत आहे.

## प्रेमाचा झरा

प्रिये तुझा प्रेमाचा झरा हा तुझ्या
हाताने आटला
आला माझ्या प्रेमाच्या झऱ्यास
नाही आता तुझ्या प्रेमाचा ओलावा

एका पाण्याच्या थेंबास
जसे तळमळीने रान-रान फिरते पाखरू
तसे तुझ्या प्रेमाच्या ओलाव्यास माझे मन
भटकते तळमळीने रान-रान

## तुझी भेट

प्रिये तुझी भेट झाली नसतीस तर
तुझ्यावर प्रेम झालं नसतं
तुझ्या भेटीस मन व्याकूळ झालं नसतं
डोळ्यात प्राण घालून प्रतिक्षा केली नसतो तर
प्रेमाचं अस्तित्व कळालं नसतं

तुझ्या प्रेमावर विश्वास केला नसतो तर
असा विश्वासघात झाला नसता
प्रेम पुष्प हृदयावर असा
व्याघात झाला नसता
प्रिये तुझी भेट झाली नसती तर
तुझ्यावर प्रेम झालं नसतं

## अंधारातील दीपस्तंभ

उत्तम पुस्तकांचा संग्रह घराबरोबरच
जीवनालाही सुशोभित करतो.

स्वतःला जिंकायचे असेल तर डोक्याचा वापर करा
इतरांना जिंकायचे असेल तर हृदयाचा वापर करा.

संयमित बोलणारा भांडण आणत नाही व
प्रमाणात जेवणारा रोग आणत नाही.

देव सज्जनांचा मित्र, शहाण्यांचा मार्गदर्शक
मुर्खांचा जुलूमशहा आणि वाईटांचा शत्रू असतो.

ज्याला चांगले शील आहे, त्याला या जगात
असाध्य काहीच नाही.

## मार्गदर्शक तारे

माणसाचा विश्वास हा दैवावर
नसून कर्मावर असला पाहिजे.
प्रामाणिक व योग्य दिशेने प्रयत्न केल्यास
त्याचे अपेक्षित फळ मिळतेच!
दुःखाचे मूळ कारण अभिलाषा असते.
आत्मविश्वासाने कार्य पार पाडल्यास उद्दिष्टे
साध्य होत असतात.
वस्तूंचा संग्रह वाढला की उद्धटपणा वाढतो.

## आठवण

तुझे आठवण येता
डोळे भरूनी आले.
पुन्हा ते दुःख नशिबी आले.
पुन्हा ते आठवणी येता
हृदयी प्रेम पुष्प उमलुनी आले.
तुझे आठवणी येता
डोळे भरूनी आले.

**शहाजी गणपतराव पाटील**
मरतोळीकर

## तेच सांग तू मला

तुझी माझी ओळख झाली कशी?
तेच सांग तू मला
तुझे माझे संबंध जुळले कसे?
तेच सांग तू मला.
तुझ्या स्पर्शातून वास्तविक
काय अनुभवलो मी?
तेच सांग तू मला
हे सर्व गूढ मनाच्या गाभाऱ्यात ठेवून
नुसत्या कल्पनाच का रंगवलीस?
तेच सांग तू मला.
नटके सौंदर्य दाखवून
मनाला खटके बसवून
भरारी का मारलीस?
तेच सांग तू मला.
तुझ्या आठवणीतून आज
अंगावर रोमांच का थरथरतात?
हे सर्व गूढ तू जाणूनबुजून
अर्धवट का केलंस?
तेच सांग तू मला
तेच सांग तू मला!

## प्रतिक्षा

प्रिये तुझी प्रतिक्षा करतोय
कॉलेजच्या वाटेवर
घर तुझं लागलंय
थबकले न पाय तरी
हृदय मात्र थांबले
घराजवळ उदास चेहरा तुझा
पहावयास मिळाला
अन् माझे अश्रू
डोळ्यातून सांडली
मग माझा जीव तुझ्या
घरच्या वाटेवर वणवणेल
अन् माझी हाक तुझ्या
अंतरात हुरहुरेल
सहज कधी तू घरात
लावशील सांजवात
माझेही मन तिथेच
ज्योतीसम थरथरेल !

## अंत

उद्या सूर्य निश्चित उगवेल
गावात कुठे झाडे असतील
तर झाडावर पक्षी किलबिलतील
पण उद्याचा सुर्यप्रकाश
बघायला आम्ही असूच
असे निश्चितपणे आम्ही
सांगू शकत नाही
जगात सगळे अशाश्वत
असले तरी मृत्यू मात्र
शाश्वत असतो.
पण मृत्यू इतका
जीवघेणा असतो
हे कळाले फक्त भूकंपाच्या
किंकाळ्यांनी !

**वाडीयार नारायण**
बी. ए. द्वितीय वर्ष

## जळते काश्मीर : कृती हवी

**मनोजकुमार दोंतुलवार**
बी. ए. द्वितीय वर्ष

काश्मीर प्रश्न हा भारताच्या दृष्टीने सध्या नाजूक बनत चाललेला आहे. काश्मीर आपल्या ताब्यात घेण्यासाठी पाकिस्तानने चालविलेले प्रयत्न भारतासाठी त्रासदायक ठरत आंहेत. सर्वात वाईट गोष्ट म्हणजे काश्मीर समस्येला जातीय वळण देण्यात पाकिस्तान यशस्वी ठरत आहे. सुफी व ऋषी परंपरेत वाढलेले काश्मीरातील मुस्लिम इतर मुस्लिमांपेक्षा वेगळे आहेत. पाकिस्तानातील 'आय. एस. आय.' या संघटनेने काश्मीरातील पाकधार्जिण्या संघटनांच्या मदतीने तेथील मुस्लिम तरूणांत धार्मिक कट्टरवाद रूजविला.

आज डोडो जिल्ह्यात खुलेआम नरसंहार चालत आहे आणि तेथील अल्पसंख्याक हिंदू नागरिक जीवाच्या भीतीने पळून जात आहेत. आजपर्यंत जवळपास तीन लाखांच्यावर हिंदूंनी काश्मीर सोडून दिल्ली व इतर राज्यात स्थलांतर केले आहे. एवढी गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यावरही सरकारने मात्र या बाबीवर विचार-विनिमय करण्याचे सौजन्यही दाखविले नसावे.

१९६५ च्या युद्धानंतर पाकिस्तानने पुन्हा १९७१ मध्ये भारताशी युद्ध केले आणि तेव्हाही त्याला जबरदस्त हार पत्करावी लागली. ७१ च्या युद्धाचा सर्वात वाईट परिणाम म्हणजे पाकिस्तानचे पूर्व पाकिस्तान आणि

पश्चिम पाकिस्तान असे दोन तुकडे झाले आणि पूर्व पाकिस्तानचा स्वतंत्र असा बांगलादेश निर्माण झाला. त्यामुळे पाकिस्तानची स्थिती पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे झाली. म्हणूनच आज २४ वर्षांपासून पाकिस्तान प्रत्यक्ष युद्ध करीत नाही; तरी अलीकडील घटनांवरून असे दिसून येते की, पाकिस्तानची भारताशी युद्ध करण्याची खुमखुमी अजून पूर्णपणे जिरलेली नाही.

पाकिस्तान भारताशी प्रत्यक्ष युद्ध करीत नसला तरी त्याने भारताला आतून पोखरून खिळखिळा करण्याचे ठरविले आहे.

गेल्या काही वर्षांत पाकिस्तानने भारताची अनेक वेळा कुरापत काढली. कित्येक वेळा अग्नीबाणांचा वर्षाव केला. अनेकदा आमच्या जवानांवर गोळ्या चालवून त्यांचे बहुमोल प्राण घेतले. बऱ्याचदा भारतीय प्रदेशात घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तान भारतीय सार्वभौमत्वालाच आव्हान देत आहे आणि आपण मात्र 'रहने दो यार बादमें देखेंगे' या वृत्तीने वागत आहोत. आणि जास्तच झाले तर, ''पाकिस्तानच्या कारवाया आम्ही खपवून घेणार नाही.'' ''पाकिस्तानच्या हस्तक्षेपाचे गंभीर परिणाम होतील.'' अशा पोकळ धमक्या देण्यापलीकडे आपण काहीच करत नाहीत. परंतु आज पाकिस्तानला त्याच्याच पद्धतीने प्रत्युत्तर देण्याची गरज निर्माण झाली आहे.

काश्मीरचा लचका तोडण्यासाठी पाकिस्तान टपून बसला आहे. त्यासाठी पाकिस्तानने आय. एस. आय. मार्फत चालविलेल्या संघटनेला अतिरेकी प्रशिक्षण देऊन, काश्मिरी युवकांना भारताविरोधी भडकावून तसेच स्वतंत्र काश्मीरचे स्वप्न दाखवून त्यांना आधुनिक शस्त्रे चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात येते आणि त्यांना भारतात घुसखोरी करण्यासाठी पाठविण्यात येते. हे अतिरेकी भारतात विशेषत: काश्मीरमध्ये दहशतवादी कृत्ये करून लोकांमध्ये घबराहट निर्माण करतात. मुंबई बॉम्बस्फोट, हजरतबाल दर्गा प्रकरण, चरार-ए-शरीफ दर्गा जाळण्याचे प्रकरण ह्यामध्ये पाकिस्तानच्या 'आय. एस. आय.' चा हात असल्याचे स्पष्ट झालेले आहे. ह्या बाबी भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर नेऊन पाकिस्तानच्या अशा भूमिकेची पोल खोल करण्याची गरज आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणात आम्ही कमी पडतो. आम्हाला आमची बाजू पटवून देता येत नाही. आम्ही पाकिस्तानवर दवाब आणण्याचा प्रयत्न करीत नाही, ही बाब खेदजनक आहे.

आज काश्मीर फक्त नावापुरतेच भारतामध्ये आहे ही गोष्ट नजरेआड करून चालणार नाही. तसेच काश्मीरमधील लोकमानस भारताला फारच अनुकूल राहिलेले नाही.

काश्मीर हा पाकिस्तानी राज्यकर्त्यांच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. जेव्हा केव्हा पाकिस्तानमध्ये राजकीय पेच निर्माण होतो आणि तेथील नेत्यांची खुर्ची खिळखिळी होते तेव्हा पाकिस्तानी राज्यकर्ते काश्मीर प्रश्नाचा उपयोग ढालीसारखा करतात. तसेच संसदेच्या निवडणुकीमध्येही जो पक्ष काश्मीरला पाकिस्तानात विलीन करण्याचे ठासून सांगतो त्या पक्षास निवडणूक सोपी जाते. ही परंपरा आजपर्यंत कायम आहे.

आज भारताने अंतराळ क्षेत्रात तसेच क्षेपणास्त्र क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केली आहे. भारतातील कोणत्याही क्षेत्रातील प्रगती ही पाकिस्तानची पोटदुखी असते. काश्मीर प्रश्न जळत ठेवून भारताला काश्मीर प्रश्नात गुंतवून टाकायचे, त्यामुळे भारताला इतर विकासाच्या गोष्टीत लक्ष देण्यासाठी वेळ मिळू नये आणि भारताच्या प्रगतीला काही प्रमाणात तरी खीळ बसावी हीच नीती पाकिस्तान अवलंबत आहे. भारतात अशांतता, अराजकता निर्माण होईल आणि भारत कसा अडचणीत येईल असाच पाकिस्तानचा प्रयत्न असतो. काश्मिरातील अतिरेक्यांना होणारा शस्त्र पुरवठा, मुंबई बॉम्बस्फोट, जातीय दंगली घडवून आणणे इत्यादी गोष्टी पाकिस्तानच्या याच दुष्ट हेतूचा भाग आहेत.

पाकिस्तानमधील हिंदूंवर हल्ला करायचे, मंदिरे उद्ध्वस्त करायची, मूर्तींची विटंबना करायची आणि साहजिकच याची प्रतिक्रिया भारतात उमटली की, भारतामधील मुस्लिमांवर अत्याचार होत असल्याची ओरड चालू करायची. पाकिस्तानचा हा कुटील हेतू भारतावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक हिंदू-मुस्लिम बांधवांनी ओळखला पाहिजे.

१९४७ च्या फाळणीनंतर भारतातून पाकिस्तानमध्ये गेलेल्या मुस्लिमांची स्थिती आज फारच दयनीय आहे. तिथे त्यांना 'मुहाजीर' असे म्हटले जाते आणि त्यांना दुय्यम दर्जाचे स्थान दिले जाते. आज ते आपल्याच अस्तित्वासाठी आपले रक्त सांडत आहेत. पाकिस्तानचे भारतातील मुस्लिमांवरचे प्रेम हे फक्त दिखाऊ स्वरूपाचे आहे. ह्याची जाणीव भारतीय मुस्लिमांनी ठेवावी. पाकिस्तानमधील घटनांमुळे हिंदूंनी प्रक्षुब्ध होऊ नये. तसेच पाकिस्तानच्या चिथावणीला भारतातील मुस्लिमांनी भीक घालू नये.

भारत-पाकिस्तानचा काश्मीर प्रश्न सुटला तर अमेरिकेच्या दक्षिण आशियातील अस्तित्वालाच धोका आहे. हा धोका अमेरिका चांगल्या प्रकारे ओळखून आहे. त्यामुळेच अमेरिका पाकिस्तानची तरफदारी करीत आहे. तसेच पाकिस्तानला कोट्यवधी रूपयांचे (F-16) एफ-१६ सारखे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे देऊन आपली आर्थिक संपन्नता वाढवीत आहे. पाकिस्तानमध्ये लष्करी तळ ठोकून तेथून पश्चिमेस असलेल्या इराण-इराकवर, उत्तरेस असलेल्या अफगाणिस्तानवर, दक्षिणेस अरबी समुद्रावर तसेच चीनला पूर्वेकडे व संपूर्ण भारतावर लक्ष ठेवता येते. त्यामुळे विस्तारवादी अमेरिका पाकिस्तानसारख्या क्षणिक स्वार्थ पहाणाऱ्या देशाचा योग्य वापर करीत आहे. ही सारी कुटनीती पाहून भारताला आपले धोरण ठरवावे लागणार आहे. केवळ इशारे किंवा धमक्या देत बसल्याने पाकिस्तान भीक घालणार; त्यामुळे आम्ही जे बोलतो ते करून दाखवितो हे पाकिस्तानला आज दाखवून द्यायची गरज आहे.
पाकिस्तानची अरेरावी जगाच्या नजरेस आणून द्यावी लागेल त्यासाठी आपले परराष्ट्र खाते पुरेसे सक्षम असायला हवे. हे सर्व करतांना आपणास सर्वच आघाड्यांवर सतर्क राहून तोडीस तोड जवाब द्यावा लागेल. या बाबतीत थोडाही गाफिलपणा, बेजबाबदारपणा किंवा क्षणिक चूकही आमच्यावर पश्चातापाची पाळी आणू शकते, याचा विचार आमच्या राज्यकर्त्यांनी करावा. हेच या निमित्ताने सूचवावयास वाटते!

●●●

## सांग प्रिये

प्रिये,
अंतरीच्या दु:खाची ओली
जखम घेऊन या जीवनात जगत आहे
तहान मला लागली आहे;
माझे मन मात्र तुझ्या 'प्रितीत'
परकेपणाची जाणीव करून देत आहे.
तू मात्र आपलेपणाची ओळख
पूर्णत: विसरलीच आहे
पाहिलेली स्वप्न आज आठवीत आहे
आणि त्या आठवणीत मी मात्र
पूर्णत: वेडा झालो आहे.
सांग प्रिये,
या प्रेमसागराच्या उद्ध्वस्त
किनाऱ्याला आधार कोणाचा आहे?
आधार कोणाचा आहे?

## नयन

नयन तुझे पाहुनी
हृदय अंगणात बांधीले तुला माझ्या
लुकलुकणारी पापणी पाहुनी
मनात कुजबूज झाली माझ्या
प्रेमाची लाट आली मनात माझ्या
'भुवई' तुझी चंद्रकोर पाहुनी
प्रितीची चक्र सुरू झाले मनात माझ्या
असे तुझे बोलके नयन पाहुनी
रंभा, मेनका, उर्वशीची
आठवण झाली मनात माझ्या!

## 'मायेच्या कुशीत'

माझ्या मायेच्या कुशीत
सुख साठव खिळे
माझ्या डोळ्याच्या धारा
तिच्या जीवाला चिंतन
काय जन्म आमुचा
अर्धा, अर्धा जीव सारा
इथं सारार सुटेना
मन झेप घेते माहेरा
असं भांबावु सोडी
माय तुझी प्रित ही ओढी
उद्या परक्या घरी अशी व्याकुळे मनी

## 'न-कळत'

प्रिये,
गुलाबी ओठानी,
सोनेरी रूपानी,
काजल नयनानी,
तारूण्य ऋतुनी,
बहरलीस तू,
'सरस' बांध्यानी,
दागिन्याच्या पेहरावानी
बागेतील फुलासारखी
फुललीस तू,
नागमोडी चालण्यानी
नाक मुरडत बोलण्यानी
सौंदर्यात तुझ्या आणखीनच भर पाडलीस तू
अशा तुझ्या रूप-गुणांनी
न-कळत मनातील तार माझ्या
छेडलीस तू!

## 'तोडगा'

सत्तेच्या खुर्चीसाठी पुढारी
आश्वासन देतात बरे
बुद्धीबळातील 'पैदी' प्रमाणे
जनतेचे वापर करतात हे.
अन्याय, अत्याचार, गरिबी हटवू
असे भाषणबाजीतून सांगतात हे
पण जातीय भांडण लावूनी
दंगा फसाद करवतात बरे
भ्रष्टाचाराच्या 'विजेची' लागवड
स्वत:च्या शुभहस्ते करतात हे
'हर्षद' सारखे बैल ही
ह्यांच्यापासूनच बनतात रे
आशेच अनेक पद्धतीचे तोडगे
पुढारी लोक काढतात रे
पुढारी लोक काढतात रे

**सोनकांबळे उत्तम मरीबा**
बी. ए. द्वितीय वर्ष

## आंबराई आणि मैना

तुझ्या गुलमोहर आंबराईत तू
येत होतीस माझ्या गळ्यात तू
तुझे विशाल स्वरूपी झाडे सोडून तू
येत होतीस वर्तुळाकार पानात तू
तुझा ते राजमहाल जिना चढून तू
पाहात होतीस माझ्या निरभ्र बागेत तू
तुझ्या ''बा'' च्या मोहकरूपी वाडा सोडून तू
येत होतीस लहानशा कुटीत तू
तुझ्या मादकरूपी यौवनात तू
गुरफटलीस निखाऱ्यामय नयनात तू
तृप्त कर माझे सैरभैर फिरणारे लोचन
ये कावेरी स्वरूपी लाटाने धाऊन तू
शांत कर खवळलेल्या सागरास तू

**भुरे एच. व्ही.**
एम. ए. प्रथम वर्ष (मराठी)

## सुविचार

१) ''प्राणीमात्रावर एवढे प्रेम करा की, तुम्हास त्याला मारण्याची इच्छाच होणार नाही.''

२) ''खोल पाताळात गाडलेल्या हिऱ्याच्या खाणीतून आकाशातली ताऱ्यांच्या तोडीचे हिरेच बाहेर येत असतात.''

३) ''प्रेम हे मानवी जीवनाचं संगीत, साहित्य जीवनाचा आरसा, कादंबरी ही मानवी जीवनकथेचं ललित प्रांगण.''

४) ''पतीसाठी चारित्र्य, पुरूषासाठी ममता, समाजासाठी शील, विश्वासासाठी दया, प्राण्यांसाठी आपल्या हृदयात करूणा ठेवणाऱ्या प्राण्याचे नाव... (स्त्री)''

**स्वामी दयानंद**

## जात

या समाजातील जातीवाद नष्ट होऊ लागताच
दुसऱ्या एका जातीचा जन्म होऊ लागतो.
ती आहे
खुर्चीला चिकटलेली ढेकणाच्या अवस्थेत
ती आहे!
क्लासवन अधिकाऱ्यांच्या भरजरी तोऱ्यात
ती आहे!
भांडवलदाराच्या खजिन्यात
ती आहे!
रक्त बंधुच्या गुर्मीत

''रंग तुझा गोरा गं।
बोलण्यात तोरा
जणू ओठात डाळींब फुटलं गं।
तुझी बघून नवतीची काया।
आला मला झटका.''
''प्रारंभी आपला।
कर त्याचा आम्ही पुजिला।
जो व्यापूनी संसारी
हलवी या भुगोलाला....
जो उभरूनिया रंकाला।
जो शासित उन्मताला।
तोडून शृंखला।
तो मी आज पूजिला।

**भुरे एच. व्ही.**
संग्राहक

## डोंगराळ मोद

काय पाहात आहात तुम्ही
दोन पर्वतामधील दरीकडे
निळ्या भोर आकाशामधील
होता एक काळा ढग
अचानक वाऱ्याची झुळूक आली
आणि... ढगाला पर्वत दरीकडे नेली
खोल त्या दरीने ढगाकडे नजर फेकली
आणि पर्वत खगाची वाढच रोखली
ढग तेथेच आडला गेला पर्वताला
सहारा मिळाला
त्या खोल दरीला
गहरा मोद भरला
आणि अशातच निसर्ग दाता जन्मास आला
व पृथ्वीराजाला काहीवरून धरला।

## प्रेम पुष्प

१) संभोगातून प्रत्येयास आलेली समाधी ही चिरकाल असते.

२) निसर्गाच्या आलेल्या घडामोडीतून अनुभवास जी शांती मिळते त्याच शांतीतून मानसिक समाधान मिळते.

३) जीवनाच्या मृत्यूनेच नवजन्माची सुरूवात होऊ लागते.

४) प्रेमातूनच निसर्गाच्या हालचालीचा अनुभव येतो.

५) निसर्ग हे प्रेम शिकवणारा गुरू आहे.

६) ''प्रेम हीच समाधी आहे.''

## गुलाबी तळ्यात

निळसर आकाशाच्या छायेत
सोनेरी अंबरमय वातावरणात
तुझ्या त्या नभमय पोलक्यात
निसर्गाच्या शांतमय ढिगाऱ्यात
तु अशी सोज्वळरूपी प्रणयागत
भासतीस अहिल्या जशी लावण्याती
त्या गुलाबी लहररूपी तळ्यात
माझ्या पवन स्वरूपी नौक्यात
तू सामावलीस सोनेरी पिंजऱ्यात
तुझ्या त्या ओसाड आंबराईत
राहिली फक्त ती काळी माती
ये प्रिये हरणीच्या रथात
घेवून जा तू अनंतमय स्वर्गात
हे पुष्करणी तुझ्या कमळमयीन तळ्यात
लाल गुलाबी हेलावणाऱ्या पाण्यात
अशी एकदा पंख रूपेरी पोषाखात
घेऊन जा मज अनैतम सागरात

## पाणी नसलेला देश

म्हणजेच देशात पाणी नाही आहे.
पाण्यावाचून राहणारी लोक
पाण्यामुळे मारवणारी लोक
पाण्यावाचून तरणारी लोक
पाण्यावाचून मरणारी लोक
पाण्यासाठी तहानलेली ही माणसं
डोळ्यात आश्रूचा पूर जेव्हा समुद्राला मिळतो -
तेव्हा पाणी पेटू लागते!!
आमच्या दैना यातना पाहून
मेघालाही पाझर फुटतो
किती असं वेगळं चित्र ह्याचा अंदाज त्याला ही
न कळल्याने अश्रूचा पूर आमच्या शिरतो नी
एका नव्या समस्येचा उद्‌गम होतो
अन् आम्ही
पूरग्रस्त म्हणून ओळखलो जातो
पूरपिडीत म्हणून ओळखलो जातो.

## जगातील महापुरूष व त्यांचे कार्य

१) पाकिस्तान राज्याची स्थापना कोणी केली?
**मुहम्मद जीना**

२) रूसो क्रांतीचे वडील कोण होते?
**निकोलाईन लेनिन**

३) मिश्रचे पहिले राष्ट्रपती कोण होते?
**गमायल नासिर**

४) संयुक्त राष्ट्रसंघटनेचे जनक कोण होते?
**कार्लोस रोम्यूला**

५) अमेरिकेचे पहिले राष्ट्रपती कोण?
**जॉर्ज वॉशिंग्टन**

६) शांती निकेतनची स्थापना कोणी केली?
**रविंद्रनाथ टागोर**

७) संयुक्त व्याकरणाचे वडील कोण?
**पाणिनी**

८) सर्वात मोठा महाकाव्य लिहिणारा कोण?
**वेदव्यास**

९) भारतातील पहिली महिला राज्यपाल कोण?
**सरोजिनी नायडू**

१०) 'इन्कलाब जिंदाबाद' हे घोषित वाक्य कोणी काढले?
**भगतसिंग**

११) मॉऊंट एव्हरेस्टवर चढणारी पहिली महिला कोण?
**ज्यूको तवाई (जपान)**

१२) मॉऊंट एव्हरेस्टवर चढणारी पहिली भारतीय महिला कोण?
**बछन्द्रीपाल**

१३) दीन-ए-इलाही धर्माचा प्रसार कोणी केला?
**अकबर**

१४) सतीची चाल कोणत्या गव्हर्नरने बंद केली?
**लॉर्ड विल्यम बेटिंग**

१५) कुतुबमिनार पूर्ण करण्याचे कार्य कोणी केले?
**इलातूतमिस**

## भारतीय इतिहास

१) कोणत्या कारणाने अशोकाला सर्वश्रेष्ठ व महान सम्राट का मानतात?

**बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे.**
**भारतात व जगात बौद्ध धर्माचा प्रसार केल्यामुळे.**
**शांतीच्या धोरणाचा पुरस्कार केल्यामुळे.**
**युद्धाचा त्याग व उर्वरित आयुष्य लोककल्याणात घातल्यामुळे.**

२) बौद्ध धर्म स्वीकारणारा पहिला ग्रीक राजा कोण?

**दिमीट्स दुसरा**

३) कोणाच्या कारकिर्दीत बौद्ध धर्म महायान व हिमयान या दोन पंथात विभागला गेला?

**कनिष्क**

४) निर्वाण मिळविण्याकरिता बौद्ध धर्मात करावे असे सांगितले आहे?

**अष्टांग मार्ग**

५) कनिष्क कशाचा पुरस्कर्ता होता?

**''महायान''**

६) असे कोणते कारण आहे की, ज्यामुळे सम्राट अशोकाने त्याच्या उर्वरित आयुष्यात कधीही युद्ध न करण्याची प्रतिज्ञा केली?

**बौद्ध धर्माच्या प्रसाराकरिता.**
**पैशाचे अतोनात नुकसान झाल्याने.**
**कलिंग युद्धातील अकारण रक्तपात.**
**गौतम बुद्धाच्या साक्षात्काराने.**

७) अशोकाच्या धर्माचे स्वरूप काय होते?

**लोकांचे दु:ख दूर करणे.**

८) अशोक स्तंभ कशाने बनविले होते?

**अखंड पाषाण**

९) बौद्धाला ज्ञान कितव्या वर्षी प्राप्त झाले?

**३५ व्या वर्षी**

१०) बुद्धाचा जन्म कोठे झाला?

**लिम्बिनी**

११) भगवान बुद्धाचा मृत्यू कोठे झाला?

**कुशीनगर**

१२) कार्तीस्तंभ कोणी बांधला?

**राणाकुंभ**

१३) सामाजिक बदल प्रथम कोणी आणला?

**अकबर**

१४) सर्वात प्राचीन वंश कोणता?

**सातवाहन**

१५) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या इतिहासात १९२० हे वर्ष कशाकरिता प्रसिद्ध आहे?

**असहकाराची चळवळ**

१६) वारकरी पंथाचे संस्थापक कोण?

**ज्ञानदेव**

१७) कलकत्त्याहून दिल्लीस राजधानी केव्हा हलविली गेली?

**१९११ मध्ये**

१८) मीराबाईची कृष्ण भक्तीवरील गीते कोणत्या भाषेत लिहिली होती?

**वज्रभाषा**

१९) भारतीयांच्या दृष्टीने १८५७ च्या उठावाचा अतिशय महत्त्वाचा परिणाम कोणता?

**पुढील भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ही घटना उत्तेजना देणारी ठरली.**

२०) मेगास्थेनीस कोण होता?

**ग्रीक राजा**

२१) महाबलीपुरम येथील मंदिरे कुणी बांधली?

**राष्ट्रकूट**

२२) मयुर सिंहासन कोणाचे होते?

**शहाजहान**

२३) ''स्थानिक स्वराज्य संस्थाचा जनक'' कोणास म्हणतात?

**लॉर्ड रिपन**

२४) प्रार्थना समाजाची स्थापना कोठे झाली?

**महाराष्ट्र**

२५) ''ऋसंहार'' चे लेखक कोण?

**कालीदास**

२६) बौद्ध धर्मीयांचे विनयपीठक, सुतपीठक व अभिधम्मपीठक हे तीन महान ग्रंथ असून ते ''त्रिपीठक'' या नावाने ओळखले जाते.

२७) प्राचीन काळी हिंदू साम्राज्याचा संस्थापक कोण

होता? (दक्षिणेकडील)

**हरीहर**

२८) "वेरूळचे कैलास मंदिर" ही कोणाची अप्रतिम कलाकृती होय?

**राष्ट्रकूट**

२९) भागवत धर्माची प्रमुख देवता?

**विष्णू**

३०) भारतावर सर्वप्रथम (हल्ली) आक्रमण करणारा मुसलमान कोण?

**महमंद बिन कासीम**

३१) महावीराच्या पत्नीचे नाव "प्रभावती" असे होते तर कन्येचे नाव अनोज्ञा होते.

३२) ब्राह्मण काळात कशास जास्त महत्त्व होते?

**कर्मकांड**

३३) विद्यापीठ कायदा पास करून कुलगुरू पदाची निर्मिती कोणी केली?

**लॉर्ड कर्झन**

३४) शिवाजीचा राज्याभिषेक केव्हा झाला?

**इ. स. १६७४**

३५) शिक्षणामध्ये इंग्रजी माध्यमाचा पुरस्कार कोणी केला?

**लॉर्ड बेटिंग**

**संग्राहक – भुरे एच. व्ही.**
एम. ए. प्रथम वर्ष

## १) गुपीत

फुलांचं गुपीत कळीत असतं
भुग्यांना ते कळणार कसे?
समुद्राचं गुपीत पोटात असतं
लाटांना ते कळणार कसे?
प्रितीचं गुपीत ओठात असतं
शब्दाला ते कळणार कसे?
प्रेमाचं गुपीत हृदयात असतं
डोळ्यांना ते दिसणार कसे?

## २) ओढ

तू नजरेसमोर आलीस तेव्हा
मनात काहूर माजलं होतं,
तुझ्या बोलक्या नयनांनी
मन माझं जिंकलं होतं,
प्रत्यक्ष भेटलीस तेव्हा
काय म्हणावं हे न समजलं होतं
तुझ्या हळुवार स्पर्शाने
असं बेभान केलं होतं
ती भेटण्याची रात
आणखीन आहे माझ्या उरात (हृदयात)
किती दिवस राहणार आहे,
तुझी भेट आणि ओढ माझ्या मनात!

## ३) प्रिया

एक प्रिया
असे ती माझी
टुमदार बांधा
अन् नेटकीच उंची
असे तिचे यौवन
जीवनाला घुमदार वळण
कमरेत जे अभिप्रेत
भावनेतही प्रणय सळसळतं
वाटे मला असे की
जाणोनी घ्यावे तिचे
एकबार भाव नयनातले
मग सांगावी आपली प्रिती
पुऱ्या सत्य हृदयासवे
सुंदरता स्वप्न बने
पाहुनी सौंदर्य तिचे
भाववेड्या प्रियकराला
नच दुसरे काही सुचे
चातुर्य माधुरी ती
बुद्धीमान जगती
एक प्रिया कोण असती
माझीच सु"प्रिया" ती!

## ४) येऊ नकोस पुन्हा

येऊ नकोस पुन्हा, घेऊन बकुळीची फुलं
त्यांच्या वासानी आता, नाही पडणार भुल
येऊ नकोस पुन्हा!
आशेची किरण घेऊनी, डोळ्यातील जाणीवा,
केव्हाच गेल्या हरवूनी, आठवणीच्या उणीवा
येऊ नकोस पुन्हा!
घेऊनी पानं आठवणीची, शक्यता कमी आहे
त्याला धु:पार फुटण्याची, अशक्यता जास्त आहे
येऊ नकोस पुन्हा!

## ५) दुरस्थ

एक नदी आहेस तू
खळखळणारी नि धावणारी
मी काठाचा वृक्ष
जमिनीत खोलवर माझी घट्ट मुळे
भेटणार कसा तुला...?
भेट व्हायचीच असेल आपली
तर यावा लागेल तुलाच मोठा पुर
पण नको ती तुझी भव्य उग्रता
त्यापेक्षा बरा तुझा
जमिनीमार्फतच ओलावा...
मी जगेन त्यावरच
मात्र तुझ्यापासून
दूर! दूर!! खूप दूर!!!

## ६) होऊ नये

पहाटेच्या पाऱ्यात, थंडगार वाऱ्यात
दवबिंदू होऊन ये
मोगऱ्याच्या डहाळीवर, डहाळीच्या कळीवर
मधमाशी तू होऊन ये
रणरणत्या उन्हात, केवड्याच्या वनात
सळसळती नागीन तू होऊन ये
पौर्णिमेच्या रात्री, तुझ्या वेड्या चंद्रासाठी
तेजस्वी चांदणी तू होऊन ये
दडवू नकोस संधी, जगलच तर कधी
हृदय माझे होऊन ये

## ७) निदान आता तरी

फुलाफुलात तुला फुलपाखरासारखी मिरवायची
हौस कशी नडली?
फुलपाखराचे तुटलेले पंख पाहून
निदान आता तरी
नाकारणास नाहीस तू काट्याचं अस्तित्व
फुलपाखरासारखी फुल असतात
अन् इथं फुलंच खुडली जातात
निदान आता तरी
कोमेजल्या फुलाशेजारी, फुलपाखराच्या प्रेताचही
खच सापडेल तुला, गोंदल्यावर म्हणालीस
नक्षी कशी छान दिसते, अलगद पंख जोडून
निदान आता तरी
फुलपाखरासारखं विहरता यावं
एवढं का सहज वाटतं तुला
रखरखत्या वैशाखातील भटकंती
मनी नसेल तुझ्या
निदान आता तरी
जेव्हा नक्षी व्रण बनतात
पंख शिणून जातात
तुला तर हे न पेलण्यासारखं तरीही
फुलपाखरासारखं जीणं का आवडतं तुला
निदान आता तरी!

## ८) प्रतिक्षा

नाते तुझे नि माझे युगायुगाचे
दोघांनाही आवडे जिणे मोगऱ्याचे
प्रितिसंगमाचे दिन किती आठवायचे
प्रतिक्षेतच तुझ्या कुठवर जगायचे?
आयुष्य हे दोघांचे अनमोल
खेळेल त्यावर प्रितिचं फुल

त्या नाजूक प्रेमफुलाचे
खरे रूप केव्हा जाणायचे?
श्रावणाची बाग फुलली
प्रेमवृक्षाला कळी आली
त्या सुकुमार प्रणयकळीचे
फुल केव्हा व्हायचे?
वसंत ऋतुला आला बहार
दोघांची वाट पाहे गुलमोहर
स्वप्न त्या गुलमोहराचे
आपण केव्हा पूर्ण करायचे?
भावना सरितसे आला पुर
प्रेम क्षुटेचे वारूळ चढले मनावर
अशा या प्रेम तृषीत प्रीत कळीचे
मनोरथ केव्हा पूर्ण व्हायचे?

## ९) दूर जाणाऱ्या लाटांना

दूर जाणाऱ्या लाटांना
किनाऱ्याकडे बोलावू नकोस
मला ओहोटीच बरी
भरती येऊ देऊ नकोस
काटेरी वाटेवर फुलांची
उधळण तू करू नकोस
डोळ्यातील आसवांना
ओठावरील स्मित देऊ नकोस
फडफडणाऱ्या ज्योतीवर
झेप वेडी तू घेऊ नकोस
ज्योत ती तुझीच जळू दे
तेल तू घालू नको
माझ्या अर्धस्वरांना
स्वर तुझा तू देऊ नकोस
गाणे माझे अपूर्णच राही
पूर्ण ते तू करू नकोस
दूर जाणाऱ्या लाटांना...
किनाऱ्याकडे तू बोलावू नकोस...!

## १०) निरोप

निरोप तुझा घेताना
भावना ही साथ होती
हात तुझे हलतांना
प्रेमाची आर होती
फिरून-फिरून पाहत होतो
मित्राची आस्वे होती
ओठ हसत होते
तेव्हाच डोळे हे रडत होते
विरहाचे ते एक दिवस होते
निरोप तुझा घेतांना...

**हेंकरे शिवाजी राजेंद्रराव**
बी. एस्सी. तृतीय वर्ष (वर्ग प्रतिनिधी)

## वेचलेले मोती

चूक कबूल न करणे म्हणजे दुसरी चूक करणे होय.

जॉन जुवेल

खोटी लाज, खोटा प्रचार व खोटे पावित्र्य यांची पांघरूण घालून प्रेमाची दुःखं जगापासून लपविता येतात पण ती मनाला जाळून टाकतात.

साने गुरूजी

ज्ञानाचा गर्व बाळगणे म्हणजे प्रकाशाने अंधत्व स्वीकारण्यासारखे होय.

बेंजामिन फ्रँकलिन

तुम्हाला जे आवडते ते मिळविण्याचा प्रयत्न करीन असा नाही तर तुम्हाला मिळेल तेच आवडते म्हणून तुमच्यावर काम लादले जाईल.

बर्नार्ड शॉ

# राष्ट्रीय सेवा योजनेने मला काय दिले?

**गोंदे सिद्धारेड्डी गोविंदरेड्डी**
बी. ए. द्वितीय वर्ष

*''जीवनात दुःखाला प्रेमाने, दारिद्र्याला श्रमाने आणि कलहाला शांतीने जो जिंकेल तोच जीवनात सफल होईल.''*

दिवसामागून दिवस मागे जात राहतात आणि रात्रीमागून रात्र. दिवसा पाठोपाठ रात्र आणि रात्रीनंतर दिवस हे चक्र फिरत आहे, त्याच प्रमाणे समाज किंवा सामाजिक जीवन हे एक चक्र मानले तर त्याबरोबर समाजात असणारे नीती-मूल्ये बदलतात आणि ते बदलत असतांना काही अडचणी व प्रश्न समोर येत असतात. अशा सर्व प्रश्नातून जो मार्ग काढू शकतो तोच जीवनात यशस्वी ठरू शकतो.

**राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रतिक किंवा चिन्ह :-**

कोनार्क येथील सूर्यमंदिरावर सूर्य-रथ चक्राच्या आधारावर तयार केलेले आहे. सृजनशिलता, रचनात्मकता आणि रचनात्मक कार्य व त्यास योग्य दिशा आणि प्रगती व विकासाचा अर्थबोध करून देते. मुख्यत्वे म्हणजे एन. एस. एस. चे प्रतिक हे प्रगतीपर जीवनाचा संदेश देते. दुसरी बाब म्हणजे चक्र हे सतत फिरत राहणे, कार्यरत राहणे हेच सांगते. म्हणून व्यक्तीच्या जीवनात असे चक्र फिरत असायला पाहिजे. हे चक्र एकदा थांबले की माणसाचे जीवन देखील थांबेल. यासाठी सतत कार्य करीत असले पाहिजे. नसता असे म्हणता येते, ''खाली दिमाख सैतान का घर होता है।''

मी एन. एस. एस. मध्ये भरती झाल्यापासून मला असे वाटू लागले की, आपण पूर्वीपेक्षा गतीमान झालेलो आहोत. माझ्या या दोन वर्षांच्या अनुभवाने आणि शिबीराने मला जीवनरूपी अमृतच पाजले आहे. मी अगोदर ज्ञानाचा फार तान्हा होतो. माझी ही ज्ञानाची तहान आता तृप्त झाली आहे. विशाल अशा जीवनरूपी सागरात कशी डुबकी मारावी आणि जे कोणी बुडत आहेत, त्यांना कसा सहारा द्यावा यांचे ज्ञान झाले आहे. जीवनरूपी सागरात डुबकी घेतल्यापासून ते शेवटच्या पैलतीरापर्यंत जायचे व किनारा कसा काबीज करायचा हेसुद्धा अवगत झाले आहे. स्वतःच्या जीवनाबरोबर दुसऱ्याचे जीवन हे तितकेच महत्त्वाचे असते हा महत्त्वपूर्ण विचार मला कळू लागला आहे.

मला या १० दिवसांच्या शिबीरामध्ये वेगवेगळे अनुभव आलेले आहेत. त्यामध्ये श्रमदान, बौद्धीक कार्यक्रम अशा विविध गोष्टी मला अनुभवाला व पहायला देखील मिळाल्या आहेत. विविध अशा कार्यक्रमात भाग घेऊन त्यामधील कला मी अवगत केली. श्रमदान करतेवेळी मला स्वतःला अनुभवले की, ''मोत्याच्या हारापेक्षा घामाच्या धारानेच मनुष्य अधिक शोभून दिसतो.'' मला श्रमदान करतेवेळी धन्य धन्य वाटले. मीसुद्धा माझ्या जीवनात कष्टाची चतकोर भाकरी स्वीकारण्यास तयार आहे. कामचोर वृत्तीला तिलांजली देऊन स्वावलंबी जीवन जगण्याचा एकमेव दृष्टीकोन राष्ट्रीय सेवा योजनेने मला मिळवून दिला आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेने मला अमृत पाजले आहे असे मी वर म्हटले आहे. समाजामध्ये राहण्याचे शिक्षण, स्नेह, आदर, बंधुभाव, एकाग्रता, मनामध्ये जिद्द, धाडस, स्वावलंबी वृत्ती त्याच प्रमाणे देशातील विविध प्रश्नांना तोंड देण्याचे धाडस, जेणे करून देशात सुख-शांती नांदेल. आपण जगाशी मुकाबला करण्यासाठी तयार असले पाहिजे. काळवेळ कोणालाही सांगता येणार नाही. आज भारताला असे वाटत आहे की, आज जगात तिसरे महायुद्ध होणार की काय अशी भीती जगाला वाटत आहे. त्यासाठी विविध देशातील जाती, भाषा, धर्म, प्रांत, वंश इत्यादी सर्व मतभेद विसरून सर्वांनी एकत्र यावे आणि

अंधश्रद्धेवर विश्वास ठेवू नये यासाठी राष्ट्रीय एकात्मता असणे आवश्यक आहे. जातीयता, स्त्री-स्वातंत्र्य, हुंडा पद्धती आणि सर्व व्यसनमुक्ती बंद करायला पाहिजे आणि हे सर्व बंद झाले तर देशामध्ये प्रेमभावना, आत्मियता बाळगणे अशा प्रकारचा आत्मविश्वास माझ्यामध्ये या राष्ट्रीय सेवा योजनेने केला आहे.

**सहकार्याचे महत्त्व (एकीचे बळ) :-**

सहकार्य केल्याने कोणतेही कार्य लवकर पूर्ण होते. यामुळे व्यक्ती-व्यक्तीमध्ये एकमेकांत प्रेम, आपुलकी निर्माण होऊन सामाजिक संबंध निर्माण होतात. अशा संबंधांतून सामाजिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य पार पाडले जाते. म्हणून मला एक म्हण आठवत आहे ती अशी, ''साथी हात बढाना'' याप्रमाणे श्रम केल्याची जाणीव न राहता त्यातून हितोपयोगी गोष्टीच निर्माण होतात. एकमेकांच्या सहकार्याने अशा विधायक कार्यासाठी जर योग्य प्रकारे उपयोगात आणले तर अनेक चांगल्या गोष्टी साध्य होतात. अनेकांच्या सहकार्यामुळे ते कार्य झाल्याने त्यात आपलेपणाची भावना निर्माण होते. आजच्या युगात अशी भावना निर्माण होण्याला फार महत्त्व आहे. कारण आजच्या समाजामध्ये सामाजिक संबंध हे औपचारिक होत चालले आहेत. गावकऱ्यांच्या सहकार्याने शाळेची इमारत पूर्ण झाली तेव्हा गावकऱ्यांना झालेला आनंद मला गगनात मावेनासा झाला आहे. एन.एस.एस. बद्दल झालेली त्यांची आपुलकीची भावना ही काही वेगळीच होती. यावरून मला सहकार्याची भावना समजून आली आणि सगळे एकत्र आल्यानंतर मला एका पारधीची गोष्ट आठवत आहे. (एकीचे बळ)

एन.एस.एस. अंतर्गत मला ग्रामीण रूग्णालयामधून देखील कार्य अनुभव पहायला आणि अनुभवालाही मिळाली आहेत. त्यामध्ये मला सर्वप्रथम जेव्हा महाराष्ट्रामध्ये प्लेग या रोगाची लागण झालेली वार्ता कळताच, सर्वप्रथम नांदेड जिल्ह्यामध्ये प्लेगचा सर्वप्रथम सर्वे कोणत्या विद्यालयाने केला असेल तर तो म्हणजे देगलूर महाविद्यालयातील एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांनी केलेला आहे. तसेच रूग्ण सेवा मंडळाकडून ''एड्स'' या महाभयंकर रोगावर खास करून दोन दिवसांचे प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये जवळजवळ २०० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. आम्हाला ती मिळालेली माहिती आम्ही आमच्या परीने ग्रामीण भागापर्यंत प्रचार व प्रसार असे कार्य केलेले आहे आणि दारूबंदीचाही प्रचार करण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे. तसेच कुटुंब कल्याणाचे सर्वे सुद्धा आम्ही विद्यार्थ्यांनी केलेले आहे. म्हणून मी असे लिहित आहे की, ''रूग्ण सेवा म्हणजे ईश्वर सेवा.''

अस्पृश्यता निवारण्याचे प्रयत्न हे मला महात्मा गांधी, महात्मा फुले, आगरकर, राजा राममोहन रॉय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाजसुधारकांनी केले आहेत. ते अमर झालेले आहेत आणि मला देखील याचाच वारसा एन.एस.एस. ने दिला आहे. स्वत:च्या हातात झाडू, टिकास घेऊन जेव्हा मी कामाला लागलो, प्रथम मला लाज वाटली. नंतर श्रमाची प्रतिष्ठा समजून आली आणि किती वेळ कामात गेला ते कळलेच नाही. म्हणून मी म्हणत असे, ''केल्याने होत आहे रे आधी केलेच पाहिजे.'' याप्रमाणे एन.एस.एस. चे कार्य मला करता आले. सुधारकांनी प्रयत्न केले तरी अजून तरी ते कायम आहे. खेडूतांच्या हृदयापर्यंत जाऊन कार्य केले तर अशा समजुती ते सोडून देऊ शकतात हे एन.एस.एस. ने दाखवून दिले आहे. ''प्रयत्नांती परमेश्वर'' हे सिद्ध करून दाखवले आहे.

समाजाचे कार्य हे माझे कर्तव्य आहे याची मला जाणीव करून दिली आहे. खेड्यातून राहून खेड्यातील रस्ते दुरूस्ती करणे, तेथील शाळेची इमारत बांधून देणे, त्यांना पशुपालनाचे महत्त्व पटवून देणे, त्यांना बँकेमध्ये खाते काढून देणे, तेथे आरोग्य केंद्र चालू करणे अशा प्रकारचा जास्तीत जास्त लोकांना याचा फायदा मिळवून देणे यासाठी मी सतत कार्य करीत राहीन. मी दुसऱ्यांना सांगत असतो, ''मला कोणत्याही व्यक्तीचे चांगले करता आले नाही तरी त्या व्यक्तीचे

वाईट तरी करणार नाही.'' केव्हा केव्हा अपयशही येऊ शकते. अपयश ही यशाची पहिली पायरी आहे, अशी मी एन. एस. एस. मध्ये शपथ घेतली आहे. राष्ट्रीय सेवा योजनेने मला समर्पण व त्याग करण्याची मनोवृत्ती दिली आहे. माझे जीवन सुखावह होण्यासाठी मला अनुभवाची शिदोरी दिली आहे. मला समाज सेवेचे तत्त्व दिले आहे. या कार्यामुळे प्रभावित होऊन मी १५-५-१९९५ रोजी रक्तदान केले आहे. ''रक्तदान म्हणजे जीवनदान.''

''जे जे आपणास ठावे। ते ते दुसऱ्यांशी शिकवावे। शहाणे करून सोडावे। सकळ जना॥

ही वृत्ती राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांत वाढविली जाते. समाज सेवेतून शिक्षण आणि शिक्षणातून आत्मविकास व राष्ट्रीय विकास साधणारी ''राष्ट्रीय सेवा योजना ही राष्ट्र विकासाची गंगोत्री आहे.''

''सृजनशील साहसाला सीमा नसतात'' हे राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीदवाक्य आहे. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विद्यालयाने म्हणजे आमच्या महाविद्यालयातील प्राचार्य व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासाव्यतिरिक्त अनेक उपक्रम हाती घेतले. यामुळे आमचा बाहेरच्या जगाशी संबंध आला आणि जगाची थोड्या प्रमाणात का होईना ओळख झाली. तसेच आमच्यातील मुळातच अस्तित्वात असलेले परंतु परिस्थितीने दडपल्या गेलेल्या गुणांना वाव देण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेने केले. त्यामुळे आमच्यात आत्मविश्वास निर्माण झाला.

''श्रमाला प्रतिष्ठा द्यावी'' हा देखील राष्ट्रीय सेवा योजनेचा दुसरा हेतू आहे. पूज्य बाबा आमटेंनी एका अपेक्षित समाज घटकांना नवचैतन्य देऊन, त्यांच्या वेदना स्वत: झेलून त्यांच्यातला देव जागृत केला व त्या देहमंदिरासाठी ते स्वत: पुजारी बनले. त्यांच्या नयनात केवढी ही करूणा! या आमच्या एन. एस. एस. शिबीरात त्या पूज्य बाबांची ती कारूण्याने ओथंबलेली समाज भक्ती क्षणाक्षणाला प्रोत्साहित करते.

ही एन. एस. एस. ची योजना मला कॉलेजातून बाहेर पडल्यानंतर समाजात माझे महाविद्यालयीन जीवनाचे प्रतिनिधीत्व खूप सहायक ठरणार आहे. मी या योजनेतून खूप काही शिकलो आहे. ही योजना एक अमोल जीवनदायी लाभली.

शेवटी असं सांगावसं वाटतं की, ''राष्ट्रीय सेवा योजनाच्या'' शिबीराने जीवन कसं जगावं याचंच कौशल्य शिवलं आहे. जीवनाचा अर्थ समजावून आला, इथेच मी राष्ट्रीय सेवा योजनेचं यश मानतो. जीवनातील निखळ आनंदासाठी आणि जीवन समरसून उपभोगण्यासाठी ''धडपड'' अनिवार्य ठरते. अशा परिस्थितीत सापडलेल्या नव्यानेच लिहिण्याचा प्रयत्न करत आहे: मला हे लिहिण्याचं श्रेय मी माझ्या राष्ट्रीय सेवा योजनेला दिले आहे.

माझ्या शैक्षणिक जीवनात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य करीत असतांना जे अनुभवास व शिकावयास मिळाले, मी या समाज सेवेच्या कार्याची ही शिदोरी माझ्या भावी जीवनात समाजहिताकरिता उपयोगात आणीन.

●●●

## चिंतनातून

— चांगले विचार मनात फार वेळ टिकत नाहीत म्हणून ते मनात येताच कृती करा.

— हात चालाख असावेत, पण हातचलाखी असू नये

— आयुष्यात दररोज येणारा अनुभव हा माणसाचं सर्वात मोठं शिक्षण होय.

— सुख गटागट पितो आणि दु:ख चघळीत बसतो तोच मानव.

— जे शत्रुत्व द्यायला घाबरतात, त्यांना उभ्या आयुष्यात चांगले मित्र कधीच मिळत नाहीत.

— धैर्याच्या नौकेत बसून प्रयत्नांचे पाय मारले तर उजनीचा किनारा दूर नाही.

— विवाह हा ज्याला शेवट नाही, असा जगातील एक सौत आहे.

**बकयगार प्रकाश विपुल** बी. ए. द्वितीय वर्ष

# प्राचीन ऐतिहासिक होट्टल : एक दृष्टिक्षेप

**हणमंतकर एम. एस.**
एम. ए. अंत्य (इतिहास) [वर्ग प्रतिनिधी]

होट्टल हे देगलूरपासून ८ किलोमीटर अंतराचे गाव. नांदेड जिल्ह्यातील त्यास गावास मोठा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. त्याविषयीचा हा एक दृष्टिक्षेप.

**होट्टलवरील राजकीय अधिपत्य :-**

प्राचीन काळी या भागावर नंद, मौर्य घराण्यांनी आपली सत्ता स्थापन केली होती. पण याचा सबळ पुरावा मिळत नाही. शुंगाच्या साम्राज्य विभागणीनंतर हा भाग माधवसेनाच्या ताब्यात असावा. सातवाहनाच्या अखेरीस नलपानाने (शक) संपूर्ण महाराष्ट्र जिंकला. त्यामुळे हा भाग त्यांच्या अधिपत्याखाली गेला होता. यानंतर वाकाटकांनी या भागात सत्ता स्थापल्याचा उल्लेख आपणास विंध्यसेनाच्या ताम्रपटावरून दिसतो. यानंतर बदामीच्या चालुक्याची सत्ता आली पण यासही सबळ पुरावा नाही.

राष्ट्रकुटाच्या काळात या परिसराचे भाग्य उजळले होते. "कंधारपूर वराधिश्वर'' या उपाधीवरून आपणास त्याची कल्पना येते. त्यांनी सुमारे २०० वर्षे या भागावर राज्य केले.

राष्ट्रकुटानंतर कल्याणीच्या चालुक्याचे वर्चस्व प्रस्थापित झाले. महाराष्ट्रातील नांदेड व उस्मानाबाद या दोन जिल्ह्याशी त्याचा जवळचा संबंध आला. हे येथे सापडलेल्या शिलालेखावरून व होट्टलच्या मंदिरावरून स्पष्ट होते.

यानंतर यादवांचे राज्य प्रस्थापित झाले. इ. स. १३१८ साली मुस्लिमांनी हा भाग जिंकला व मुस्लीम राजवटीस सुरूवात झाली. अशा रीतीने होट्टलचा भाग विविध राजाच्या अधिपत्याखाली होता. पण कल्याणीच्या चालुक्य राजवटीने हा भाग विशेषत: प्रकाशात आणला.

**होट्टलमधील स्थापत्य अवशेष :-**

देगलूर तालुक्यातील होट्टल हे गाव चालुक्य स्थापत्याचे आगार आहे. इ. स. ११०१ ते ११२० या काळातील राजाचे दोन शिलालेख येथे सापडले आहेत. ज्यात चालुक्याच्या विजयासंबंधी दानधर्माची व अन्य माहिती असल्याचे आपणास दिसते. या भागात आढळणाऱ्या स्थापत्य अवशेषाविषयीची माहिती आपणास पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**चालुक्यकालीन होट्टलची मंदिरे :-**

इ. स. १२ व्या शतकात होट्टलची मंदिरे बांधण्यात आली आहेत ज्यात शिव किंवा सिद्धेश्वर मंदिरे, महादेवाचे मंदिर याचा उल्लेख करता येईल. या मंदिराचे शिल्प अत्यंत आकर्षक, मनोवेधक आहेत. मंदिराच्या समोर शिलालेख दिसतात. मंदिरावर विविध शिल्पाकृती कोरण्यात आल्या आहेत. कुठे शिवाचे तांडव नृत्य, कुठे वर देणारी शिवमूर्ती, विष्णूच्या सुरेख मूर्ती व देवदेवताबरोबर सुरसुंदरीच्या अनेक लोभसवाण्या प्रतिमा कोरण्यात आल्या आहेत. थोडक्यात चालुक्य काळात स्थापत्याच्या दृष्टीने हा परिसर समृद्ध होता.

**होट्टलचे सिद्धेश्वर मंदिर :-**

चालुक्य कलेचा अप्रतिम आविष्कार होट्टलच्या या मंदिराच्या रूपाने आपणास पहावयास मिळतो. मंदिरास पाहून मनस्वी आनंद होतो, पण अलिकडच्या काळात मंदिरावर वाढलेल्या वनराईमुळे दगड सुटू लागले आहेत.

हे मंदिर एका उंच दगडावर बांधण्यात आले जे चालुक्य कलेचे एक वैशिष्ट्य आहे. या देवळाचा आकार

नक्षत्रासारखा आहे. मंदिराच्या भिंती कोनाच्या आकाराच्या खालपासून वरपर्यंत आहेत. या रेखीव बांधणीने कला अधिकच उठावदार दिसत आहे.

देवालयाच्या समोर मोठा मंडप आहे. शिवाय उजव्या व डाव्या बाजूस अर्धमंडप आहेत. मधोमध कलापूर्ण रीतीने शिल्पीत केलेला सभामंडप व गर्भगृह अशी रचना आहे. या सभामंडपात १८ खांब असून ते चालुक्य कलेचे अप्रतिम आविष्कारच होत. सभामंडपाच्या बाजूने दगड निखळून पडले आहेत. त्यावरून ते गूढ सभागृह असावे असे वाटते. येथील शिलेचे वैशिष्ट्य म्हणजे दगडावर त्याने आघात केल्यास सात स्वरापैकी एक स्वर निघतो. त्यापैकी काही दगड देगलूरच्या दर्ग्यात आहेत.

**होट्टलचा अप्रतिम आविष्कार :-**

देवालयाच्या बाह्य भिंतीवर मूर्तीकला अप्रतिमपणे कोरण्यात आली आहे. मंदिराची बाह्य बाजू अनेक सुरसुंदरींनी व्याप्त आहे. एका ठिकाणी नृत्य करणाऱ्या गणेशाचे सुंदर चित्र आहे. सुरसुंदरीच्या शिल्पात नृत्यांगणा, अलसिका, निरनिराळी वाद्ये वाजविणाऱ्या अप्सरा दिसतात. नृत्यांगणांची वेशभूषा व केशभूषा लक्षणीय आहे.

वेशभूषा, केशभूषा, अलंकार, छतावर अष्टदिग्पाल कोरण्याची पद्धती, गूढ मंडपाच्या जाळीदार भिंती, फळा-फुलाच्या आकृतीची कुसर इत्यादी चालुक्य कलेची वैशिष्ट्ये आपणास या मंदिरातून जाणवतात.

**होट्टल येथील शिलालेख :-**

होट्टल येथे सापडलेल्या शिलालेखांपैकी शिलालेख ६ वा विक्रमादित्याचा आहे. त्याचे बहुसंख्य लेख कानडी लिपीभाषेत कोरण्यात आलेले आहेत. चालुक्याचे शिलालेख होट्टलबरोबर करडखेड व येरगी या ठिकाणी सापडले आहेत. हे शिलालेख चालुक्य नृपती सोमेश्वर तिसरा याच्या काळातील महत्त्वाचे पुरावे आहेत. नांदेड परिसरातील चालुक्याच्या शिलालेखांपैकी होट्टलचा शिलालेख सर्वात महत्त्वाचा आहे. संस्कृत भाषेत व नागरी लिपीत लिहिल्या गेलेल्या या शिलालेखातून कल्याणीच्या चालुक्याचे मांडलिक घराणे प्रकाशात आले. आजही हा शिलालेख महादेवाच्या मंदिरासमोर ठेवण्यात आला आहे. हा लेख १९५९ रोजी वाचला गेला. त्याचे संपादन डी. सी. सरकारने केले आहे. वन्हीकूल नावाच्या मांडलिक घराण्याची वंशवळ यात आहे.

**होट्टलचे मूर्तीशिल्प :-**

होट्टल येथे विविध मूर्ती सापडल्या आहेत. विष्णूची मनमोहक मूर्ती असून ती चतुर्भूज आहे. हातात शंख, चक्र गदा असून विविध आभुषणाने ती सुशोभित आहे. होट्टल येथे रामाची मूर्ती सापडली आहे. मराठवाड्यात ह्या मूर्त्या कमी आहेत. त्यापैकी ही एक होट्टलची राममूर्ती.

होट्टल येथे नरेश शिवमूर्ती आढळते. जी महादेवाच्या देवळाच्या देवकोष्टावर पश्चिमेभिमुख आहे. आज ती दुभंगलेली असून तिचे हात तुटलेले आहेत. संपूर्ण प्रतिमा अलंकारीत असून त्याच्या डाव्या बाजून वादक वाद्ये वाजवित आहे.

भैरव व शिवाचा उग्र अवतार नांदेड जिल्ह्यातील एकमेव भैरव मूर्ती होट्टल येथे आहे. भग्न मंदिराच्या परिसरात ती सापडली असून डॉ. देगलूरकरांनी ती सर्वप्रथम प्रकाशात आणली.

होट्टल येथे कालीची मूर्ती उपलब्ध झाली आहे. जी अष्टभुजा आहे. चेहरा मात्र भयानक असून डोक्यावर प्रभामंडल आहे. हे शिल्प आज भंगलेल्या अवस्थेत आहे.

याशिवाय महिषा सुरमर्दिनी, सरस्वती इत्यादी मूर्त्या आढळतात. अप्सरा, नृत्यांगणा, सुरसुंदरी इत्यादी शिल्प आपणास दिसतात. हे सर्व कोरतांना कलाकारांनी पणाला लावलेले कसब आपणास दिसतात. पाषाणातही जिवंतपणा आणण्याचे सामर्थ्य येथे करण्यात आले आहे. चालुक्यकालीन होट्टलचे अवशेष प्रेक्षकांना खिळवून ठेवून त्यांचा श्वास अस्वस्थ

[illegible] यावरून होट्टलचे अप्रतिम महत्त्व दिसते.

अनामिक कलाकारांची कलास्वप्ने या होट्टलच्या [illegible] शिल्पाच्या रूपाने साकार केली आहे. [illegible] गंध नष्ट पावतात की काय? म्हणूनच या कलाकारांनी आपल्या कला, आत्माविष्कारातून कलेचा इतिहास नोंदवून ठेवला आहे, अजरामर केला आहे. इतिहासाचा अग्रदूत म्हणून आलेल्या या अनामिक कलाकारांना विनम्र अभिवादन!

●●●

## विद्यापीठ स्थापनेच्या निमित्ताने स्वामी रामानंद तीर्थ यांचा जीवनपट

| | |
|---|---|
| १) संपूर्ण नांव | : श्री व्यंकटराव भगवानराव खेडगीकर |
| २) जन्म दिनांक | : ३ ऑक्टोबर १९०३ |
| ३) जन्मगाव | : गुलबर्गा जिल्ह्यातील खेडगी या गावी. |
| ४) शिक्षण | : सोलापूर येथे प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण अंमळनेर येथे, टिळक विद्यापीठातून उच्च शिक्षण (एम. ए. राज्यशास्त्र) |
| ५) शै. पात्रता | : एम. ए. राज्यशास्त्र |
| ६) व्यवसाय | : उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा या गावी शिक्षक म्हणून कार्य सुरू. |
| ७) संन्यास दीक्षा | : १९३० मध्ये प्रसिद्ध स्वामी मामतीर्थ ह्यांचे शिष्य, नारायण स्वामी यांच्याकडून संन्यास दिक्षा, अशा प्रकारे खेडगीकराचे स्वामी रामानंद तीर्थ झाले. |
| ८) अंबेजोगाई येथे आगमन | : आगमनानंतर योगेश्वरी नुतन विद्यालयाचे पुनरूज्जीवन. |
| ९) हैद्राबाद राजकारणात प्रवेश | : १९३७-३८ पासून हैद्राबाद राजकारणात प्रवेश. १९३७ साली महाराष्ट्र परिषदेची स्थापना. १९३८ साली हैद्राबाद स्टेट काँग्रेस संस्था सुरू केली. |
| १०) वंदेमातरम सत्याग्रहात सामील | : १९३८ मध्ये वंदेमातरम सत्याग्रहात सामील झाले, त्यात दीड वर्षाची शिक्षा झाली. |
| ११) वैयक्तिक सत्याग्रहासाठी निवड | : १९४० सुरू झालेल्या वैयक्तिक सत्याग्रहासाठी म. गांधींनी निवड केली. |
| १२) चलेजाव मोहिमेत सहभाग | : मोहिमेत सहभाग घेतला त्यावेळी स्थानबद्ध. |
| १३) ऐतिहासिक कार्यपूर्ती | : १९४८ मध्ये नेतृत्वाखाली हैद्राबादचा लढा यशस्वी झाला. |
| १४) शैक्षणिक कार्य | : नांदेड येथे पीपल्स एज्यूकेशन सोसायटीची स्थापना १९५० मध्ये नांदेडला पीपल्स महाविद्यालयाची स्थापना. या निमित्ताने मराठवाड्यात नवे शैक्षणिक पर्व सुरू. |
| १५) भूदान पदयात्रा | : १९५२ साली पोचमपल्ली येथून सुरू झालेल्या भूदान पदयात्रेत विनोबाजीसोबत पदयात्रा. |
| १६) लेखन | : मोमॉयर्स ऑफ हैद्राबाद फ्रिडम स्ट्रगल्स या पुस्तकाचे लिखान केले. |
| १७) समाधी | : २२ जानेवारी १९७२ रोजी हैद्राबाद येथे समाधीस्थ. |

**हणमंतकर एम. एस.** एम. ए. अंत्य (इतिहास) [वर्ग प्रतिनिधी]

# भारतीय रेल्वे विभाग

**लक्ष्मण रेखावार**
बी. एस्सी. तृतीय वर्ष

**निवेदक :–** रेल्वे स्टेशनवरच्या रेल्वे विभागाच्या एका उच्च अधिकाऱ्याच्या ऑफिसमध्ये गदारोळ चालू आहे. कारण काय आहे माहीत आहे? रेल्वे विभागाच्या उज्ज्वल परंपरेला काळिमा फासण्यासाठी एक गाडी अगदी वेळेवर स्टेशनवर पोहोचली. या घटनेमुळे त्या उच्च अधिकाऱ्याला जबरदस्त धक्का बसला.

याचा पुढचा भाग आपण प्रत्यक्षच पाहू.

**उच्च अधिकारी :–** कोण आहे तो हरामखोर, ज्याने गाडी वेळेवर स्टेशनवर आणली? त्याला माझ्यासमोर हजर करा.

**चपराशी :–** जशी आपली आज्ञा. (पळत जातो व ड्रायव्हरला घेऊन येतो.)

**अधिकारी :–** काय रे, गाडी आज वेळेवर कशी काय पोहोचली? भारतीय रेल्वेची उज्ज्वल परंपरा व प्रतिष्ठा जशी धुळीत मिळवण्याची तुझी हिंमतच कशी झाली? तुला माहीत आहे काय, ही गाडी जर आणखी १५ दिवस रोजच्यासारखी ३-१२ तास उशिरा आली असती, तर या गाडीचं नाव 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रिकॉर्ड' मध्ये नोंदवलं गेलं असतं. पण तू गेल्या सहा वर्षांच्या मेहनतीवर पाणी ओतलंस!

**ड्रायव्हर :–** (घाबरत) माफ करा सर, तुम्हाला माहीतच आहे की, मी जी गाडी चालवतो ती कधीच वेळेवर चालत नाही. सर्वाधिक विलंब करणाऱ्या गाडीचा ड्रायव्हर म्हणून मला जी प्रतिष्ठा मिळाली, त्याबद्दल आपल्या विभागातल्या लोकांना चांगली कल्पना आहे; परंतु आज काय झालं कुणास ठाऊक, गार्ड व लाईनमनने सहकार्य दिलं नाही. त्यामुळे नाईलाजाने मला गाडी प्लॅटफार्मवर आणावी लागली.

**अधिकारी :–** ठीक आहे, जा तू. चपराशी, लाईनमनला हजर करा.

**लाईनमन :–** सर, तुम्ही जाणताच की, मी दारू पिल्याशिवाय कधीच ड्यूटीवर येत नाही. आज नशा वाढवण्यासाठी दोन भांगच्या गोळ्या खाल्ल्या आणि त्याच्याच नशेत अशी मुर्खता करून बसलो. सर, मी वचन देतो की, आजच्या नंतर एक्सप्रेस गाड्यांना कमीत कमी २ तास लेट करण्याचा प्रयत्न करीन.

**अधिकारी :–** (खूष होऊन) याला म्हणतात नमकहलाल. तू जाऊ शकतोस.

**चपराशी :–** (जाऊन परत येतो.) सर, गार्डसाहेब खरेदीसाठी गावात गेलेले आहेत. ते जेव्हा परत येतील, तेव्हाच गाडी पुढे जाईल म्हणतात.

**अधिकारी :–** ठीक आहे. आता वेळ आहे तर तक्रारपेटीतल्या तक्रारी बघू या!

(चपराशी तक्रारपेटी घेऊन येतो. त्यात जवळपास ३ किलोच्या वर तक्रारपत्रं असतात.]

**अधिकारी :–** आता एक-एक तक्रार वाच पाहू. (चपराशी लाटरी काढल्यासारखं एक पत्र हातात घेतो व वाचतो.)

**चपराशी :–** नागपूरहून गोकुलचंद यांच हे पत्र आहे. ते लिहितात की, प्रवासात एकाच दिवशी दोनदा प्लॅटफार्मवरचा डब्बाबंद जेवण केलं तरी गॅस्ट्रो, अन्नविषबाधा यापैकी काहीच झालं नाही. याबद्दल चौकशी करण्याची त्यांची इच्छा आहे.

**अधिकारी :–** फूड-स्टॉलच्या इंचार्जला हजर करा.

**चपराशी :–** (जातो आणि परत येतो.) सर, ते दवाखान्यात ॲडमिट आहेत. त्यांनी चुकून त्यांच्याच स्टॉलमधले २ समोसे खाल्ले होते.

**अधिकारी :–** ठीक आहे. पुढची तक्रार वाचा.

**चपराशी :–** पटणाहून सोमेश यांची तक्रार आहे की, त्यांनी तिकीट घेण्यासाठी तिकीटाच्या खिडकीत १०० ची नोट दिली आणि तिकीट मास्तरने चक्क तिकीटे आणि उरलेले पूर्ण पैसे परत दिले, अन् तेही तिकीटासाठी भरपूर गर्दी असुनसुद्धा!

**चपराशी :–** सर, तिकीट मास्तरला हजर करू?

**अधिकारी :–** ठीक आहे. (तिकीट मास्तर येतात.) काय हो, तुम्ही म्हणे आजकाल प्रवाशांना उरलेले पूर्ण पैसे व्यवस्थित परत देत आहात?

**तिकीट मास्तर :–** माफ करा सर, पैसे मोजण्यातच माझी चूक झाली असणार! तुम्हाला माहीतच आहे की, गर्दीच्या वेळी मी प्रवाशांना ५-१० रू. कमीच देत असतो. यापुढे मी लक्ष ठेवीन सर. (तिकीट मास्तर जातात.)

**चपराशी :–** पुढची तक्रार सर! औरंगाबादहून ॲड. देवेन्द्र लिहितात की, गाड्यांबद्दल चौकशी करण्यासाठी फोन केले असता, पहिल्याच प्रयत्नात फोन लागला. इतकंच नाही, तर गाड्यांबद्दल खरी-खरी माहिती पण मिळाली.

(चपराशी परत जातो व चौकशीच्या खिडकीत बसलेल्या अधिकाऱ्याला घेऊन येतो.

**अधिकारी :–** काय हो, चौकशीसाठी आलेला फोन तुम्ही लगेच उचलता म्हणे व बरोबर माहिती देत आहात म्हणे?

**चौ. अधिकारी :–** असं काही नाही सर! चौकशीच्या फोनचे रिसिव्हर मी खाली काढूनच ठेवत असतो. पण जेव्हा खिडकीवर चौकशीसाठी खूप गर्दी असते, तेव्हा त्यापासून बचाव करण्यासाठी मी फोन कानाला लावत असतो. अशा वेळी नेमका एखादा फोन आला, तर उत्तर द्यावेच लागते. (तो जातो.)

**चपराशी :–** अकोल्याहून मि. काळे लिहितात की, त्यांना स्टेशनवरच्या उद्घोषिकेचा आवाज स्पष्ट ऐकू आला.

(उद्घोषिका हजर होते. मटकत येते.)

**अधिकारी :–** (गोड शब्दात) मी ऐकलंय की, आजकाल तुमचा आवाज प्रवाशांना स्पष्ट ऐकू येत आहे.

**उद्घोषिका :–** नाही सर, मी तर भरपूर प्रयत्न करते की, माझं उच्चारण कुणालाच स्पष्ट कळू नये. कदाचित तक्रार करणाऱ्याचे कान जास्त तिखट असावेत.

**अधिकारी :–** माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे मॅडम, कारण आता तुम्ही जे काही बोललात, ते मला व्यवस्थित कळत नाही. तुम्ही जाऊ शकता.

**चपराशी :–** यानंतरची तक्रार नांदेडहून डॉ. विनय यांची आहे. आपल्या स्टेशनच्या नळाच्या पाण्याचा नमुना त्यांनी तपासणीला घेतला. तपासणीअंती असं आढळून आलं की, पाण्यात कोणत्याच बिमारीचे किटाणू आढळले नाहीत. तसेच कुलरमधून चक्क थंडच पाणी आलं!

**अधिकारी :–** वॉटर सप्लाय इंचार्जला बोलवा.

**वॉ. इंचार्ज :–** सर मी ड्यूटीवर होतो तेव्हा एक नवीन कर्मचारी कामावर रूजू झाला. त्याने पाण्याची टँक साफ करवली. तुम्ही तर जाणताच की, मी ४-५ वर्षांत फक्त एकदाच टँक साफ करतो. थंड पाण्याच्या तक्रारीबद्दल सांगायचे झाल्यास ही तक्रार जरूर डिसेंबर/जानेवारीत नोंदवली गेली असेल. कारण उन्हाळ्यात थंड पाण्याचे मशिन्स बंदच असतात.

(ते जातात.)

**चपराशी :–** मनमाडहून महेशजी लिहितात की, दिल्लीच्या ट्रेनच्या संडासमध्ये नवीन आरसे दिसत आहेत. हे कसे काय?

**कर्मचारी :–** (रागाने) हे खोटं आहे सर! गाडीत लावण्यासाठी जे आरसे कार्यालयातून मिळाले, ते मी स्वत: मोठ्या साहेबांच्या घरी देऊन आलो. शेवटी

३ आरसे उरले होते, ते माझ्या घरीच पडलेले आहेत.

**अधिकारी :–** शांत व्हा. तुमच्यावर आमचा पूर्ण भरवसा आहे. तुम्ही जा आता.

**चपराशी :–** सर हे पत्र तक्रारीचं नसून सूचनेचं आहे. बीमा कंपनी व जोतीषसंघ यांनी मिळून पाठवलेलं आहे. त्यांनी लिहिलं की, जेव्हा प्रवासी भारतीय ट्रेनने प्रवास करण्यास निघतात, तेव्हा स्वत:चं भविष्य पाहून व बीमा करूनच निघतात. त्यामुळे त्यांचा धंदा जोरात चालू आहे. याचं श्रेय त्यांनी आपल्या विभागाला दिलं आहे. सर यापुढेही असंच सहकार्य अपेक्षित आहे असं म्हणतात. त्यांचा एक सल्ला आहे की, प्रत्येक स्टेशनवर बीमा कंपनी व जोतीषाचं ऑफीस सुरू करावे. तसेच जोतीष सांगणाऱ्यांना रेल्वे विभागात नोकरी द्यावी. त्यामुळे कोणती ट्रेन कुठे आणि किती अंतरावर जाऊन उलटेल किंवा कोणत्या गाडीला आग लागेल किंवा कोणत्या गाडीत बॉम्बस्फोट होईल, याची माहिती कळेल.

**अधिकारी :–** अरे, मी आता खूप थकलोय. तू ही बाकीची तक्रारपत्रं नेहमीप्रमाणे जाळून टाक.

**चपराशी :–** ठीक आहे सर!

[पडदा]

●●●

## सुविचार

आयुष्य हे फुलपाखराप्रमाणे घालविता येणे शक्य असले तरी ध्येय मात्र मधमाशीप्रमाणे ठेवावे.

मखमली पेटीत एकच शब्द जपून ठेवता येण्यासारखा आहे तो म्हणजे ''आई.''

यशाचे मधुर चांदणे पहायचे असेल तर प्रयत्नांची ज्योत अखंड तेजोमय ठेवावी.

विद्यालय ही एक रंगभूमी नसून विद्येचे पवित्र देवालय आहे.

सुंदर वस्तूच्या चिंतनात जे सुख असते ते तिच्या प्राप्तीत नाही. कारण उपभोग म्हटला की, उपरती आलीच.

सुखाचे असंख्य क्षण आपण दररोज उपभोगत असतो पण त्यांची मोजदाद करत नाही. त्यांच्या तुलनेत कधीतरी येणारे दु:ख किती क्षुद्र असतं. पण तेच पुन्हा पुन्हा उगाळून आपण सारं जीवनच कडवट करून टाकतो.

गौप्य सुप्त ठेवणे, जखम विसरणे आणि रिकाम्या वेळेचा सदुपयोग करणे या तीन गोष्टी आचरणात आणणे फार कठीण आहे.

प्राप्तीच्या आनंदापेक्षा प्रयत्नाचे आनंद श्रेष्ठ असतात.

जीवनामध्ये किती मित्र आणि मैत्रिणी आहेत त्यापेक्षा खरा मैत्रीचा अर्थ समजलेले किती मित्र आणि मैत्रिणी आहेत याला महत्त्व आहे.

किती जगला यापेक्षा कसा जगला याला महत्त्व आहे.

जो दुसऱ्यासाठी मरतो तो कायमचा जगतो. जो स्वत:साठी जगतो तो कायमचा मरतो.

अनेकांची हृदय जिंकणे हे जग जिंकण्यापेक्षा कठीण आहे.

प्रत्येकामध्ये काय दोष गुण आहेत, यापेक्षा काय गुण आहेत ते पहा आणि अनुकरण करा.

श्रीमंत होण्यापेक्षा गुणवंत होण्यात भूषण आहे.

दु:खाची दरी ओलांडल्याशिवाय सुखाची हिरवळ दिसत नाही.

जगात असे एकमेव न्यायालय आहे की, जिथे सर्व गुन्हे माफ केले जातात, ते म्हणजे आईचे हृदय.

तुमचे शब्द चांगले असतील याची काळजी घ्या कारण तुम्हाला ते परत मिळविण्याचा केव्हा प्रसंग येईल हे सांगता येणार नाही.

माझे ते खरे मानू नका तर खरे ते माझे म्हणा.

## काही कवी व त्यांची टोपण नावे

कृष्णाजी केशव दामले — केशवसुत
राम गणेश गडकरी — गोविंदाग्रज
वि. वा. शिरवाडकर — कुसुमाग्रज
त्र्यंबक बापूजी ठोमरे — बालकवी
शंकर केशव कानेटकर — गिरीश
प्रल्हाद केशव अत्रे — केशवकुमार

## काही काव्यग्रंथ व त्यांचे कवी

भावार्थदीपिका — ज्ञानेश्वर
अभंगगाथा — तुकाराम
नलदमयंती स्वयंवराख्यान — रघुनाथ पंडित
रुक्मिणी स्वयंवर — एकनाथ
दासबोध व मनाचे श्लोक — रामदास
केकावली — मोरोपंत

## काही पुस्तके व त्यांचे लेखक

श्यामची आई — साने गुरूजी
गुजगोष्टी — ना. सी. फडके
एल्गार — श्री. ना. पेंडसे
गीताई — विनोबा भावे
स्मृतिचित्रे — लक्ष्मीबाई टिळक
स्वामी — रणजित देसाई
श्रीमान योगी — रणजित देसाई

## काही नाटके व त्यांचे नाटककार

प्रेमसंन्यास — राम गणेश गडकरी
टिळक आणि आगरकर — विश्राम बेडेकर
नटसम्राट — वि. वा. शिरवाडकर

## काही ग्रंथ व त्यांचे लेखक

रामायण — वाल्मिकी
महाभारत — व्यासमुनी
शाकुंतल — कालिदास
मेघदुत — कालिदास
रघुवंश — कालिदास
मुद्राराक्षस — विशाखादल
मृच्छकटिक — शूद्रक

**लक्ष्मण रेखावार**
बी. एस्सी. तृतीय वर्ष

## ज्ञानमंदिर (?)

घ्यावे जेथून
नाही मिळते तेथून
गहिवरून येते
पाहुन ते
अपवित्र मंदिर
मंदिर तो ज्ञानाचा
शिकुन मोठे होण्याचा
स्वत: घडण्याचा
इतरांना न्याय देण्याचा
पण गंध येतो त्यातूनही
जातीयवादाचा,
लिंगभेदाचा,
अन् साक्षात्कार होतो
अन्यायी राक्षसाचा

## प्रेमरोग

युवावस्था ती
घेऊन येते प्रेमरोग
रोग तो प्रेमाचा
जास्त शारिरीक भुकेचा
असेल कधी दु:खाचा
शहाण्याने जपून करावे
वेड्याने दूर व्हावे
इतरांनी पहातच रहावे!

## मेरा भारत महान

मेरा भारत महान
मेरा भारत महान
देश आपला जळतोय
मेरा भारत महान
माणूस माणसाला कापत आहे
स्त्रीयांची इज्जत लुटत आहेत
आणि आपण म्हणतो
मेरा भारत महान
स्त्रीया कोठ्यावर नाचत आहेत
तरीही आपण म्हणतो
मेरा भारत महान
देशात सर्वत्र भ्रष्टाचार
मेरा भारत महान
शिक्षणातही जातीयवाद
मेरा भारत महान
देश आपला गहाण
अभिमानाने आपण म्हणतो
मेरा भारत महान!

## जन्म

वृक्ष ते देते जन्म फुलाफळांना
फुले-फळे त्याची उपयोगी
पडतात सर्वांना
दोन जाती मनुष्याच्या त्या
जन्म देतात मुलामुलींना
मुलेमुली त्यांची खरंच का
उपयोगी पडतात सर्वांना?

## संबंध

पाहता तुला
रोज सजने
नयनांना माझ्या
काय वाटे
कोण जाणे कोण जाणे
दूर तू जाता सजने
मना माझ्या
काय वाटे
कोण जाणे कोण जाणे
डोली तुझी
उठता सजने
हृदया माझे
काय वाटे
कोण जाणे कोण जाणे
संबंध आपले
समजता सजने
तुझ्या पतिस
काय वाटे
कोण जाणे कोण जाणे!

## शंका प्रदर्शन

समाज तर समाजच
पण जवळचेही शंका घेत आहेत
समाजाचे उष्टे खाऊन
गद्दार बनत आहेत
रक्ताचं नातं सांगणारे
आज रक्त पित आहेत
लोकांना ज्ञान सांगतस्वत: कोरडे आहेत
व्यर्थ शंका बाळगून
आज पापी बनले आहेत
आणि त्या प्रदर्शीत करून
एकमेकांना दूर करीत आहेत

**लखण रेखावार**
बी. एस्सी. तृतीय वर्ष

## कवीप्रश्न

देऊनी इतरांसी दु:ख
मिळविले का कुणी कधी सुख
विचारितो कवी प्रश्न
देईल उत्तर कोण?

**गणेश बाबुराव वट्टमवार**
१२ वी वाणिज्य

## (तो) अनुभव

हिरावून नको घेऊस
माझं ते हासणं
कारण दडलंय त्यामागं
माझं रडणं
अनुभव तर घेतला बराच
पण असा अनुभव
फक्त एकदाच
शिकलो ह्यातूनही
बरेच काही
आता काही
देणे घेणे नाही!

**राजेश पंदीलवार**
१२ वी विज्ञान

## स्वार्थी दुनिया

स्वार्थी ती दुनिया
मतलबी ती माणसं
दिसतात सर्वत्र
तुम्हा-आम्हांस
दुर्मिळ ती माणसं
येतात घेऊन
संदेश प्रेमाचा
शुद्ध मनाने,
नि:स्वार्थ भावनेने

**कु. उषा बाबुराव वट्टमवार**
बी. ए. प्रथम वर्ष

## प्रेमाचा त्रिकोण

दोघा सखींमध्ये
एक आडवा आला
म्हणून तर आज
प्रेमाचा त्रिकोण झाला
एकीनं त्याला मनापासून वरलं
पण त्यानं मात्र तिच्या सखीला वरलं
त्यानं सखीला आमंत्रण दिलं
पण तिनं त्याला
मनापासून नाकारलं
आज प्रेमाचा त्रिकोण झाला
म्हणून प्रेमाला अपयश मिळाले!

**शंकर भंडेवार मरखेलकर**
बी. एस्सी. तृतीय वर्ष

## धक्का

मुलींना मदत करतांना
नेहमी
धक्काच लागतो
त्यांचा नाही
पण
त्यांच्या वागण्याचा,
ब्याचदा प्रश्न पडतो.
अशा का वागतात
ह्या मुली
''कामा पुरता मामा'' ही म्हण
माहीत होती.
नव्हती माहीत मला ती
नुसती नावाचीच बहीण!

**सुधाकर पंदीलवार**
बी. कॉम. तृतीय वर्ष

## उणीव

बहिणी मिळाल्या
भाऊ मिळाले
गुरू मिळाले
शिक्षण मिळाले
प्रेम मिळाले
पण उणीव
भासली एकाची,
ती म्हणजे
परमेश्वराची!

**सुधाकर पंदीलवार**
बी. कॉम. तृतीय वर्ष

# २१ वे शतक आणि आजचा यूवक

## अशोक गंदपवार

''पराभवाने खचते पिचते
ते कसले तारूण्य?
दिशाहिन जे कुढते रजते
ते कसले तारूण्य?

एका कवीने आजच्या अवसान गाळून बसलेल्या युवकांकडे किंवा गलितगात्र झालेल्या युवाशक्तीकडे पाहून हे वाक्य म्हटले आहे आणि मलाही ते पटते आहे. विसावे शतक संपायला आता फक्त काही वर्षे बाकी आहेत. एकविसाव्या शतकाचा उदयकाल येऊ पहात आहे. सूर्य उगवण्यापूर्वी पहाटेच्या लालीने सूर्योदयाची चाहूल लागावी तशी विज्ञानाच्या प्रगतीने लागावयास सुरु झाली आहे.

आपण पहातो की ''२१ व्या शतकाकडे चला'' अशा घोषणा सर्वत्र निनादू लागल्या. पण नेमकं काय करावं हे आजच्या युवापिढीला समजत नाही. माझ्या मते भूतकालीन चुका जसे जातीयता, धार्मिक अनिष्ट रूढी, सतीप्रथा, दासप्रथा, स्त्रियांना कमी लेखणे यांना सुरूंग लावून नव्या युगाच्या वर्तमानकाळात असतांना उज्ज्वल भविष्य घडविणे. हे २१ व्या शतकातील युवकांचं काम आहे. युवाशक्ती हा देशाचा महत्त्वपूर्ण आधारस्तंभ आहे. देशरूपी कमानीची युवा ही मध्यवर्ती शिला आहे. युवाशक्तीच्या अभावाने देश कमकुवत निस्तेज बनतो, याउलट युवाशक्तीमुळे देशात चैतन्य, जागरूकता, उत्साह निर्माण होतो.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त होऊन बरीच वर्षे झाली पण देशाचा हवा तसा विकास, प्रगती होऊ शकली नाही. पण चिमुकल्या जपानने उदध्वस्त झाल्यानंतरही नव्या जोमाने युवाशक्तीच्या देशप्रमाणे पूर्वप्रतिष्ठा प्राप्त करून जगापुढे आपला आदर्श निर्माण केला.

आपला भारत देश पण काही गोष्टींनी मागे पडतो आहे. आपल्या देशात लोकसंख्येचा भयानक राक्षस धुमाकूळ घालत आहे, त्यामुळे गरिबी, बेरोजगारी, महागाई वाढतच चालली. स्वाभाविक नोकऱ्यांच्या ''किंमती'' देखील आकाशाशी स्पर्धा करीत आहेत. दरवर्षी हजारोंच्या संख्येने मुलं मधमाशांप्रमाणे आपल्या पदव्या घेऊन कॉलेजबाहेर पडत आहेत. पण त्यांना आजच्या कलुषित वातावरणाने कुचकामी ठरवले आहे. कारण कॉलेजमध्ये खूप कमी विद्यार्थी जिद्दीने शिकतात. १००% पैकी ७५% मुलांनी कॉलेजचे असे आधुनिक समीकरण तयार केले आहे.

निवडणुका + गॅदरींग + युथ= कॉलेज

फेस्टीव्हल + टिंगलटवाळी = कॉलेज

अगोदरसारखं परीक्षेचा बाऊ विद्यार्थी करीत नाही. परीक्षेच्या १५ / २० दिवसांपूर्वी त्यांच्या ''विशेष'' अभ्यासाची सुरूवात होते. मायक्रो नोटस्, शॉर्ट नोटस् इ. पण आजकाल तर विद्यार्थ्यांचे हेही कष्ट वाचतात कारण अनेक प्रकाशकांनी त्यांच्या सोयीसाठी मायक्रो नोटस् बाजारात आणल्या आहेत. आजकाल विद्यार्थी एनकेन प्रकारे ''कसेतरी'' एकदाची डिग्री घेऊन ते ''नोकरीच्या बाजारात'' जातात. भगीरथ प्रयत्न करतात पण दुर्दैव तिथे ''नोकररूपी हुंडा'' (डोनेशन) हा राक्षस आडवा येतो. भगीरथ प्रयत्न करूनही यश येत नाही. या नैराश्याने ड्रग्ज, गांजा, अफीम यांचा ते आसरा घेतात व आपलं मौल्यवान आयुष्य ''नशेच्या दैत्याला'' आनंदाने देऊन टाकतात. अशा प्रकारे आजचा युवक नायक लायक न बनता ''खलनायकाच्या'' प्रवृत्तीकडे अर्थात विध्वंसक प्रवृत्तीकडे झूकत आहे.

स्वातंत्र्यापूर्वीचे यूवक आपल्या रक्ताचे पाणी करून प्राण

बनावून, मोठे आव्हान स्वीकारून त्यांनी शृंखलाबध्द भारताला मुक्त केले व नवीन सुंदर भारताची निर्मिती केली. देशाच्या भवितव्याची सुंदर स्वप्ने रंगवली. पण आजच्या युवकांनी त्यांच्या सुंदर स्प्नांचा चक्काचूर केला.

युवाशक्ती ही एका मोठ्या वादळाप्रमाणे आहे. एखादे मोठे वादळ जसे अविचल सागराला हलवू शकते तशीच युवाशक्ती सबंध देशाला हलवू शकते. युवाशक्तीचा उद्रेक स्फोटाप्रमाणे असतो. एखाद्या अथंग सागरामध्ये जहाज सोडून दिले तर भरकटत जाते. त्याला नावाड्याची, नियंत्रणाची जशी गरज असते तशीच नियंत्रणाची, मार्गदर्शनाची गरज आजच्या तरूण पिढीला आहे.

''वेळीच घातलेला टाका पुढचे नऊ टाके वाचवितो.''

म्हणून युवाशक्तीचा विधायक कार्यासाठी उपयोग करून घ्यावा. अन्यथा या समाजात निराश मनाने दुर्बल झालेले युवक, बेरोजगारीने त्रस्त झालेले युवक नकळत विघातक मार्गाकडे हळूहळू चालू लागतील व त्यांना सावरेपर्यंत खूप वेळ झालेला असेल व त्यांची रानटी पशूप्रमाणे अमानुष कृत्ये इतकी वाढत जातील की आपल्याला प्रश्न पडेल की, आपण २१ व्या शतकाकडे जात आहोत की १० व्या शतकाकडे.....?

●●●

